# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०१/२००५

आज दि. २०/०१/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०६, दि. १२/०१/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ७) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ८) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्रीम. सावळे निर्मला बाबूराव | सदस्या |
| ३३) | श्री. माळी रविंद्र भीमदेव | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३८) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३९) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४१) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४३) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४८) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४९) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ५०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५२) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५५) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५६) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५७) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५८) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५९) | श्री. पाटील ध्रुवकिशोर | सदस्य |
| ६०) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६१) | श्री. पाटील रतन कृष्णा | सदस्य |
| ६२) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६३) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६४) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६५) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्य |
| ६६) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६७) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्य |
| ६८) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६९) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७०) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७१) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७२) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७३) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती, महिला बालकल्याण |

| | | |
|---|---|---|
| ३) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ६) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार. मा. आयुक्त, उपमहापौर, सभापती, सभागृह नेते, सर्व उपस्थित सदस्य, सचिव, मनपा अधिकारी, पत्रकार आणि नागरिक आपल्या सर्वाचे स्वागत. २६ डिसेंबर २००४ रोजी निसर्गाचा कोप झाला आणि सुनामी लाटांचा तडाखा संपूर्ण आशियाई देशांना बसला. त्यामुळे लाखो लोकांची जीवित आणि वित्तहानी झाली. त्याच्या दुःखात आपणही सहभागी आहोत. सुनामीग्रस्तांसाठी सर्व देशांनी मदतीचा हात पुढे केला आहे. आपण आपल्या देशावर आलेल्या नैसर्गिक संकटाला सामोरे जाऊन आपण देशावर देशवासिय म्हणून मदत करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेउन आपणाकडे महाराष्ट्र शासनाने २ कोटी रुपये जमा करुन देण्याकरिता आवाहन केले आहे. ते पूर्ण करावे त्याकरिता मी सर्व मिरा भाईंदरवासियांना तसेच पदाधिकारी आणि व्यावसायिक यांना सुनामी पिडितांसाठी मदत करण्याचे आवाहन करित आहे. तसेच उद्या बकरी ईद असल्याने सर्व मुस्लिम बांधवांना ईद निमित्त हार्दिक शुभेच्छा. आजच्या सभेत येणाऱ्या विषयावर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करावी व सभा व्यवस्थित पार पाडावी. सचिव साहेब कामकाज सुरु करावे. धन्यवाद.

**मोहन पाटील :-**

मॅडम. सुनामींच्या दुःखात जे पिडित झालेले आहेत, त्यांच्या विषयी आपल्याला जो शोक ठराव मांडायचा आहे तो आपण सभेच्या नंतर मांडावा अशी मी विनंती करतो.

**जयंत पाटील :-**

मॅडम, सुनामीग्रस्तांसाठी सुनामीची जी लाट आलेली आहे. ती २६ डिसेंबरला आलेली आहे आणि आज २० तारीख आहे. या मधल्या काळामध्ये देशवासियांचे झालेले आणि जगामध्ये झालेले जे कांड आहे. त्याच्यामुळे आपण खास सभा भरवायला पाहिजे होती आणि त्यासंबंधी कुठल्या तऱ्हेचा निर्णय घ्यायचा? आज आपले टार्गेट २ कोटीचे दिलेले आहे. ते ठिक आहे. पण मला वाटते या गोष्टीसाठी भरपूर वेळ घातलेला आहे. तेव्हा या अतिशय वाईट गोष्टीमुळे किंवा घडलेली दुःखद घटना आहे. त्यासंबंधी आपण ताबडतोब एखादी खास सभा लावली असती आणि चर्चा झाली असती तर ते आणखी औचित्यपूर्ण झाले असते असे माझे मत आहे.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

आता प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११.३५ वाजलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, मी एक पत्र दिलेले आहे. आताच महापालिकेच्या उड्डाणपुलाचे उद्घाटन झालेले आहे आणि त्या पुलाचे उद्घाटनामध्ये जी प्रशासनाकडून चुक झालेली आहे किंवा कार्यक्रम ज्या पद्धतीने व्यवस्थित पार पडला पाहिजे. तसे न पाडता एकाच कार्यक्रमाच्या तीन-तीन पत्रिका. एखाद्या खासदाराचे नाव विसरले जाते. दुसऱ्यांदा आमदाराचे नाव विसरले जाते. अशा पद्धतीने गटनेता आणि या महापालिकेत सर्वात महत्वाची सभा म्हणजे स्थायी समिती. स्थायी समितीला विश्वासात न घेता असे कार्यक्रम करतात. म्हणजे कार्यक्रम चांगला झाला. सर्वांचा हेतू आहे. ह्या शहरामध्ये चांगले विकास होतात. आम्हीपण त्याला वेळोवेळी समर्थन केलेले आहे. पण व्यवस्थेमुळे जी अव्यवस्था झाली. आमचा राजकिय पक्ष होता. आमचे विधान परिषदेचे सदस्य होते. आमचीही काही मागणी होती. म्हणजे प्रशासनाने विरोधी पक्षाला विश्वासात न घेता, स्थायी समितीला विश्वासात न घेता असे कार्यक्रम करतात. भविष्यकाळामध्ये असे जेव्हा कार्यक्रम होणार तेव्हा काळे झेंडे किंवा निदर्शने अशी गोष्ट घडू नये म्हणून प्रशासनाने ही चुक केली किंवा प्रशासनाने का विश्वासात घेतले नाही याचा थोडासा खुलासा झाला तर बरे होईल. या सभेमध्ये मी आपल्याला असे पत्र दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, दुसरी गोष्ट मी लक्षात घ्यायला सांगते की, आमदार आणि खासदार तर सांगितल्याप्रमाणे ठिक आहे. त्यांचे नाव टाकायला पाहिजे. दुसरी गोष्टी एक दुःखाची अशी आहे की,

माजी उपमहापौर आपल्या महानगरपालिकेचेच होते. मा. मुजफ्फर हुसेन साहेब ते आमदारसुध्दा आहेत. त्यांचेही नाव घेतले नाही आणि सर्वात मोठी दुःखद घटना म्हणजे की, स्व. राजीव गांधी यांनी महिलांना ३३ टक्के स्थान दिले आणि आम्हाला राजकारणात आणले. आपल्या ह्या सभागृह महिला व बालकल्याण समितीचे जे इन्व्हिटेशन आले त्यांचे सभापती म्हणून नावसुध्दा नाही. त्यात महिला व बालकल्याण सभापती म्हणून असे सुध्दा त्यांचे नाव नाही. ही फार दुःखद घटना आहे असा मी प्रस्ताव तुमच्याकडे मांडत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर मॅडम, आता जो उड्डाणपुलाच्या नामकरणाचा विषय आहे. या कार्यक्रमात ह्या अगोदरही महानगरपालिकेने बरेचसे कार्यक्रम केले. मुख्यालय नगरभवन याचे उद्‌घाटन केले. यामध्ये जी नेमप्लेट लिहिण्याची पध्दत आणि या ओव्हर ब्रीज नामकरणाची पध्दत ही जर आपण प्रशासनाने तपासून पाहिली तर ती पध्दत योग्य आहे का? महाराष्ट्रात अशा प्रकारे नामकरण या उद्‌घाटनाच्या पाट्या लिहिल्या जात नाहीत. परंतु, आपला वेगळाच पायंडा की, पत्रिका ॲस इट इज त्यावर लिहिले गेलेले आहे, ते दिसायला शोभनीय नाही आणि जे पाहुणे आले त्यांचीही नावे त्यामध्ये उठून दिसत नाहीत. या गोष्टीची दखल घ्यावी. दुसरी गोष्ट कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले आहे. ते पूर्णपणे चुकीच्या पध्दतीने केलेले आहे. या मिरा भाईंदर महानगरपालिकेत १८३ कोटीचे बजेट आपण सांगतो आणि ते बजेट सादर करणारे स्थायी समितीचे सभापती यांना त्या ठिकाणी बसण्याची व्यवस्था केली नाही. त्यांना पूर्ण कार्यक्रम होईपर्यंत स्टँडिंग ठेवले. स्टँडिंग सभापती म्हणून त्यांना काय उभे ठेवायचे का? सुत्रसंचालन आमच्या सभागृह नेत्यांच्या ताब्यात दिले ह्या अशा प्रकारच्या चुका जर होत असतील आणि ही नामुष्कीची बाब आहे. या जिल्ह्याचे पालकमंत्री, या राज्याचे मंत्री येतात आणि त्यांच्यासमोर एवढी अपमानास्पद वागणूक जर पदाधिकाऱ्यांना मिळत असेल तर ही योग्य बाब नाही. या ठिकाणी बांधकाम विभाग सक्षम आहे. एक सिटी इंजिनियर, ३ डेप्युटी इंजिनियर, १२ असिस्टंट इंजिनियर एवढे असूनसुद्धा त्या कार्यक्रमावर लक्ष नाही, या गोष्टीचा आपण विचार करावा आणि प्रशासनाने इथून पुढे अशा चुका करु नयेत अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सदर विषय चर्चेला आला म्हणून बोलतो. उड्डाणपुलाच्या उद्‌घाटनाच्या संदर्भात पहिली पत्रिका आल्यानंतर मा. आयुक्त साहेबांना आम्ही त्या संदर्भात भेटलो. आयुक्त साहेब आपण ऐकता का? पहिली पत्रिका उद्‌घाटनाची आल्यानंतर आम्ही आपणाला भेटलो. आमचे शिष्टमंडळ आपल्याला भेटले. त्यावेळेला आपण आम्हाला उत्तर दिले की, ही जबाबदारी प्रशासनाची नाही. मा. महापौरांच्या अधिकारात आहे असे आपण आम्हाला उत्तर दिले. त्यानंतर आम्ही मा. महापौरांना त्याबाबत भेटलो. महापौरांना भेटल्यानंतर दुसरी पत्रिका निघाली. त्याच्यामध्ये मग पहिले उपमहापौर मा. मुजफ्फरजी हुसेन आताचे आमदार ह्यांचे नाव टाकले गेले. परत आम्ही त्यानंतर स्थायी समिती सभापती यांच्याकडे गेलो. दोन्ही पत्रिका दाखविल्या. साहेब याच्यामध्ये पाहुण्यांची नावे आहेत, डावखरे साहेबांचे नाव आहे, पालकमंत्र्यांचे नाव आहे, दुसऱ्या पत्रिकेमध्ये जोडलेले मा. मुजफ्फर हुसेन यांचे नाव आहे आणि जर तुम्हाला तुमचा प्रोटोकॉल पाळायचा आहे. महापालिकेचा जो काही प्रोटोकॉल आहे, तो प्रोटोकॉल तुम्ही पाळतच नाही. काँग्रेस पक्षाच्या उपमहापौरांनी दणका दिल्याबद्दल मुजफ्फर हुसेनजी यांचे नाव टाकले आणि आम्ही मागणी करतो की, स्थानिक खासदार आहेत. खासदार आणि आमदाराचे जसे नाव टाकले. आम्ही म्हणतो आमचे मंत्री महोदय पालकमंत्री आहेत, त्यांचे नाव टाकायला पाहिजे. पण स्थानिक खासदार आहे. प्रोटोकॉल तुमच्याकडे आहे. पण त्याच्यासाठीसुध्दा आपल्याकडे हाजी हाजी करावी लागते. आपले अधिकार काहीच नाहीत का? महापालिकेचे किंवा प्रशासनाचे अधिकार नाहीत का? की प्रोटोकॉल काय आहेत? याबाबतीत कुणाला विश्वासात घ्यायला पाहिजे याबाबतीत कुठलीच हरकत नाही. आपल्याकडे मागणी आम्ही करायची. आमच्या कुठल्या खासदाराचे किंवा आमच्या कुठल्याही ह्याचे नाव नाही. तर आपण असे करायचे का? पुन्हा पुन्हा असे होउ नये याच्या नंतरसुध्दा होउ नये याची दखल घ्यावी.

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडम, सभागृहामध्ये आपला १९ कोटीचा उड्डाणपुल झाला आणि उड्डाणपुलाच्या नामकरणाच्या सोहळ्याच्या उद्‌घाटनाच्या बाबतीत नाही. नामकरणाच्या सोहळ्याच्या ह्याच्यामध्ये जी आपण पाटी लावण्यात आली होती. त्याबद्दल विविध सदस्यांनी या ठिकाणी मते व्यक्त केली. मी प्रशासनाला विनंती करतो.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, एक मिनिट थांबा. मला वाटते, आपल्या सन्मा. महापौर साहेबांची प्रकृती ठिक दिसत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही काय सांगता? तुम्ही डॉक्टर आहात का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कशाला बोलता? तुम्ही डॉक्टर आहात का?

**मा. महापौर :-**

आज आपला कारभार उपमहापौर साहेब चालवतील. मी इथे बसलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्या म्हणतील, तो त्यांचा अधिकार आहे. तुम्ही काय सांगता त्यांची तब्येत बरोबर नाही. तुमची तब्येत बरी आहे का? मला वाटते तुमची तब्येत बरी नाही. घरी जा. हे काय आहे? हे सभागृह आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

सभागृह आहे हे आम्हाला मान्य आहे. परंतु, महापौरांच्या चेहऱ्यावरुन आम्हाला समजले म्हणून ते बोलले. डॉक्टर आहे वगैरे बोलणे गैर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला जे वाटते ते महापौरांना वाटत असेल असे गृहित धरायचे असेल तर आम्हाला वाटते ते आम्ही सांगू का?

**मा. महापौर :-**

तुम्ही टेन्शन घेउ नका. तुम्ही बसा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मॅडम, आपली तब्येत बरी नसेल तर सगळ्यांना प्रकृती ठिक नसल्याबद्दल काळजी राहील कारण मिटींग चालवायची आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आपण या ठिकाणी मत मांडले आहे. मी सांगू इच्छितो की मॅडम, आज जो नामकरण सोहळा झाला आणि सगळ्यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात ज्या त्रुटी होत्या, जरुर त्या त्रूटी झाल्या नाही पाहिजेत या पध्दतीची प्रशासनाने खबरदारी तसेच आम्ही मिळून प्रशासनाने मिळून ती खबरदारी घेतली पाहिजे. अशा पध्दतीचे आपण वातावरण निर्माण केले पाहिजे आणि सर्वांच्या सुचना आहेत त्या सुचनांचा जरुर विचार करावा आणि या ठिकाणी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी काही सुचना आणलेल्या आहेत. त्याबद्दल आपण निर्णय द्यावा आणि पुढच्या वेळेला अशा कोणत्याही गोष्टी घडू नयेत अशी खबरदारी आपण सर्वांनी मिळून घेउ या. एवढे सांगून मी पुढच्या पत्राबद्दल रुलिंग द्यावे अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

**मा. उपमहापौर :-**

स्थगन प्रस्तावावर प्रस्ताव सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेब यांनी मांडलेला आहे. आपल्या ॲक्टमध्ये अशी प्रोव्हिजन आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर स्थगन प्रस्तावावर निर्णय द्यायची प्रथा आहे. तर आधी प्रश्नोत्तराचा तास सुरुकरुन घेउ. त्यानंतर स्थगन प्रस्तावावर आपल्याला उत्तर देण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

असे कोणत्या कायद्यात आहे? काय कलम नंबर आहे? ते सांगू शकाल काय?

**मा. उपमहापौर :-**

असे उपविधीमध्ये आहे.

**रोहिदास पाटील :-**

उपविधीमध्ये काय आहे? प्रस्ताव मांडलेला आहे, तुम्हाला पटलेला आहे. कशासाठी सभागृहाचा वेळ घालविता? एकतर पहिल्यांदा चुक करायची मग पांघरुण घालायचे कारणच नाही आणि आता जर तुम्हाला वाटते की, हे झालेले चुक आहे. रुलिंग द्यावे, दुरुस्ती करावी. त्याच्यानंतरच काही झाले नाही का? पांघरुण घालायचे कारणच नाही.

**मा. उपमहापौर :-**

प्रथम स्थगन प्रस्ताव काय आहे? स्थगन प्रस्तावाबद्दल कसे काय उपविधी आहे? ते ऐकून घ्या. त्यानंतर त्याच्यावर उत्तर देउ. स्थगन प्रस्तावाबद्दल आपल्याकडे जे उपविधी आहेत. त्या २ च्या

ट मध्ये निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून स्थगन प्रस्ताव. याच्यामध्ये प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर परंतु सभेच्या कामकाजाच्या क्रमातील कामाची इतर कोणती बाब विचारात घेण्यात येण्यापूर्वी भाईंदर शहर किंवा तेथील रहिवासी यावर परिणाम होईल अशा अत्यंत निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित गोष्टीवर चर्चा घडवून आणण्याच्या प्रयोजनार्थ पालिका सदस्यास पिठासीन प्राधिकाऱ्याच्या संमतीने महापालिकेचे कामकाज स्थगित करण्याचा प्रस्ताव मांडता येईल. यासंबंधी स्पेसिफिक लिहिलेले आहे की, निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या गोष्टीवर निश्चित चर्चा घडवून आणण्यासाठी प्रस्ताव असतो आणि यासाठी स्थायी समितीने ठराव केला होता की, आपल्याला कोणा कोणाची नावे त्याच्यावर टाकायची आहेत आणि या प्रस्तावामध्ये काही चुक झाली होती. ती चुक नंतर महापालिकेच्या निदर्शनास आम्ही आणून दिली. माजी उपमहापौर आणि विद्यमान विधानपरिषदेचे सदस्य यांचे नाव नव्हते. परंतु, त्यात सुधारणा घडवून आणली. खासदाराचे नाव टाकायचे होते ते टाकून घेतले आणि याच्यापुढे स्थायी समितीमध्ये पुन्हा या विषयावर निश्चित धोरण करण्यात यावे आणि हा स्थगन प्रस्ताव होउ शकत नाही म्हणून फेटाळण्यात आलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

स्थगन प्रस्ताव फेटाळते वेळी चर्चा झालेली आहे. आम्ही तुम्हाला दोन प्रश्न विचारतो. त्याचे उत्तर द्यायचे आहे. एकतर पहिल्यांदा तुम्ही अडीच वर्षे झाली तरी तुमचे कोणत्याही कामकाजात निर्णय होत नाही आणि हे कामकाज काही नव्या सभागृहाच्या अखत्यारितील नाही. हा प्रोटोकॉल ठरविलेला आहे. हे जे असे मोठे कार्यक्रम होतात, त्यासंबंधी निश्चित धोरण आहे आणि निश्चित धोरणासाठी वेगवेगळी पण सभा स्थायी समिती होईल. ह्याच्यामध्ये ऐऱ्या गैऱ्याचे नाव घालायचे नाही. कोणी तसा आग्रह केलेला नाही. तुमच्या पक्षाचे माजी उपमहापौर म्हणत नाहीत तिकडे ते विद्यमान आमदार आहेत. नाहीतर माजी उपमहापौर म्हणून तुम्ही पुन्हा सांगणार माझे नाव पाहिजे म्हणून. माजी उपमहापौरच नाहीत. ते विद्यमान आमदार आहेत. विद्यमान खासदार आहेत. उद्या आमदार अशोक मोडक यांचेदेखील तुम्ही नाव घेतले नाही आणि सभापती उभे राहून म्हणतात. ते तिथे उभे राहिले सगळ्यांनी समाधान व्यक्त केले. आम्ही बहिष्कार घेतला होता. भाजपाचे कोणीही कार्यकर्ते नव्हते, कोणी पदाधिकारी नव्हते. आम्हाला तुमचा मग वेळ घालवायचा नाही. एखाद्या ठिकाणी आमच्या आमदाराचे नाव कोरले नाही. या मिरा भाईंदरमध्ये काही फरक पडणार नाही. आमची कार्यपद्धती, आमचे कामकाज जनतेच्या सेवेसाठी जे करायचे आहे ते आम्ही करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. पण नको त्या ठिकाणी तुम्ही कशासाठी ताकद खर्च करता? कोणी पत्रिका केली? याचा खुलासा करावा. सभागृह काय मागते? कॉंग्रेस आयच्या सदस्यांनी काय मागितले? राष्ट्रवादीच्या सदस्यांनी काय मागितले? भाजपाच्या सदस्यांनी काय मागितले? शिवसेनेच्या सदस्यांनी काय मागितले? ही पत्रिका बनवते वेळी कोणाच्या मनात काय कटु होते किंवा कोणती कार्यप्रणाली वापरली? याचा खुलासा करावा. नाव कोरणेबाबत आता प्रश्नच नाही. पुन्हा पुन्हा त्या चुका तुम्ही करणारच. ही पहिली चुक नाही, याच्या आधी चुका झालेल्या आहेत

**मा. उपमहापौर :-**

स्थगन प्रस्तावावर चर्चा करावी असे आपले मत होते. दुसरे आपण बोललात की, मुजफ्फर हुसेन हे फक्त माजी उपमहापौर नव्हते. तर मी तुम्हाला सांगितले विद्यमान विधानपरिषदेचे सदस्य असाही उल्लेख केला. आम्ही ही जाणीव करुन दिल्यानंतर त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर खासदाराचे नाव दाखल करण्यात आले.

**रोहिदास पाटील :-**

उपमहापौर साहेब, तुमच्याबद्दल आम्हाला जेव्हा आदर वाटला असता की, जेव्हा तुम्ही फक्त माजी उपमहापौराचे, विद्यमान आमदारांचे सांगायला गेलात इथेच तुम्ही मार खाल्ला.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही कुठे मार खाल्ला हे तुम्हाला सांगण्याची गरज नाही. हा स्थगन प्रस्ताव फेटाळण्यात आलेला आहे. हा स्थगन प्रस्ताव होउ शकत नाही. सचिवांनी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला जे बोलायचे आहे ते बोलून झालेले आहे. तुम्हाला जे उघडे पाडायचे आहे ते पडलेले आहे. तुम्हाला तुम्ही कुठे आहात ते समजत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीमध्ये कुठलीही चर्चा झालेली नाही आणि ९० हजार रुपये अवलोकनार्थ टर्ममध्ये आलेले आहेत. स्थायी समितीमध्ये कुठेही उल्लेख दिलेला नाही. साहेब, तुम्ही प्रोसिडिंगमध्ये लिहून घ्या. तुम्ही बोलले स्थायी समितीमध्ये निर्णय दिलेला आहे. स्थायी समितीमध्ये निर्णय झालेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांचा प्रश्न आहे. ११.५५. वाजलेले आहेत.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम की परवानगीसे बोलती हूँ। सदर प्रश्न देउन पण मला वाटते २ वर्षे झालेली आहेत आणि सदर जी केस आहे. त्यांनी स्टे घेतलेला आहे. त्या स्टेला मला वाटते कमीत कमी १० वर्षे व्हायला आली. १९९६ ला त्यांनी स्टे घेतलेला आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिका झाल्यानंतर आज दोन-अडीच वर्षात आपल्याकडे स्टाफ पाहिजे तेवढा वाढलेला आहे. आपण लिगल ॲडव्हाइजर नियुक्त केलेले आहेत. ते रिटायर जज म्हणून आहेत आणि तरीसुद्धा एवढा महत्वाचा स्टे आपणा व्हॅकेंट करु शकत नाही. मग असे रिटायर जज किंवा लिगल ऑफिसर नेमायचा अर्थ काय? आपण याच्यावर ठेवलेले जे ॲडव्होकेट आहेत त्यांनी या संदर्भात काय काय कोर्टासमोर पेश केले आणि आपल्या कार्यालयातील ऑफिसरने तिथे काय काय पेपर सबमिट केले. तो स्टे आजपर्यंत का व्हॅकेंट झाला नाही. त्याचा काहीही जवाब याच्यामध्ये दिलेला नाही. स्टे व्हॅकेंट का नाही झाला? स्टे व्हॅकेंट करण्यासाठी आपण काय काय पुरावे सादर केले की, वकिलांनी कुठली तिथे फायटिंग केली की, त्याचा याच्यामध्ये काहीच उल्लेख नाही. फक्त असे दिलेले आहे की, १९९६ ला त्यांनी स्टे घेतला आणि जसा आहे तसा ठेवायचा असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. त्यानंतर आपण काय कार्यवाही केली? या गोष्टीला ९ वर्षे झाली. आपल्या ओव्हर ब्रीजचे काम पूर्ण होउन नामकरण विधीसुध्दा झाला आणि तिथे रोडसुध्दा झाला. म्हणजे आता बहुतेक तिथे एका गटाराचे काम चालू आहे. एवढे सर्व होउनसुध्दा हा एक स्टे व्हॅकेंट का नाही झाला?

**मोहन पाटील :-**

महापौर महोदया, मी इन्टरप्शन करीत नाही. एखादे प्रकरण जर न्यायप्रविष्ठ असेल तर त्याच्यावर चर्चा घडवून आणू शकतो का? त्याबद्दल मला थोडी माहिती दिली तर चांगले होईल.

**रिटा शाह :-**

कोर्टाचे कोण इन्टरप्शन करीत नाही. कोर्टाला कुठे इन्टरफेअर करित नाही. आपल्याकडे जे रिटायर जज म्हणून सादर झालेले आहेत. आपल्याकडे लिगल ॲडव्हाइजर असूनसुध्दा, आपल्याकडे एवढा स्टाफ असूनसुध्दा हा प्रश्न विचारलेला आहे की, स्टे व्हॅकेंट करण्यासाठी आपण काय काय कार्यवाही केली आणि काय काय कागदपत्रं कोर्टात सादर केली? पण मला वाटते की, कुठल्याही लिगल कार्यासाठी इन्टरप्शन करायचे की, इन्टरफेअर करायचे कुठल्याही नागरिकाला अधिकार नाही ते मलाही माहिती आहे. पण मी कुठल्याही कोर्टाच्याबद्दल विचारले नाही. आपल्या कार्यालयामध्ये काय कार्यवाही केली. त्याबद्दल मी विचारपूस केलेली आहे.

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडम माझे म्हणणे असे होते मी त्यांच्या प्रश्नामध्ये इन्टरप्शन केले. माझे ऐका की, न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणामध्ये आपण सभागृहात चर्चा घडवू शकतो की नाही? यांच्या प्रश्नाशी मी तुम्हाला हे बोलत नाही. त्या प्रश्नाविषयी बोलत नाही. एखादे प्रकरण जर न्यायप्रविष्ठ असेल तर आपल्या महासभेत चर्चा होउ शकते की नाही. याबद्दल आपण माहिती द्यावी याबद्दल मी बोललो. त्यांच्या प्रश्नाने कुठल्याही सभागृहात प्रश्नोत्तराचा तास असेल त्याच्या प्रश्नामध्ये बोलायचे नाही असे आपण ठरविलेले आहे आणि आपण त्याप्रमाणे कामकाजामध्ये चालतो. परंतु, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्या न्यायप्रविष्ठ प्रकरणामध्ये आपल्याला बोलता येते की नाही? त्यात चर्चा घडवून येते की नाही? याबद्दल आपण आपले मत मांडावे.

**रिटा शाह :-**

साहेब, त्याच प्रश्नाचा मी जवाब देते की, कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तरी मला असे वाटते की, त्याला चर्चेला सभेमध्ये आणायचा सवालच उठत नाही. हा प्रश्न चर्चेला आलेला आहे आणि हा प्रश्न मी न्यायालयामध्ये काय झाले त्याबद्दल विचारत नाही. जजने काय केले? तिथे काय आर्ग्युमेन्ट झाले, त्याबद्दल नाही विचारले. आपल्या कार्यालयामधून ९ वर्षामध्ये आपल्या ऑफिसरने, लिगल ॲडव्हाईजर आणि आपल्या खात्याने त्यात काय पुटअप केले आणि काय आर्ग्युमेन्ट केली. त्याबद्दल मी विचारपूस केलेली आहे आणि हा माझा अधिकार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे नाही. आपण जेव्हा आम्हाला शिस्त सांगता. आपल्याला प्रश्न विचारलेला आहे. पिठासीन अधिकारी आम्ही बोलतो तेव्हा तुम्ही आम्हाला गप्प बसायला सांगता. ही कामाची पद्धत नाही.

**मोहन पाटील :-**

तुम्ही शिस्तीचे धडे शिकवू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा आम्ही बोलतो तेव्हा मध्ये बोलायचे नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्थायी समितीचे सभापती तुम्ही सभागृह नेते नाही. तुम्हाला हे बोलण्याचा अधिकार नाही, तुम्ही खाली बसा. सभागृह नेत्यांना बोलू द्या. सभागृह नेते असताना तुम्ही काय बोलता? तुम्ही सभापती आहात म्हणजे याचा अर्थ सगळे तुमच्या हातात आहे असा अर्थ होत नाही. तुम्ही स्थायी समितीचे सभापती आहात. तुम्हाला स्वतःला नियम माहिती नाही. ते बोलायला लागले तर तुम्ही उठून बोलता. ते उभे राहिले तुम्ही उठून बोलतात.

**मिलन म्हात्रे :-**

घंगाळेच्या प्रकरणात तुमची बुद्धी कुठे गेली होती. त्याचे उत्तर देणार का? तुम्ही न्यायप्रविष्ठचे बोलायचे नाही. तुम्हाला बोलायचा अधिकार नाही. तुम्ही आम्हाला न्यायप्रविष्ठाच्या धमक्या देता का?

(सभागृहात गोंधळ)

**लिओ कोलासो :-**

महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. माझा उल्लेख पण झाला. मला वाटते की, सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सन्मा. सदस्या रिटा शाह यांच्या प्रश्नामध्ये काही इन्टरप्शन केलेले नाही. त्यांनी सुरुवातीला सांगितलेले आहे की, त्यांची एक शंका म्हणून विचारलेली आहे. तर त्यासंबंधी सभासदांच्या माहितीसाठी असे विचारले तर ते वावगे नसायला पाहिजे आणि सन्मा. सदस्या रिटा शाह पण जे बोलतात.

**मिलन म्हात्रे :-**

कोर्टात आपण काय दिवे लावतो. ते ओपन पण झाले पाहिजे.

**मा. महापौर :-**

कोणाला पण तुम्ही बोलायला देणार नाही का? तुम्हालाच जास्त बोलता येते काय? कोण काय बोलले की लगेच सगळे उठतात. तुम्हाला शिस्त नाही का?

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलले म्हणून मी बोललो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील काय बोलले? सगळे खाली बसा. त्यांनी फक्त विचारले काही बोलले नाही.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इनको बोलने का तरिका नही आता। समझते नही है।

**लिओ कोलासो :-**

ही शिस्त नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर साहेबा इनको कोई शिस्त नही है?

**शशिकांत शहा :-**

त्यांच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमचा आहे.

**लिओ कोलासो :-**

सभासदांनीसुध्दा प्रश्नाच्या प्रत्येक भागामध्ये असे ताशेरे किंवा असे शेरे मारणे की, बेशिस्त आहे की अक्कल शिकविणे अशा काही गोष्टी बोलण्याचे आपल्याला काही कारण नाही. आपण सर्वजण एका सार्वजनिक कार्यासाठी एक शहराचे विश्वस्त म्हणून या ठिकाणी आहोत. तर सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी जो काही प्रश्न विचारलेला आहे. ज्या अर्थी तो आपल्या उत्तरपत्रिकेवर आला. त्या अर्थी

इट हॅज बीकम द प्रॉपर्टी ऑफ दिस हाउस. या सभागृहाची मालमत्ता झालेली आहे. त्याच्यावर चर्चा होताना न्यायालयाचा आणि न्यायप्रविष्ठ भाग टाळून आपल्याला चर्चा करता येणे शक्य आहे की नाही अशा स्वरुपाचे मार्गदर्शन सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्याकडून हवे होते. सन्मा. सदस्या रिटा शाह यांच्या प्रश्नाचे मी समर्थन करणार नाही. परंतु, वर्षानुवर्षे कोर्टामध्ये केस चाललेल्या आहेत. त्यांचा स्टे आहे. स्टे व्हॅकेंट होतात. तर याच्यावर आयुक्त साहेब आपण आम्हाला आपली जी काही स्थिती आहे. आपले दावे डिफेन्ड करण्याची जी काही पध्दत आहे. त्याच्याबद्दल आपण सभागृहाला माहिती द्या. बी ओपन. ह्याच्यामध्ये काही कमीपणा नाही.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, आज जो प्रश्न मैने यहाँ सभागृहके सामने रखा है। यह खूप महत्व का प्रश्न है। क्योंकी हमारे शहर मे एक व्यक्ती पुरे सभागृहको हिला रहा है। मेरा दुसरा प्रश्न भी उसी टाईप का है की, एक व्यक्ती यहाँ मिरा भाईंदर शहर की एक जगह जो रोड के अंदर उनकी जा रही है। उस जगह को उसको सेफ करके उसके बंगले को सेफ करना है। यहाँ बैठे हर सभासदका कर्तव्य है की, उस जगह को व्हॅकेंट करके कैसे लेने का यह हमारे हर सभासद का कर्तव्य है। महापौर और प्रशासकीय अधिकारी का भी यह कर्तव्य है। लेकीन इस विषय मे विचार न करते हुए यहाँ कोर्ट का चर्चा करनेका विषय है की नही। यह हम चर्चा कर सकते है की नही ऐसे करके चिजको हम खत्म करने की कोशीश करते है या टाईम वेस्ट करने की कोशीश करते है । मैने बस सीधा साधा सवाल किया है की जो एक बंगले की जगह है। जो हमारे इतनेसे प्रोजेक्ट मिरा भाईंदर शहर को हम सुंदर बनाने के सपने के बारे मे बोलेंगे तो जब हम पहिली बार चुनके आये तब हमने देखे थे। उस सपने के बाजू मे यह बंगला बाधित हो रहा है। उस बंगले के मालिक ने आज कोर्ट मे जिसको ९ साल पहले स्टे लिया है। उस स्टे को व्हॅकेंट करने के लिए हमारे प्रशासनने कितनी मेहनत की? क्या मेहनत की? कोर्टने क्या किया? यह मैने पुछा नही है। हमारे प्रशासनने, हमारे अधिकारीने, हम सबने मिल के क्या कोशिश कि की वह व्हॅकेंट हो जाये। उसके बावजूद प्रशासनने इसके अंदर वह जवाब दिया है। इसका अर्थ यह होता है की, अगर यह जगह न मिले तो बाजूवाली जगह ले लेंगे और उनका नो ऑब्जेक्शन ले लेंगे। इस प्रकार का मुझे इसमे जवाब दिया गया है। तो आज मुझे बताईये की, जो बंगला उस रोड वायडिंग के दरम्यान रोड बनाने के टाईम बाधित था। वह बंगले को आज जैसे है वैसे रखा की स्टे दिया गया है। उस बंगले को सीधा करने बाजुवाले की जगह लेने की हम लोग मागणी करने का आप जो विचार कर रहे है। तो यह कहाँ तक ठिक है। इसका अर्थ यह है की, शासन और प्रशासन इसमे सन्मा सदस्या रिटा शाह भी आ गई, शासन और प्रशासन दोन्हो मिल के इस बंगलेको व्हॅकेंट करना नही चाहते। यह मेरा आपके उपर इलिगेशन है। क्योंकी आप प्रशासन है तो हम शासन है। मैने सवाल डालके आज दो साल हो गये और वह केस के ९ साल हो गये लेकिन आज तब इसके जो परिणाम है वह झीरो है। कोर्टने क्या किया? कोर्ट क्या कर रही है? मैने वह सवाल पुछाही नही। हमारे शासन और प्रशासनने क्या किया? और जो बाजूवाले की जगह हम लेने की सोच रहे है। उसको मेरा विरोध है। क्योंकी जो जगह या जो आराखडा हमने मंजुर किया और हमने जो जगह मंजुर करके लिया उसको व्हॅकेंट करके लेने की सारे सभागृह की प्रशासन और शासन की जबाबदारी है और हम वह करके लेना चाहिए। वह मेरी मागणी है।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. हे काही माझे उत्तर नाही किंवा खुलासासुध्दा नाही. परंतु, गौरीशंकर तोदी यांच्या जागेवरुन जाणाऱ्या रस्त्याबद्दल सन्मा. गौरीशंकर शेठ यांच्याबरोबर आयुक्त, महापौर आाणि पदाधिकारी.............

**रिटा शाह :-**

साहेब सभागृह नेते आहेत मी त्यांचा मान ठेवते. पण मला वाटते की जवाब आपल्याकडून मला भेटायला पाहिजे कारण शेवटी सभागृहामध्ये विषय डायव्हर्ट होतो आणि बोंबाबोंब होते त्याचे कारण हेच आहे की, कोणीही उठून जवाब देतो.

**लिओ कोलासो :-**

विषय डायव्हर्ट होत नाही

**रिटा शाह :-**

पण सभागृहामध्ये आपण डिसीप्लेनने वागलो नाही त्यांच्याकडे एवढे मोठे पद आहे महापौर मॅडम जवाब द्यायला सक्षम आहेत असे मला वाटते. मग कुठल्याही सभापती किंवा सभागृह नेत्याला जवाब द्यायची गरजच नाही. महापौर मॅडमचा रुलिंग देण्याचा अधिकार आहे, त्यांनी रुलिंग द्यावे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया आणि सन्मा. सदस्य या ठिकाणी सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमनी जो प्रश्न विचारलेला आहे. या ठिकाणच्या प्रशासनाने या गौरीशंकर तोदी यांच्या बंगल्याबद्दल काय कार्यवाही केली. या प्रकाराला ९ वर्षे झाली. अशा प्रकारचा प्रश्न विचारलेला आहे. थोडासा अविश्वासही व्यक्त केलेला आहे. साहजिक आहे. आम्ही त्याबद्दल वाईट वाटून घेण्याचा काही प्रश्न नाही. पहिली गोष्ट म्हणजे ९ वर्षे काय झाले याचा हिशोब मी देउ शकत नाही. पण गेली दोन वर्षापासूनचा नक्की देईन. त्याच्या अगोदरच्या ७ वर्षाचा जो हिश्सोब आहे, तो दुसऱ्या कोणाकडून तरी घेणे आवश्यक आहे. १९९७ साली ही केस केली गेली आणि त्यानंतर ओव्हरब्रीजचे अलाइनमेंन्ट झाले. डी.पी. रोडची ४५ फुटाची आखणी झाली. ओव्हर ब्रीज पूर्ण झाला. त्याबरोबरच रस्तेदेखील जिथे जिथे उपलब्ध जागा होती त्या ठिकाणी आपण केलेले आहेत. हे आपणसुध्दा पाहत आहोत. गौरीशंकर तोदींच्या बंगल्याचा जिथपर्यंत प्रश्न होता, त्या ठिकाणी जसा आपण रस्त्याचा विकास करित असताना नागरिकांच्या बरोबर चर्चा करतो आणि जर आपल्याला आउट ऑफ कोर्ट सेटलमेन्ट करुन जर ती जागा उपलब्ध करुन देत असतील तर तसे करण्यावर आपण भर देतो. आपली पॉलिसी आहे. एकदा याच पध्दतीने श्रीयुत गौरीशंकर तोदी यांच्याबरोबर मी चर्चा सुरु केली. कोटार्मध्ये केस होती. स्टे होता. या सगळ्या गोष्टी खऱ्या होत्या. आपल्याला ती जागा हवी होती आणि रस्त्यासाठी हवी होती या दिशेने आमचे त्यांना प्रयत्न होते आणि विनंती होती. एक विनंती तर आम्ही अशीही केली की, ही आपली केस चालू आहे ती आपण विड्रॉ करुन घ्या. त्या ठिकाणच्या बांधकाम परवानगीसाठी जो प्रस्ताव आहे तो प्रस्ताव आपण आम्हाला द्या आणि ते देत असताना हा डी.पी. रोडचा जो पोर्शन आहे हा डी.पी. रोडचा पोर्शन त्यांनी महापालिकेला हस्तांतरीत करायचा अशा प्रकारची एक चर्चा त्यावेळेला झालेली होती. आमच्या विनंतीला मान देऊन त्यांनी दि. १५/०९/२००३ रोजी केस विड्रॉ केलेली आहे. त्यामुळे आज ही बाब न्यायप्रविष्ठ नाही. आपण यावेळेला या सभागृहामध्ये जेव्हा वेळोवेळी चर्चा झाली त्याच्यामध्ये ह्या रस्त्याचा विषयदेखील चर्चेला आलेला होता. आम्ही असेही या ठिकाणी आपल्याला आश्वासन दिलेले होते की, जर त्यांनी जागा आपल्या ताब्यात नाही दिली तर आपण ॲक्विझीशनदेखील प्रपोजर करु आणि हा बंगला ताब्यात घेउ आणि ती जागा ताब्यात घेउ. त्यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांनी केस विड्रॉ केली. आम्ही केलेल्या विनंतीनुसार त्यांनी आम्हाला तात्पुर्ती २० मीटर बंगला सोडून बाकीची जी जागा होती ती ताब्यात दिली आणि आम्हाला त्यांनी असे आश्वासन दिले की, उर्वरित जागेच्या अर्बन लॅन्ड सिलिंगकडे आमचे प्रकरण चालू आहे आणि त्याची ऑर्डर आल्याबरोबर आपल्याला ती जागा ताब्यात देतो आणि तसा प्लॅनही आपल्याकडे सबमिट करतो. मला या सभागृहाला सांगायला आनंद वाटतो की, अर्बन लॅन्ड सिलिंगच्या ॲडिशनल कलेक्टरचे आदेश आम्हाला मागच्या आठवड्यात प्राप्त झालेले आहेत आणि याच्यामध्ये सर्व्हे नं. ६५७ याच्यामधील जवळजवळ ४,५३१ स्क्वेअर मीटर जागा म्हणजे त्या बंगल्याचा पूर्ण भाग तो बंगला त्यामध्ये बाधित होतो ती साईट आणि आताचा जो एक्झीस्टिंग रोड आपण केलेला आहे. आपल्या अलाईनमेन्टप्रमाणे कुठेही कॉम्प्रोमाइज न करता हे मी पुन्हा या सभागृहाला सांगू इच्छितो तर यानुसारच तो प्लॅन आमच्याकडे त्यांनी सादर केलेला आहे. अर्बन लॅन्ड सिलिंगच्या क्लिअरन्ससाठी जो पेन्डिग होता तो क्लिअरन्सही त्यांनी ॲडिशनल कलेक्टरचा मिळविलेला आहे आणि या प्लॅनमध्ये फक्त काही कागदपत्रे वॉन्टिंग आहेत. ती कागदपत्रे प्राप्त होताच याच्यामध्ये बिल्डींग परवानगी दिली जाईल आणि प्लॅन सबमिट करित असतानाच स्ट्रक्चर टु बी डिमॉलिश अशा प्रकारे तो प्लॅन सादर झालेला आहे. ॲग्रीमेन्टदेखील आमच्याशी गौरीशंकर तोदीने केलेले आहे की, हा जो बंगला आणि त्याच्या भोवतालचा जो परिसर आहे, जो रस्त्याने बाधित होणार आहे. तो आम्ही महापालिकेला देउ आणि डी.पी. मध्येदेखील ॲडिशनल कलेक्टरच्या आदेशामध्ये एक्झम्पशन दिले गेलेले आहे. म्हणजे जी जागा आपल्याला यात बिल्डिंग प्लॅन सॅन्क्शन होईपर्यंतच्या काळामध्ये ताब्यात मिळणार आहे. काही कागदपत्रांची पुर्तता ज्यावेळेला होईल त्यावेळेला प्लॅन जो आहे तो सॅन्क्शन होईल आणि स्वतःहून ते हा बंगला काढून टाकणार आहेत. तशा प्रकारचा त्यांनी प्लॅन सॅन्क्शनच्या ॲग्रीमेन्टमध्येदेखील उल्लेख केलेला आहे. सन्मा. सदस्यांना जर तो प्लॅन तपासायचा असेल तर आम्ही बरोबर आणलेला आहे आणि त्याच्यातील सगळ्या ज्या तरतुदी आहेत त्या आपण कृपा करुन पाहून घ्याव्यात. मला वाटते या संदर्भातील आपल्याला जर काही आणखी विचारायचे असेल तर आपण विचारावे.

**रिटा शाह :-**

मा. कमिशनर साहेब आपण दोन वर्षात जी मेहनत केली. पहिल्यांदा मला त्याबद्दल धन्यवाद द्यायला पाहिजे की, आपण त्याच्यामध्ये काहीतरी प्रोग्रेस केलेले आहे. परंतु, हा विषय दोन वर्षापूर्वी मी दिलेला होता. प्रश्न म्हणून दिलेला होता. दोन वर्षानंतर हा विषय चर्चेला आलेला आहे. मी मुद्दाम

सांगते सचिव साहेबांचे कर्तव्य होते याच्यावर नवीन म्हणजे सध्या काय इम्प्लिमेन्टेशन झालेले आहे, काय प्रोग्रेस झालेले आहे, त्या प्रकारचा जवाब ह्याच्यामध्ये टाईप करुन द्यायला पाहिजे होता. हा जवाब जुना आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. आपल्याला ते टाईप करुन मिळेल.

**रिटा शाह :-**

नवीन प्रोग्रेस तुम्ही केलेले आहे. कारण सभागृहाची जी १५-२० मिनिटे वाया गेलेली आहेत. कारण सन्मा. सदस्य मोहन पाटिल साहेबांना असे वाटले की, न्यायप्रविष्ठ गोष्ट आहे. आपण विषय चर्चेत घेतला तर संपूर्ण सभागृह अडचणीत येणार आणि आपल्याला कोर्टात जावे लागेल अशी काहीतरी शंका त्यांना निर्माण झाली. म्हणून त्यांनी हा विषय मांडला. पहिलेच ह्याच्यामध्ये डिक्लेअर झाले असते की, सदर बाब न्यायप्रविष्ठ तेव्हा त्यांनी स्वतःच केस मागे घेतलेली आहे. तर माझा प्रश्न पुन्हा आहे की, गौरीशंकर तोदी यांनी जी केस केली होती ती मागे घेतलेली आहे त्याची मला कॉपी मिळावी आणि दुसरे म्हणजे त्यांचा जो बंगला बाधित आहे. त्या बाधित बंगल्याची जागा महानगरपालिकेला हॅन्ड ओव्हर करतो अशी एन.ओ.सी. त्यांनी रिटर्नमधे दिलेली आहे का?

**मा. आयुक्त :-**

होय. ॲग्रीमेन्ट केलेली आहे.

**रिटा शाह :-**

मग त्याची एक कॉपी मला द्यावी. ॲग्रीमेन्ट आणि ॲफिडेव्हीट असलेली कॉपी द्यावी आणि त्यांनी जो प्लॅन पुटअप केलेला आहे त्याची मला एक कॉपी द्यावी.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. म्हणजे सॅन्क्शन झाल्यानंतरची कॉपी द्यायची की सॅन्क्शन झाल्या अगोदरची कॉपी पाहिजे?

**रिटा शाह :-**

सॅन्क्शन झाल्यानंतरची कॉपी द्यावी.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**जयंत पाटील :-**

मला याच विषया संबंधित बोलायचे आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. याच्यामध्ये कुठल्या जजने स्टे दिला होता, आपल्याला काही कल्पना आहे का? नसेल तर जोपर्यंत माझी माहिती अशी आहे की, आपल्याकडे जे विधी अभियोक्ते आलेले आहेत. कोणी कोणी त्यांना अनाडी कोर्ट म्हटले होते? म्हणजे ते अनाडी कोर्टात होते म्हणून तसे म्हटले होते. मला वाटते असे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी असे म्हटले होते. आपल्याकडे येण्या अगोदर ते जज होते. त्यावेळेला या शहरातील अनधिकृत बांधकामे आणि चुकीच्या गोष्टींना याच आमच्या जजसाहेबांनी बऱ्याच कामाला स्टे दिलेला आहे हे कदाचित या सभागृहाला माहिती नसेल. म्हणजे ज्यांनी या शहरामध्ये प्रश्न निर्माण केले तेच आता या शहराचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण त्यांना बोलावले आहे. ही गोष्ट खरी आहे का की, त्यांनी आपल्या शहरातील कामांना स्टे दिलेला आहे. माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत.

**मा. आयुक्त :-**

असे आहे की जजच्या कॅपॅसिटीमध्ये त्यांनी काय कामकाज केले त्याचा आपण आता आढावा घेण्याचे कारण नाही.

**जयंत पाटील :-**

कारण का नाही?

**मा. आयुक्त :-**

ते आता महापालिकेच्या वतीने केसेस करित आहेत. त्याच्यामध्ये आपली बाजू मांडत आहेत.

**जयंत पाटील :-**

ज्यांनी कानफटात मारले. त्यालाच आमचा कान चोळायला आम्ही बोलावले आहे.

**मा. आयुक्त :-**

तो अर्थ असा नाही.

**जयंत पाटील :-**

म्हणजे त्यांनी त्यावेळी चुकीचे निर्णय दिले. ते आता मान्य करतील का की, ते निर्णय चुकीचे होते म्हणून.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे निर्णय चुकीचे होते असे म्हणता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

कसे काय म्हणता येणार नाही?

**मा. आयुक्त :-**

एखाद्या न्यायाधीशाने घेतलेला निर्णय हा चुकीचा की बरोबर याचे कमेन्ट आपण करणे योग्य नाही.

**जयंत पाटील :-**

दुसरे जज असते तर माझे काही म्हणणे नव्हते.

**मा. आयुक्त :-**

दुसऱ्या केसलासुध्दा स्टे देतातच ना. आज योगायोगाने ते आपले विधी सल्लागार आहेत.

**जयंत पाटील :-**

त्यांनी जे प्रश्न निर्माण केले. ज्यांनी या घटना घडविलेल्या आहेत त्यांना आपण इकडे आणून आपल्या डोक्यावर बसविलेले आहे. हा आमच्या विकास आराखड्यातील रस्ता बाधित होता. कदाचित त्यांनी त्या केसला स्टे दिला असेल. कसे काय ते प्रश्न सोडवतील? अशा बऱ्याचशा गोष्टी या शहरामध्ये घडलेल्या आहेत. त्यांनी स्टे दिलेला आहे. आपण मान्य करता. अशा घटना घडल्या असतील तर ते या शहराला हा अभियोक्ता असो योग्य आहे का? त्या काळामध्ये घडलेल्या घटना मला मान्य आहेत. ते त्यावेळेला जज होते. तेच आता ते प्रश्न कसे सोडवतील याबद्दल विचार या सभागृहाने करावयाचा आहे.

**रिटा शाह :-**

याबद्दल मी एक बोलू इच्छिते की, जेव्हा कोर्टात म्हणजे मी कोर्टाचे काही बोलत नाही. माझ्याकडे जे नॉलेज आहे त्या हिशोबाने कोर्टात कुठलीही केस दाखल झाली ती केस अधिकृत असु दे की अनधिकृत असू दे पहिल्यांदाा असे वाटते की, नॅचरल जस्टीस म्हणून त्यांना स्टे देतात. पण आता प्रश्न जजचा नाही. आपण या कामासाठी नेमलेल्या ॲडव्होकेटचा प्रश्न येतो. त्या ॲडव्होकेटने काय केले? आपल्याकडे किती कागदपत्रे मागवून घेतली? आणि ते स्टे व्हॅकेंट करण्यासाठी त्यांनी काय धावपळ केलेली आहे? आणि काय अर्ग्युमेन्ट केले? हे या संदर्भात मी बोलते. आपण जे रुलिंग दिले त्याबद्दलचे विचारते की, त्याच्यामध्ये ॲडव्होकेटने काय केले ही भूमिका महत्वाची असते. कारण जज आहे ते जजमेन्ट देतात. ते आर्ग्युमेन्ट करित नाहीत.

**मा. आयुक्त :-**

आपण कारवाई केलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी आपले अभिनंदन केलेले आहे. आपण ते दोन वर्षात सर्व करुन घेतले. आपण तुमच्या अगोदरचा पिरियड म्हणजे तुम्ही असे बोलणार की, मी माझे दोन वर्षाचे सांगणार आणि पुढचे नाही सांगणार. मग पुढचे कोण सांगणार? आता मी विचारणार आणि मला दोन वर्षाचा जवाब नाही पाहिजे. ७ वर्षे का लटकली तो जवाब पाहिजे. मग तो जवाब कोण देणार? पण असा मुर्ख क्वेशन करुन काही अर्थ नाही पण तो महत्वाचा प्रश्न आहे. कारण आपण ९ वर्षे एका ॲडव्होकेटला फीज दिलेली आहे. ९ वर्षापर्यंत आपण त्या ॲडव्होकेटला फीज देउन त्यांनी कुठल्याही एका केसमध्ये आपल्याला जो आपल्या शहराचा महत्वाचा प्रश्न आहे त्याबद्दल त्यांनी काहीच कारवाई करुन दाखविली नाही. तर अशा ॲडव्होकेटला पॅनलच्या बाहेर काढायचे अशी माझी सुचना मांडत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयुक्त साहेब कायदेशीर बाब आहे. मा. महापौर मॅडम, आपले जे विधी सल्लागार आहेत. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे ते जर त्यावेळेला जज होते आणि त्यांनी तसे निर्णय दिलेले असतील तर आता आपण ही जी केस लढवित आहोत त्या केसमध्ये आर्ग्युमेन्ट आपल्या वतीने कोण करतो हे स्पष्ट करणे गरजेचे आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ती केस संपली.

**प्रफुल्ल पाटील :-**

इतर जर शहराच्या बाबी असतील म्हणजे याच साहेबांनी, विधी सल्लागारांनी जर जज असताना जजमेन्ट दिलेले असतील किंवा स्टे दिलेले असतील अशा सगळ्या मॅटरमध्ये आर्ग्युमेन्ट करताना किंवा रिटर्न स्टेटमेन्ट फाईल करित असताना कुठेही त्यांचा उल्लेख येता कामा नये. नाहीतर

समोरच्या प्रतिवादींचा वकील असे म्हणणार की, माय लर्नेट फ्रेन्ड ओनली गिव्हन दी स्टे. व्हेन यु आर जज नाउ हाउ वुई कॅन आर्ग्यु विथ दीस? असे करित असताना त्या केसचा निकाल कधी आपल्या बाजूने लागणार नाही. म्हणून आपण याची काळजी घ्या.

(प्र. सचिवांनी प्रश्न क्र. २ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

साहेब, परत तोच क्वेशन अराईज होतो की, कुठली एक व्यक्ती होउन संपूर्ण मिरा भाईंदर शहराचे सभागृह प्रशासन आणि शासन दोघांचे नाव म्हणजे आपले खराब झालेले आहे. कारण नाईक साहेब असताना जेव्हा हा प्रश्न मी सभागृहामध्ये विचारला होता तेव्हा नाईक साहेबांनी दुसऱ्याच दिवशी जाउन ते कनेक्शन कापले. परंतु, त्या बिल्डरने शासन आणि प्रशासन सर्व कायदे हातात घेउन त्यांनी स्वतः जाउन ती नऊ कनेक्शन लावून घेतली आणि नंतर तो कोर्टात गेला आणि कोर्टात जाउन स्टे आणला की, आहे तसे असू द्या असे त्यांनी स्टे आणलेला आहे आणि आपण काहीच करु शकत नाही आणि त्या केसला आता अडीच-तीन वर्षे व्हायला आली. अडीच वर्षे झालेली आहेत. मग अडीच वर्षे त्या केसला झाली. त्याच्यामध्ये पुन्हा प्रश्न अराईज होतो की, त्या ॲडव्होकेटने काय केले, जजने काय केले की, कोर्टाने काय केले ते विचारत नाही. आपण ठेवलेल्या ऑफिसरने काय केले, ते मी विचारते. त्याने कायदा हातात घेउन कनेक्शन लावून घेतले आणि त्याच्यानंतर त्यांनी स्टे आणला. मग आता या शहरामध्ये कोणीही व्यक्ती उठेल आणि कायदा हातात घेउन नंतर जाउन स्टे आणेल. मग कायदा आणि व्यवस्था राहिली कुठे? शासन आणि प्रशानाची इज्जत राहिली कुठे? हा महत्वाचा प्रश्न ह्याच्यामध्ये आणि ह्या गोष्टीचा लवकरात लवकर स्टे कसा सुटेल? आणि ती कनेक्शन कशी कापण्यात यावी आणि आपण ह्याच्यामध्ये दिलेले आहे की, त्या जागेची कागदपत्र उपलब्ध करण्यासाठी त्यांनी काहीतरी पत्रव्यवहार केलेला आहे. गौरव गार्डनची जी जागा आहे. त्या जागेच्या बाहेर जे गार्डन आहे ते शासन आणि प्रशासन आपण दोघेही जाणतो की, ती जागा कोणाची आहे? त्याच्यामध्ये बांधून केलेले अनधिकृत गाळे, शॉपिंग ते सुध्दा अनधिकृत आहे. ते सर्वांना माहिती आहे. शासन आणि प्रशासन दोघांनाही माहिती आहे. मग आपले शासन आणि प्रशासन तुम्ही आणि आम्ही दोघे मिळून आपण काय करता? आपण ठेवलेल्या पॅनेलवर ॲडव्होकेटने काय केले? तो जवाब मला पाहिजे. कोर्टाने आणि जजने काय केले तो जवाब मला नाही पाहिजे.

**अशोक पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आत्ताच सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमने सांगितले की, शासन आणि प्रशासन, तर कृपया मी त्यांना सुचित करतो की, शासन म्हणजे आम्ही आम्हांला याबाबतीत नक्कीच काही माहित नाही.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, मुद्दाम शासन आणि प्रशासन बोलले. कारण डायसवर कमिशनर साहेब बसतात ॲज वेल ॲज महापौर आणि उपमहापौर जे शासन आहे. ह्या गोष्टीसाठी फक्त सन्मा. सदस्या रिटा शाह वाकिफ आहे आणि इतर सदस्य वाकिफ नाही असे नाही. मी सांगते ती जागा कलेक्टर लॅन्ड होती. तिथे जर शॉपिंग निर्माण झाले तर सर्व नगरसेवकांना माहिती आहे तिथे गार्डन झालेले आहे. तिथे मिरा भाईंदर महानगरपालिका तिथे बोर्ड लावावे असेदेखील मी मागे मिटींगमध्ये बोलली होती. ते आजपर्यंत लावले गेले नाहीत, जे आपले काम आहे. आपण शासन आणि प्रशासन दोघे मिळून महापालिका चालवितो. ते आपले काम आहे. अजून ते प्रशासनाने करायला पाहिजे. पण प्रशासनाने ते केलेले नाही. प्रशासनाद्वारे ठेवलेले ॲडव्होकेट पॅनेलवर आहेत. ते आपल्याकडून बरोबर केसबद्दल फीज वसुल करतात. ते फिज वसुल केल्यानंतर आतापर्यंत किती स्टे आपल्याकडे व्हॅकेंट झाले. अनधिकृत बांधकामाला लगेच जाउन स्टे मिळतो. फार गावात चर्चा आहे की, आपले ऑफिसर त्यांना अक्कल देतात की, जाउन कसा अनधिकृत बांधकामावर स्टे घ्यायचा. असे मी कोणावर इलिगेशन लावत नाही. गावात चर्चा आहे ती चर्चा करण्याचा येथे अर्थ नाही. पण अशी चर्चा आहे की, आपलेच लोक त्यांना अक्कल देतात की, कोर्टात जाउन स्टे कसा आणायचा आणि अनधिकृत बांधकाम असे वाचवायचे. हे गौरव गार्डनला दोन वर्षे झाली ही गोष्ट आहे. सध्या काशीमिरा रोडवर सर्व शासन आणि प्रशासनामध्ये बसणारी सर्व व्यक्ती आपण गाडीद्वारे, पायी, रिक्षाद्वारे आपण येतो. दोन्ही साईडला इलिगल बांधकाम चालू आहे. कोण ग्राउन्ड प्लस थ्री बांधतो. शनिवारी बांधकाम चालू असते. रविवारी बांधकाम चालू असते. कोण पडदे लावून बांधकाम करतो. सन्मा. सदस्य मोहन पाटील स्थायी समिती अध्यक्ष हे आम्हाला रोडच्या सर्व्हेसाठी घेउन गेले होते. तेव्हा आम्ही त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर सदर विषय स्थायी समितीवर आणायचा असे ठरले होते. तेही आले नाही आणि आता आपण गौरव गार्डनबद्दल मी दुःख व्यक्त करते. कारण हा प्रश्न दोन-अडीच

वर्षानंतर आलेला आहे. पण सध्या झालेले अनधिकृत बांधकाम काशिमिरा दोन्ही साईडला जेव्हा ऑफिसरने विचार केला तेव्हा नाईक साहेबांनी त्याच्या रोड वायडिंगमध्ये गाळे गेले म्हणून त्यांना परमिशन दिलेली आहे. किती परमिशन दिली? किती बाय कितीची परमिशन दिलेली आहे? काय ३-३ माळे बांधायची परमिशन त्यांना प्रशासनाने दिलेली आहे का? हे सर्व प्रश्न उद्भवतात. म्हणून ह्या गौरव गार्डन बिल्डर यांनी कायदा हातात घेउन शासन आणि प्रशासनाची जी मजाक उडविलेली आहे. त्याला शिक्षा मिळण्यासाठी ह्याच्यावर आपण ठेवलेले जे ॲडव्होकेट आहे. लगेच हे स्टे कसे उठवायचे त्याबद्दल आपण कार्यवाही करायची नाहीतर ह्या केसवर आपण जो ॲडव्होकेट ठेवलेला आहे त्याला काढून दुसऱ्या ॲडव्होकेटककला ठेउन लगेच हा स्टे कसा व्हॅकेंट होणार तशी कार्यवाही करायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम एक प्रश्न विचारते. सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम आपल्याशी संबंधित आहे. मला फक्त एवढेच विचारायचे आहे की, गौरव गार्डनचे गार्डन कोणाचे आहे?

**रिटा शाह :-**

महापालिकेचे गार्डन आहे.

**प्रभात पाटील :-**

मग तिथे बोर्ड का लागत नाहीत? कमिशनर साहेबांनी याचे उत्तर द्यावे की, ते गार्डन कोणाचे आहे?

**रिटा शाह :-**

जागा कोणाची आहे?

**प्रभात पाटील :-**

जागा आपली असेल तर गार्डन आपले होउ शकते. त्या जागेसंबंधी त्यांनी उत्तर द्यावे की, जागा कोणाची आहे? मग गार्डन कोणाचे आहे?

**रतन पाटील :-**

जागा कोणाची आहे? डेव्हलपमेन्ट कोणी केलेले आहे? तसे त्यांना अधिकार दिलेले आहेत. याचासुध्दा खुलासा व्हावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडमनी या ठिकाणी जो दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. दिलीप पोरवाल या संदर्भातील गौरव गार्डनचे बिल्डर आहेत आणि त्यांचे कनेक्शन आपण तोडलेले होते. तोडलेले कनेक्शन परत त्यांनी लावून घेतले आणि तातडीने स्टे याच्यामध्ये मिळवून घेतला. ही वस्तुस्थिती सभागृहापुढे आतापर्यंत आलेली आहे. याच्यामध्ये श्रीमती अनुराधा आपटे या कोर्टामध्ये हजर होतात. वेळोवेळी ज्यावेळी त्या तारखा लागतात त्यावेळेला त्यांना त्या ठिकाणी हजर रहावे लागते. एखादी केस किती वर्षे कोर्टामध्ये आहे याच्यावर त्या वकिलाचे मानधन ठरत नाही. कारण केसचे जे मानधन आहे, ते ठराविक असते. त्याच्या स्टेजप्रमाणे आपण मानधन देतो. रिटर्न स्टे दाखल करण्याच्या स्टेजची वेगळी. त्यानंतर फायनल आर्ग्युमेन्टच्या वेळेची वेगळी अशा प्रकारे त्यांच्या ज्या दोन-तीन स्टेजेस आहेत. त्याच्यामध्ये एक लम्पसम अमाउन्ट त्या केसमध्ये आपण देत असतो. प्रत्येक हेअरिंगला आपण त्यांना वेगळे मानधन देत नाही. याचाही मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छितो. दुसरी गोष्टी जी आहे की, त्याच्यामध्ये स्टे आहे. स्टेसाठी ज्या ज्या वेळेला सुनावणी झाली त्या त्या वेळेला कोर्टामध्ये आपले ॲडव्होकेट हजर राहिलेले आहेत. त्याच्यामध्ये स्टे दाखल केलेले आहेत. ते इललिगल कनेक्शन आहे. हे कोर्टाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. परंतु, कोर्टामध्ये इतक्या केसेस प्रलंबित असतात की, त्यामध्ये आपल्या केसचा नंबर यायला थोडासा उशीर लागला. ९-९ वर्षे केसेस प्रलंबित राहतात. तर आपण त्याच्यामध्ये फारसे काही करु शकतो असे मला वाटत नाही. दुसरा जो प्रश्न सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम यांचा होता. त्या ठिकाणची जी गार्डन आहे ती कोणाची आहेत?. या संदर्भात मी खुलासा करु इच्छितो की, ती जागा जी आहे ती शासकीय जागा आहे आणि शासकीय जागेवर त्यांनी ती गार्डन उभी केलेली आहेत. त्याच्यामध्ये महापालिकेच्या कुठल्याही फंडातून खर्च झालेला नाही आणि जर त्याच्यावर काही कार्यवाही करायची असेल ती जिल्हाधिकाऱ्यांनी करावी. ते गार्डन आहे. ते बांधकाम अशा स्वरुपाचे नाही.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की आयुक्त साहेबांनी केलेले निवेदन नक्कीच ते अपुऱ्या माहितीवर आहे. या सभागृहातच त्यांचे निवेदन झाले होते. त्याच्यावर मोठी चर्चा झालेली होती.

**मा. आयुक्त :-**

खर्च झालेला नाही असे मी म्हटले आहे.

**रोहिदास पाटील :-**

ती जी गार्डन डेव्हलप केलेली आहेत, नगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. नगरपालिकेने कशी परवानगी दिली याबद्दल याच सभागृहात आम्ही प्रश्न विचारला होता की, जेव्हा ही जागा जिल्हाधिकाऱ्यांची आहे. त्याला नगरपालिकेने कशी परवानगी दिली? त्यावेळी ती परवानगी सभागृहात दाखविण्यात आलेली होती. म्हणजे आपण जे निवेदन केले की, त्याला जिल्हाधिकारी कार्यवाही करित नाही. तर पहिल्यांदा नगरपालिकेने त्याला परवानगी दिलेली आहे.

**तुळशिदास म्हात्रे :-**

त्याला डेव्हलप करण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

मग ती परवानगी जिल्हाधिकाऱ्यांनी द्यायला पाहिजे होती. आपण का दिली? त्या परवानगीचा अधिकार आपल्याकडे कसा आला?

**तुळशिदास म्हात्रे :-**

आयुक्त साहेब ही गोष्ट अशी आहे की, जेव्हा ही परवानगी आपण नगरपालिका असताना दिलेली आहे. ही आपल्याकडून त्यांना परवानगी दिलेली आहे. त्याच्यावर मी आपल्याला बरेचसे बोललेलो आहे. आपल्याला बराचसा पत्रव्यवहार केलेला होता. त्याच्यानंतर तो कारभार बरेच दिवस थांबलेला होता. पुन्हा ते सुरु झाले. ते गार्डन जे बांधलेले आहे ती अक्षरशः सरकारी जागा आहे. त्याच ठिकाणी आता तिथे झुणका भाकर केन्द्र चाललेले आहे. ते पण आपल्या महानगरपालिकेच्या जागेत म्हणजेच शासनाच्या जागेत बांधलेले आहे. दुसरी गोष्ट आपण जे मघाशी सांगितले की, जो स्टे झाला. साहेब, स्टे लगेच कोर्टात मिळत नाही. दोन-चार दिवस तरी लागतात. जेव्हा आपल्याला माहिती पडते कनेक्शन लागले गेले तेव्हा दुसऱ्या दिवशी ती कापायला हवे. म्हणजे आपल्या लोकांनी त्यांना कुठेतरी मदत केलेली आहे. यातील असा भाग होता.

**रिटा शाह :-**

साहेब तसे नाही. जेव्ही मी सभागृहात या कनेक्शनबद्दल वाद घातला. दुसऱ्या दिवशीच नाईक साहेबांनी सकाळी आठ वाजता जाउन ते कनेक्शन कापले होते. परंतु, त्या बिल्डरने कोर्टात जायच्या अगोदर आपण जे रुलिंग दिले. त्यामध्ये आपण जे शब्द बोलले नाही की, ते कोर्टात जायच्या अगोदर प्रथम त्यांनी कनेक्शन लावून घेतली आणि कोर्टाने नंतर स्टे दिला होता की, जसे आहे तसे ठेवा. पण कापलेली कनेक्शन होती. तसे ठेवायला पाहिजे होती. कापलेली कनेक्शन होती तेव्हा कोर्टात जायला पाहिजे होते. पण त्यांनी कायद्याला हातात घेउन त्या हिशोबाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची, शासनाची आणि प्रशासनाची मजाक उडवून कायदा हातात घेउन तुम्ही कापलेले कनेक्शन लगेच लावून घेतली आणि नंतर कोर्टात गेलेला आहे. असे तिथे घडलेले आहे. त्याच्यावर आपण काय गुन्हा दाखल केला आहे. त्याची माहिती मला द्यावी. आपण पोलिस स्टेशनला त्याबद्दल केस दाखल केलेली आहे का? गुन्हा दाखल केलेला आहे का? मग आपण त्याच्यावर गुन्हा का दाखल केला नाही?

**मा. आयुक्त :-**

आता कोर्टाचा निकाल लागल्यानंतर परत आपल्याला कार्यवाही करता येईल.

**रिटा शाह :-**

साहेब, ८ वाजता कनेक्शन कापून घेतली. मला माहिती आहे कारण मी त्या जागेवर उपस्थित होते. ८ वाजता कनेक्शन कापून घेतली. ९ वाजता त्या इसमाने कनेक्शन लावून घेतली. ते सर्वांना माहिती पडले आणि तो ११ वाजता कोर्टात गेला. ५ वाजता त्याला स्टे भेटला आहे. मग एवढ्या पिरियडमध्ये आपल्या एकाही ऑफिसरने जाउन पोलिस एन.सी. केलेली नाही, त्याच्यावर गुन्हा नोंदविला नाही.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

फक्त एक मिनिट सांगतो की, ज्या गोष्टी कळत नकळत होतात या महापालिकेच्या हद्दीत आता टाटा इंडिकॉमचे जे बुकिंग चाललेले आहे. साहेब, त्याला कोणी परवानगी दिली का? टाटा इंडिकॉमचे मार्केटिंग चालू आहे. ह्याला आपण कोणी परवानगी दिली. या सहज गोष्टी होतात. त्याच्यावर चर्चा होते आणि आपण जे समजतो की, ते कोण विचारतच नाही. जर सभासदांनी विचारले

नाही तर पत्रकार आहेत. पत्रकारांनी विचारले नाही तर कोणीतरी सज्जन माणसे आहेत या शहरात. शहराची आता उत्थान होत चाललेले आहे. त्यामध्ये अनेक माणसे बोलणारी आहेत. मग ती अनेक लोक जी विचारतात या सभागृहातील कोणतेही सदस्य आता उत्तर देउ शकणार नाही. त्यांना एन.ओ.सी. दिली की नाही दिली. आपण आता आयुक्त म्हणून आणि आता सभागृह चालू आहे. आपण एक मिनिटच त्याच्यावर उत्तर द्यावे की, त्याला परवानगी दिली आहे की नाही?

**रिटा शाह :-**

साहेब, हा माझा प्रश्न अधुरा राहिलेला आहे. पुढच्या महासभेत घ्यावा.

**मा. आयुक्त :-**

मी त्याला अनौपचारिकरित्या परवानगी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही आम्हाला कार्यकर्त्यांना म्हणजेच आम्ही त्याच्यावर मत व्यक्त केलेले नाही की, तुम्ही १० वाजल्यापासून १ वाजेपर्यंत नागरिकांनी यावे आणि सुज्ञ नागरिक इथे येत होते. त्यांच्या सोयीनुसार येत होते. हे सगळे आम्ही चुपचाप सहन करीत आहोत. पण याचा अर्थ असा नाही की, तुम्हाला कोणी विचारु शकत नाही. काही सदस्यांनी विचारले, काही संस्थांनी विचारले. पण आता जे तुमचे चाललेले आहे, आता एका बाजूने तुम्ही नागरिकांना बंद केले दुसऱ्या बाजूने ठेकेदार चालू आहेत. दुसऱ्या बाजूने अनेक माणसे तुम्हाला सभागृहात दिसतात. त्याच्याही पलिकडचे की, अधिकारी किती उपस्थित आहेत. ११ ते १ मध्ये अधिकाःयांची उपस्थिती नाही. काय तुमचा हेतू आहे? ह्याचा खुलासा होत नाही आणि शिष्टमंडळ जेव्हा भाग घेते, शिष्टमंडळ जेव्हा तुम्हाला भेटते तेव्हा तुम्ही सांगता आम्ही गटनेत्यांची बैठक घेउ, सभासदांना विश्वासात घेउ. मग आधी का चुक करता? आम्ही सौजन्याने विचारतो. आता तुमच्या कामकाजाबद्दल आम्ही डोक्यात राग घेणार नाही. महापौरांच्या कामकाजाबद्दल आम्ही राग घेणार नाही. आम्ही जाता जाता अपमान करणार नाही. पण हे चाललेले आहे ते गंभीर चालेले आहे. तुम्ही कुठेतरी दखल घ्या.

**रिटा शाह :-**

साहेब, हा जो गौरव गार्डनचा प्रश्न आहे. त्याच्यामध्ये माझे अजून दोन-तीन प्रश्न आहेत. जी माझी शंका आहे ती पुढच्या महासभेत घ्यावी.

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराची तासिका संपली.

**रोहिदास पाटील :-**

हे जर योग्य नसेल तर आमची रिक्वेस्ट आहे की, तुम्ही कोणीही संबंधित अधिकाऱ्यांना पाठवा आणि ते बंद करा. आपले हे पावित्र्य टिकवा. हे कार्यालय आहे, सभागृह आहे. आम्ही कोणताही आग्रह धरत नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्र. सचिव :-**

आज खालील सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत. उमा सपार, हेलन गोविंद, प्रकाश ठाकूर, भानु भगवान पाटील, परशुराम पाटील, आसिफ पटेल.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

आणखी चालविणाऱ्यांना देते. तरी काही गोष्टी शहरासाठी ज्या आहेत त्या आपल्याला स्विकारणे भाग आहे. फक्त याच्यातील धोका असा आहे की, कुठलाही प्रकल्प हाती घेताना सुरुवातीपासूनच दक्ष राहून तो तोट्यात चालणार नाही, तो झिरो तोट्यावर असेल अशा स्वरुपाची जिद्द, अशा स्वरुपाचे नियोजन आपले संभाव्य स्थापित होणाऱ्या समितीने करायला पाहिजे. म्हणून या प्रस्तावाचे मी समर्थन करित आहे. हा प्रस्ताव मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेवावा आणि त्याचे वाचन सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस करतील.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य सभागृह नेते लिओ कोलासो साहेबांनी जे काही वक्तव्य केले त्याच्यात माझा काही उल्लेख केला की, हा ठराव झाला. आम्ही उपसुचना मांडलेली त्यासाठी लक्षात ठेवा की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी ही उपसुचना मांडली की, १० लाखाचे अधिकार त्यांना होते. पण ते याच्यात नमुद केलेले नाही.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम २(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतुक संस्था, पुणे (सी.आय.आर.टी.) यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर सखोल चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या विचारात घेता परिवहन सेवा सुरु करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवा सुरु केल्यास नागरीकांना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देता येईल. तसेच यामुळे मिरा भाईंदर शहराचा विकासही साधता येईल.

प्रकरणी केंद्रीय रस्ते वाहतुक संस्था, पुणे यांच्या अहवालावर सखोल चर्चा करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम ३४२(२)(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम स्थापन करणेंस ही सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

या प्रकरणी प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी यास ही मंजुरी देत आहे.

**दिनेश नलावडे :-**

सदर ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

हा ठराव कुठल्या पध्दतीने करता यावर प्रथम आज चर्चा होणे भाग आहे. आपण कुठल्या संस्थेला द्यायचा किंवा आपण आपल्या महानगरपालिकेला देउन चालवायचा किंवा प्रायव्हेटायझेशनला द्यायचा याचा निर्णय व्हायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मॉरस शेठ आजच्या महासभेपुढे जो प्रस्ताव होता. फक्त परिवहन उपक्रम चालविण्याकरिता महासभेची मंजुरी. आता पुढच्या ज्या काही बाबी आहेत.........

**मॉरस रॉड्रिक्स :-**

पहिल्यांदा हा निर्णय घ्यावा. त्यानंतर स्थापना करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

तशा प्रकारचा विषय नाही.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

प्रथम निर्णय कुठल्या विषयावर करावा याला सर्व नगरसेवक बोलतील. जी समिति आली त्यांनी आपल्याला दाखविलेले आहे कुठली प्रॉफिटमध्ये आहे, कुठली लॉसमध्ये आहे. पहिले त्याच्यावर आपण आधी कार्यवाही करावी. आपल्याला कुठला निर्णय घ्यायचा आहे. प्रायव्हेटायझेशनला द्यायचे आहे, कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर द्यायचे आहे किंवा आपण चालवायचे आहे. आज तो निर्णय झाला पाहिजे. समिती तयार झाल्यानंतर निर्णय कोणावर येणार नाही. समितीवर निर्णय राहिल. १२ मेंबरची समिती काय करणार ते त्यांना माहिती. म्हणून ते आपले उजेड लावतील.

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स यांनी या ठिकाणी काही सुचना मांडलेल्या आहेत. आपण यापूर्वी सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी एक ठराव मांडून त्याचे अनुमोदन केलेले आहे. या ठिकाणी ठराव आपल्यासमोर आलेला आहे. सन्मा. सदस्य मॉरस

रॉड्रिक्स यांनी चांगली सुचना या ठिकाणी मांडलेली आहे. सुचना स्वागतार्ह आहे. परंतु, आपण या सभेमध्ये परिवहन समिती स्थापन करण्याच्याबाबतीत आपण विषय आणला होता आणि त्यामध्ये आपल्याला काय तोटे, काय फायदे आणि कोणत्या पध्दतीने हे असेल अशा पध्दतीचा या ठिकाणी झाला. त्यांचे सी.आय.आर.टी.चे या ठिकाणी सल्लागार आलेले आहेत. त्यांचे प्रतिनिधी आले. त्यांनी आपल्याला ही माहिति दिली. सर्व सन्मा. सदस्यांनी त्याच्यात सहभाग घेतला होता. मी या ठिकाणी एवढेच सांगेन की, आपण परिवहन समिती स्थापन करतो. त्याप्रमाणे परिवहन समिती स्थापन झाल्यानंतर परिवहन समिती कंट्रोलिंग करणार आहे. ती चालविणार आहे. ते पॉलिसी ठरवतील की, आपण या बसेस खाजगीकरणातून चालविल्या पाहिजेत किंवा स्वतः घेउन चालविल्या पाहिजेत. कारण सदस्य स्वतः घेउन चालविणार. त्यांनी जर विचार केला की, आपल्याकडे फन्ड ॲव्हेलेबल नसेल तर आणि आपण महापालिका त्यांना फन्ड देउ शकत नाही. म्हणून सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्सजी मी एवढेच सांगेन की, हे काम संपूर्ण त्या समितीचे असेल आणि समिती ठरवेल. आपण चर्चा केली की, आपल्याला, सर्वांनाही फायनान्शिअल बोजा आपण सहन करु शकत नाही. आपल्याला या शहराला बरीच सुविधा द्यायची आहे आणि हे खाजगीकरणाच्यामार्फत करावे असाही आपला आग्रह असेल ह्या पध्दतीचे वातावरणसुध्दा या सभागृहाचे झालेले आहे. तरी सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स मी आपल्याला विनंती करिन की, हे संपूर्ण कामकाज जे आहे ते परिवहन समिती करिल आणि ती परिवहन समिती स्थापन झाल्यानंतर हे संपूर्ण कामकाज आपल्या महानगरपालिकेच्या अखत्यारितून त्यांची संपूर्ण स्वायतत्ता असते. त्यांना जर काही बाबी लागल्या आणि आपले जर काही पॉलिसी मॅटर असतील तरी आपण तसा ठराव पारित करुन त्यांना सांगू शकतो की, अशा पध्दतीने शहराला बोजा येणार नाही. शहराला काही हानीकारक ठरणार नाही अशा पध्दतीने आपण त्यांना सल्ला देउ शकतो. तरी आपण परिवहन समितीवर सोपवायचे आहे. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मेयर मॅडम, आपल्या परवानगीने मी बोलत आहे. प्रकरण क्र. ५५ सन्मा. सदस्य सभागृह नेते यांनी त्यांच्या भाषणात अगोदरच बोलले आहे की, एवढी काय घाई? त्यांच्या वाक्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. कारण याच जिल्ह्यातील लगतच्या महापालिका पाहता कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, ठाणे महापालिका या महापालिका अस्तित्वात आल्यानंतर जवळजवळ १५ वर्षे, १० वर्षे, ५ वर्षे म्हणजे त्या महापालिका पूर्णपणे मॅच्युअर्ड झाल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम झाल्यानंतर या सर्व शहरामध्ये आपल्या लगतच्या शहरामध्ये, लगतच्या महापालिकामध्ये बसच्या ज्या परिवहन सेवा आहेत. त्या थोड्या थोड्या स्टेप बाय स्टेप या प्रमाणात त्यांनी सुरु केलेल्या आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये तर त्यांनी काही विशिष्ट स्वतःच्या गाड्या ठेवलेल्या आहेत आणि काही गाड्या भाडे तत्वावर दिलेल्या आहेत. म्हणजे बी.ओ.टी. तत्वावर दिलेल्या आहेत. जेणेकरुन जर यदाकदाचित ही परिवहन सेवा बंद पडली, ही परिवहन सेवा खाजगी तत्वावर घेतलेली बंद पडली तरी आपल्या स्वतःच्या सेवेमध्ये असलेल्या गाड्या आपण महापालिकेला नागरिकांची, प्रवाशांची गैरसोय होउ नये म्हणून वापरतात. माझी या सभागृहाला कळकळीची, नम्र विनंती आहे ह्याच्यामध्ये कुठलेही राजकारण न करता आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती आपण डोकावून पाहिली पाहिजे. कारण आता आपल्याकडे जे आस्थापनेवर व्हेइकल्स आहेत, आपल्याकडे जो स्टाफ आहे त्याची नेमकी काय परिस्थिती आहे. व्यवस्थित आहे की नाही? पुढच्या ठरावावर आम्ही आणखी बोलू. आपल्याकडच्या आताच्या व्हेइकल्स साध्य परिस्थितीत आपण आपले सांभाळू शकत नाही. फोर व्हिलर्स, सिक्स व्हिलर्स हा एक नंबर झाला. नंबर २ म्हणजे आज आपल्या शहरामध्ये ७९ किलोमीटर एवढे क्षेत्र व्यापलेले आहे. याच्यामध्ये भाईंदर पश्चिम सोडले तर जवळजवळ ७५ ते ८० टक्के क्षेत्र हे बी.ई.एस.टी. आणि टी.एम.टी. या उत्तम सेवा देतात. एखादी घोडबंदर कोपऱ्यापासून उपमहापौरांच्या गावापासून ते दहिसर चेकनाक्यापर्यंत ते थेट आपल्या मिरा रोड आणि भाईंदर पूर्वच्या रेल्वे स्टेशनपर्यंत या सेवा उत्तमपणे देत आहेत. याच्यात कधीही खंड पडला नाही. कधी नागरिकांनी त्या बसेस अडविल्या नाहीत. जो काही त्यांचा तिकिटचा दर आहे. तो दर ते खुशीने भरतात आणि या सेवेचा ते उपभोग घेतात. सांगायचा दृष्टिकोन असा आहे की, भाईंदर वेस्ट हा फक्त या सेवांपासून केवळ रेल्वेच्या फाटकाकरिता वंचित राहिलेला होता. यापुढे म्हणजे रेल्वेचा फाटक, रेल्वे क्रॉसींगपर्यत परंतु भविष्यात तसे होणार नाही, भविष्यामध्ये आपला आता ब्रीज झालेला आहे. त्याकरिता त्या सेवा भाईंदर पश्चिमेलासुध्दा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असताना आपल्या डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये हा किंवा या नकाशामध्ये, शहरामध्ये मी तर म्हणतो पुढच्या भविष्यातील २० वर्षाचा आपण विचार करुन हा नकाशा पूर्ण बनविला. प्रशासनाने चांगल्या प्रकारे बनविला. आजचे सभागृह नेते त्यावेळी नियोजन समितीचे सभापती होते. त्यांची जी बुध्दि आहे, त्यांची कार्य करण्याची पध्दती आहे. त्यांनी परिपूर्ण

असा त्यावेळी तो विकास आराखडा बनविलेला होता. दुर्दैवाने भविष्यामध्ये २० वर्षानंतर आपली महापालिका होईल. आपली एक चांगली परिवहन सेवा होईल. त्याकरिता टर्मिनेशनल पॉईन्ट, पिकअप पॉईन्ट आणि जे काही तुमचे शेडस् आहेत किंवा जे आपल्याला स्टॉप्स लागतील, म्हणजेच बस डेपो. याचा कुठेही याच्यामध्ये उल्लेख नाही. फक्त एकच बस डेपो उल्लेख आहे. तो म्हणजे एस.टी. बस डेपो सर्व्हे नं. ७२२. आजच्या तारखेला त्या बस डेपोचे पझेशन एस.टी. महामंडळाकडे आहे. एस.टी महामंडळ कदापी ती जागा देणार नाही. कारण बी.ई.एस.टी.च्या जागेमध्ये त्यांचे रिझर्व्हेशन जिकडे जिकडे आहेत. ते त्यांनी सोडलेले नाहीत. ती सर्व रिझर्व्हेशन त्यांच्याकडे राहणार आहेत. आज परिस्थितीच एवढी वाईट आहे की, या शहरामध्ये रस्ते दुथडी भरुन वाहत आहेत. कुठेही पार्किंगची व्यवस्था नाही. शहरामध्ये भाईंदर पूर्व, पश्चिम, मिरा रोड, पेणकरपाडा या विभागामध्ये महापालिकेच्या स्वतःच्या जागा म्हणजे ज्या आरक्षित करुन आपण आपल्या ताब्यात घेउ त्याचा मोबदला देउ आणि त्या जागा आपण जर ट्रान्सपोर्टकरिता त्या वापरल्या म्हणजेच बस स्टेशन करिता किंवा कशाकरितासुध्दा म्हणजे पार्किंगला वगैरे अशा प्रकारच्या कुठल्याही जागा प्रोव्हिजन आपल्याला उद्या करिता नाही, आजकरिता नाही आणि भविष्यातसुध्दा नाही. कमिटी बनेल, स्थापन होईल, ती ॲक्ट होईल. पण त्याच्यामध्ये पुढे जे सगळे प्रॉब्लेम क्रिएट होणार आहेत. जे नवीन नवीन ह्याच्यामध्ये जे आपले प्रश्न उपलब्ध राहणार आहेत. त्याकरिता आपली महापालिका सक्षम आहे किंवा नाही ह्याचा शांतपणे विचार केला पाहिजे. आता सन्मा. सभागृह नेते उत्तनला राहतात. आजच्या तारखेला त्यांच्या उत्तनच्या इकडे बस डेपो एवढा आतमध्ये नेवून ठेवलेला आहे की, तिथून बस यायलाच जागा नाही. कारण आतमध्ये सगळे गावठण आहे. गावठण तोडून रस्ते झालेले आहेत. हे तुम्ही आणि आम्ही राजकारण आपण कधी बघितलेले नाही. नागरिक सहन करित नाहीत. तरीसुध्दा संपूर्ण गावठणाच्या पलिकडे नेवून तो उत्तनचा बस डेपो टाकलेला आहे. चांगल्या चांगल्या सरकारी जागा सुटलेल्या आहेत. त्याच्यावर कुठलेही रिझर्वेशन घेतलेले नाही. मेन म्हणजे आपला परिवार वाढतो तशी आपली एकाची चार घरे होतात अशी आपली अवस्था झालेली आहे आणि रहायला, त्या गाड्या ठेवायला जागा नाही अशा परिस्थितीमध्ये हे सर्व दोन्ही डेव्हलपमेन्ट प्लॅन २० वर्षापूर्वी भविष्याचा विचार करुन केलेले. बघितले तर त्याच्यामध्ये सुईच्या पॉईन्ट ठेवण्याएवढीसुध्दा आपल्याकडे या प्रयोजनाकरिता आजच्या तारखेला जागा नाही. जशी बजेटमध्ये प्रोव्हिजन नसते तशी जागेची प्रोव्हिजन नसताना आपण हा सर्व उपद्व्याप करतो. माझेसुध्दा स्पष्ट मत आहे आमचा ठराव येणारच आहे. ठराव तयार आहे की, भाईंदर पश्चिमेला जर आपण बी.ई.एस.टी.ची मागणी केली आणि बी.ई.एस.टी. प्रशासनाला जर तो प्रस्ताव दिला तर ही सेवा तीन महिन्यात आपण काही न करता उपयोगी पडेल. आपल्याला ते लोक स्वेच्छेने देतील अशी आमची या सभागृहाला सुचना आहे. प्रवाशांची सोय झाली पाहिजे. बी.ई.एस.टी. आली तर आमच्या इकडच्या भाईंदर पश्चिमेच्या सर्व वृध्द लोकांना मुंबईपर्यंत नेण्याची सोय होईल ही माझी एक सुचना आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी यापूर्वी बी.ई.एस.टी. ची सेवा पश्चिमेकडे नेण्यासाठी प्रयत्न चाललेले आहेत. त्यावेळी आमच्याकडे रिप्रेझेन्टेशन केले. महापौरांकडे रिप्रेझेन्टेशन झालेले आहे की भविष्यात या महापालिकेची परिवहन सेवा येणार असेल तशी जर शक्यता असेल तर तुर्त बी.ई.एस.टी.ला पश्चिमेकडे येण्यासाठी परवानगी देउ नका. हे आपले सक्षम आणि आपल्याला माहिती आहे आपण आता बी.एस.टी. चे समर्थन करित आहात की बी ई.एस.टी. या भागामध्ये यायला पाहिजे. तर आम्ही आपल्या मताशी सहमत नाही. या शहरासाठी स्वतःची परिवहन व्यवस्था पाहिजे अशा मताचे आम्ही आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेते साहेब जर आपण सध्या आपली व्यवस्था नाही आणि भाईंदर वेस्टला बी.ई.एस.टी. आणण्याचा विरोध करित असाल तर आम्ही या गोष्टीला निषेध करतो.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर झाला.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्हाला ठराव मांडायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला टाका.

**रोहिदास पाटील :-**

प्रस्तावाला सुरुवात-करते वेळी सांगितले की, प्रशासनाचे याच्यावर स्पष्ट मत पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगितली. महापालिका स्थापन होउन अडीच वर्षे झालेली आहेत. उपविधीची चर्चा करुन महापालिकेकडे उपविधी पेश होत नाहीत, पटलावर येत नाहीत. शासनाकडेसुध्दा जात नाहीत. आपल्या सभागृह नेत्यांचे काय उद्दिष्ट आहे तेच कळत नाही.

**लिओ कोलासो :-**

या शहरातील सामान्य नागरिकांना चांगली आणि सेफ सेवा उपलब्ध व्हायला पाहिजे असे आमचे उद्दिष्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जेव्हा परिवहन समिती स्थापन करणार. आपल्याकडे उपविधी नाही. आता परिवहन सेवा सुरु झाली पाहिजे. परंतु, आपण सांगितले बी.ई.एस.टी. भाईंदर वेस्टला नको म्हणजे तुमचा हेतु चांगला नाही.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

सुविधा लेने की इन लोगोंकी इच्छा नही। हम लोगोने परिवहन सेवा देने का उपयोग क्या है? शहर को परिवहन सेवा देनी चाहिए। कमसे कम आज तो नही हो रही है। बस कमसे कम रोडपे नही चलेगी। बस चलने के लिए कमसे कम ६ महिने या एक साल लगेगा। आपने इतनी बडी स्तुती की। सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबने स्तुती की। मेरा आपको स्पष्ट निवेदन है। आपने जो ठराव किया है उसके फेव्हरमे की परिवहन सेवा होनी चाहिए। आज जब भाईंदर पश्चिम को १९९६ मे बस सांताक्रुझ से शुरु की थी तब भाईंदर वेस्ट मे ओव्हर ब्रीज नही था। उसके लिए हमने यहाँपर टेम्परारी बस स्टॉपका निर्माण रातोरात करने की कोशीश की लेकिन ब्रीज ना होने की वजहसे हम भाईंदर पश्चिम के लिए सुविधा नही दे पा रहे थे। मै आपसे यह स्पष्ट कहना चाहता हूँ। शहर का, पब्लिक का भला हो। आप उन कामोंमे अडंगा तो मत लगाईये। आपकी विचारधारा ठिक है। मेरे कहने का मतलब है की, विरोध करना इनकी आदत बन गई है। आज इतना बडा रोड हमने बनाया। जो १२० मीटर लंबा रोड है। उसके लिए कमसे कम यहाँ की बस सेवा होगी तो शहर मे अच्छा मॅसेज जाये की हम लोग विकास की तरफ बढ रहे है। आपने इतना बडा रोड बनाया। फ्लाय ओव्हर बनाया। ॲडिशनल रोड को मिट्टी डालने की भी आप सुविधाएँ दे रहे है। उसमे जो बस सेवा सबकी मेनिफेस्टो मे पेन्डिंग है। बस हम चलायेंगे बोर्ड यह लगायेंगे। अभीभी है, बस आप चलायेंगे बोर्ड इनका लगेंगा। मेरे कहने का तात्पर्य है की, कही ना कही तो हम एक जगह रहे है तो हम सब मिलकर चला रहे है। मेरे कहने का मतलब इतनाही है मॅडम, यह लोग आधा-आधा घंटे बोलते है। मैने आपसे बोलने के लिए परमिशन माँगी थी।

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण साहब झुठ बोलने की मर्यादा रखो। आप अपने पितरो को पानी नही दे सकते। तो पब्लिक को आप क्या पानी देंगे।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आप कमसे कम सुनिये। मै आपका विरोध नही कर रहा हुं। आदत है उसको बता रहा हुं।

**शिवप्रकाश भुदेका :-**

हमको मालुम है की, आपको झुठ बोलने की आदत है।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इस शहरको परिवहन सेवा अत्यावश्यक है। आज आपका जो ठराव पास किया है। हम सब लोग जो विकास चाहते है, इस शहर का भला चाहते है। हमने जो भी ढाई साल पहले वायदे किये है उनको पुरा करना चाहते है। तो इस शहर को परिवहन सेवा बहुतही आवश्यक है। मेरा आपसे निवेदन है उन सब भाईयोंसे भी निवेदन है आप विकास की बात किजिए। आप इस तरह विनाश की बात क्यो करते है? घोडबंदर हायवे स्ट्रीट लाईट का काम हमने किया और बोर्ड आप लगा देते हो।

**मिलन म्हात्रे :-**

आपने बहनोंको निवेदन नही किया है। भाईयों को निवेदन किया है।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

ठिक है। यह विरोध की बात है। आप उस काम मे तेज है। मेरा आपसे फिर एक बार निवेदन है अभी सभा सुधार न हो तो आप हमारे विकास के कामोमे अडंगा मत डालिये। अगर आपको दुबारासे राजनीती मे आना है तो हमारे विकास के कामोंको अडंगा मत डालिये और अच्छी तरहसे हमे सहयोग दिजिए। इस शहरकी जो पब्लिक सुन रही है। हम जब चुनके आते है तब तो बडे-बडे वायदे करते है। यह हॉल मे बाहर लोग सुन रहे है। यह क्या मॅसेज देंगे की, हर चीज पर

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी उठ जाते है। पौना घंटा लेक्चर देते है। हर बातपर सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी उठ जाते है और एक घंटा लेक्चर देते है। नतीजा झीरो होता है। नतीजा कुछ नही होता है। नतीजा यह होता है की, यह मॅटर अटक के रह जाता है। आज हम विकास के मुद्दोंको पास करेंगे। शहरमे एक अच्छा मॅसेज जायेगा की, हमने परिवहन सेवा को पास किया। मॅडम, मेरा निवेदन है की, इस परिवहन सेवा को सबके संमती से पास करने की बात की जाए। धन्यवाद।

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीची सभा चालवली का? तुमच्याच नगरसेवकांनी विकासाच्या कामाला रोडा घालून मिटींग स्टे केली. स्थायी समितीची सभा रद्द का पडली?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

यह आधा घंटेसे पीछेसे चिल्लाते है। इन्होंने क्या आधा घंटे बोलने का ठेका लिया है?

**मिलन म्हात्रे :-**

एक महिना हो गया। स्थायी की मिटींग क्यों नही हुई?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

यह नगरसेवक चुनकर नही आ सकता है।

**मिलन म्हात्रे :-**

आप विकास की बात करते है। नगरसेवक क्यो भडके? स्थायी समिती की मिटींग क्यों नही हुई? इसका पहले जवाब दिजिए।

**महेन्द्रसिंग चौहाण:-**

इन लोगोने शहर के विनाश के अलावा कुछ काम नही किया।

**मिलन म्हात्रे :-**

आपके लोग क्यों भाग गये? राष्ट्रवादी के लोग क्यों भाग गये?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

एक ठेकेदारके हिसाब से काम कर रहे हो।

**मिलन म्हात्रे :-**

स्टँडिंग कमिटी का परसो का ठराव क्यों नही पूर्ण हुआ।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब सभागृहामध्ये सर्व नगरसेवक आहेत. सर्वांना बोलायची इच्छा असते.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी एकट्यांनी ठेका घेतलेला आहे का?

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही बोलता तेव्हा लोक मध्ये बोलतात का?

**मिलन म्हात्रे :-**

हे विकासाच्या गोष्टी करतात. स्थायी समितीची सभा रद्द का झाली? परवाची सभा का झाली नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मध्ये कोण बोलले?

**मा. उपमहापौर :-**

प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आपल्याबद्दल अत्यंत आदर या सभागृहाला आणि या शहराला आहे. आपण थोडे शांत रहा. दोन लोक बोलत असताना मलाही या विषयात बोलायचे होते. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेब बोलल्यानंतर मला बोलायचे होते. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब फक्त आपण एकटे बोलू शकता किंवा आपल्याला एकट्यांना बोलण्याचा अधिकार आहे हा आपला गैरसमज झालेला आहे. प्रत्येकाला बोलण्याचे अधिकार आहेत. मला सर्व काही कळते या विषयात राहू नका.

**रोहित सुवर्णा :-**

हे विकासाची गोष्ट करतात.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा तुम्ही जोरात बोलल्यावर रडल्यासारखे वाटता. गप्प बसा. तुम्हाला फार कळते हे सभागृहाला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विकासाच्या गोष्टी चालल्या आहेत. तर उत्तर द्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे गप्प बसा. आपल्या बोलण्याची मर्यादा लक्षात ठेवा. तुम्ही किती बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

हे पण उत्तर तर द्या.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला कशाला उत्तर पाहिजे. तुम्ही गप्प बसा.

**मिलन म्हात्रे :-**

ते कशाला मध्ये येतात. विकासाची गोष्ट आहे.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहात तुम्हाला एकट्याना बोलता येते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण यांनी आक्षेप केलेला आहे. म्हणजे एका नगरसेवकांवर ज्या पध्दतीने जातीचा किंवा अन्य गोष्टीचा उल्लेख होतो. त्या पध्दतीने त्यांनी कटाक्ष केलेला आहे. तुम्ही निर्णय घ्यावा. दुसरी गोष्ट त्यांनी मेनिफेस्टोची गोष्ट केली. आता मी एकएक गोष्टीचा खुलासा करणार आहे. भारतीय जनता पक्षाची ये रघुकुल रित सदा चली आई। प्राण जाये पर वचन न जाये। आम्ही या शहराला बी.ई.एस.टी. आणून दिलेली आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मॅडम, इन्हे बोल लेने दिजिए। मुझेभी दो मिनिट बोलने का मौका दिजिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या शहराला सर्वात प्रथम बी.ई.एस.टी. आणण्याचा मान जर कोणाला असेल.

**केशव घरत :-**

मा. मंत्री महोदय श्री. गणेश नाईक साहेब यांनी बी.ई.एस.टी. आणली.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

बी.ई.एस.टी. हमने लाई। बोर्ड इन्होने लगाये।

**केशव घरत :-**

किती खोटे बोलतात? सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल बी.ई.एस.टी. मा. मंत्री महोदय श्री. गणेश नाईक साहेब यांनी आणली. फुकटचे श्रेय घेण्याचे तुमचे काम चालले आहे.

**मा. महापौर :-**

सब्जेक्ट काय आहे? आणि तुम्ही बोलतात काय? खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो काहीही बोलेल.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आप बिलकुल गलत माहिती दे रहे है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल तुम्ही खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे निवेदन चालू आहे. मी कोणाच्या निवेदनामध्ये उठलेलो नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी महापौर मॅडम आपल्याला विनंती करित आहेत. तुम्हाला बेशिस्तपणासाठी बाहेर काढले पाहिजे असे तुम्हाला वाटते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हो. बाहेर काढा.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला ह्या विषयावर बोलायला दिलेले आहे. ज्या विषयावर बोलायचे आहे त्या विषयावर बोला ना. तो विषय सोडून राष्ट्राच्या विषयावर का बोलता? देशाचा विषय सोडून मिरा भाईंदरच्या विषयावर बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हो मिरा भाईंदरच्या विषयावर बोलतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम मला जरा बोलायला परवानगी द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, मेनिफेस्टोची गोष्ट होती.

**मोहन पाटील :-**

साहेब, मी काय बोलतो? उपमहापौरांना तुम्ही बसा बोलायला सदस्यांना अधिकार आहे का? डायसवर बसलेल्या पदाधिकाऱ्यांचा आपण सन्मान केला पाहिजे की नाही. मग आपण आपले कर्तव्य विसरता कामा नये. सदस्य इथे गोंधळ करित असतील तर आपण ...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ताली दो हाथसे बजती है। एक हाथसे नही बजती है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण खाली बसा.

**मोहन पाटील :-**

आम्ही तुम्हाला बोललो का? सन्मा. उपमहापौरांना तुम्ही बसा बोलण्याचा अधिकार आपल्याला आहे का? ही काय कामकाजाची पध्दत आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल तुम्ही खाली बसा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी दोन मिनिटे बोलतो.

**मा. महापौर :-**

बस झाले. खूप झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही बोललोच नाही. मी तुमचा मान ठेवतो.

**मा. महापौर :-**

तुम्ही नेहमीच बोलता. तुम्ही ऐकता की नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम मी दोन मिनिटे बोलू इच्छिते. कुणाचे काम आम्ही केले आणि बोर्ड ह्या लोकांनी लावले. तुम्ही काम करा आणि बोर्ड लावा. सिग्नलची कामे आम्ही केली आणि बोर्ड तुम्ही लावलेले आहे. बोर्ड आधी तुमचे लागले. आमचे बोर्ड लागले नाहीत. आधी बोर्ड तुम्ही जाउन लावले. विकासाची कामे करा आणि बोर्ड लावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, कृपया सभागृहात शांतता राखावी असे मी माझा अधिकार नसताना सभागृहाला विनंती करतो. परिवहनसारखा उपक्रम चालू करण्यासाठी एस.टी.च्या मागे आपली धावपळ असा प्रकार होता कामा नये. आपण त्या गाडीत बसलो पाहिजे. उपक्रम चालू करण्याची ही जी योजना महापौर मॅडम, उपमहापौर आणि आयुक्त साहेबांनी आणली त्याबद्दल सभागृहातर्फे मी पहिल्यांदा त्यांचे धन्यवाद देतो. मघाशी आम्हाला अशी अपेक्षा होती की, हा जो काही गोंधळ झाला. त्यापूर्वी आम्ही अशी विनंती केली होती. सभागृहातील एका सदस्यानी मला वाटते सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी विनंती केली होती की, आपण याच्यावर एक निवेदन करावे. म्हणजे एकंदरीत जो काही गोंधळ झालेला आहे. तो गोंधळ होणार नाही आणि आमच्या अपेक्षेप्रमाणे सभागृह नेत्यांनी निवेदन केलेलेच नाही. पण स्थायी समितीचे सभापती मोहन पाटील यांनी निवेदन केले. ह्या निवेदनातून आम्हाला काही बाबी स्पष्ट झालेल्या नाही आणि म्हणून अशा प्रकारचा गोंधळ कदाचित उठला असेल. मी त्या गोंधळामध्ये जात नाही. परंतु, सी.आय.आर.टी. या नामांकित संस्थेला आपण हा अहवाल सादर करण्याचे काम दिलेले होते. एकंदरीत सी.आय.आर.टी.चा अहवाल आपल्याकडे प्राप्त झाल्यानंतर सगळ्या सदस्यांनी त्याच्यावर वाचन केले असणार आणि त्यांनी ज्या चार पद्धती सांगितल्या त्या चार पध्दतीतील नेमकी कुठली पद्धत अवलंबायची हा विषय माझ्या दृष्टिने आणि सभागृहाच्या दृष्टिने आज महत्वाचा आहे. या ठिकाणी चार पद्धतीमध्ये मिरा भाईंदर महापालिकेला जर

हा स्वतःचा उपक्रम चालू करायचा झाला तर साधारण ५० कोटीच्या आसपास त्यांना त्याच्यामध्ये भांडवल गुंतवावे लागेल. दोन कोटीचे वार्षिक नुकसान आहे असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरी बाब त्यांनी हायर बेसीसवर परिवहन सेवा सुरु करावी असे जे सांगितले. त्याच्यामध्ये आपल्याला साधारण एक कोटीच्या आसपास फायदा होईल असेही त्यांनी सांगितले. तिसरे त्यांनी ए.ओ.सी.सी.च्या बाबतीत जे काही स्किमच्या बाबतीत ऑपरेटर नेमायचे आणि त्याच्यामार्फत ही सेवा सुरु करायचे असे जे ठरविले त्याच्यामध्ये त्यांनी ४४ लाखाचा फायदा दाखविला. एकंदरीत ह्या सगळ्या पद्धतीचा विचार करायला गेलो तर सी.आय.आर.टी.ने महापालिका जर स्वतः चालू करील तर त्याला किती भाग भांडवल गुंतवावे लागेल याची माहिती दिली. म्हणजे भाग भांडवल गुंतवायचा भाग आला म्हणजे मग कशासाठी खर्च आहे तर डेपो बांधा, केन्द्र बांधा, बस स्टॉप बांधा, सर्व्हिस सेन्टर बांधा आणि हे सगळे करित असताना ह्या सगळ्या प्रस्तावित जागा त्या डि.पी. प्लॅनमध्ये आहे की नाही याची शहानिशा करा. तुम्ही ज्या बसेस चालविणार त्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे सी.एन.जी. ज्या बसेस चालविणार की कुठल्या चालविणार याचा उल्लेख त्यांनी कुठे पण केलेला नाही. म्हणजे जसे त्यांनी अहवालामध्ये चांगल्या बाबींचा उल्लेख केलेला आहे. महत्वाच्या बाबींचा उल्लेख केलेला आहे. तशा महत्वाच्या बाबींचा त्यांनी उल्लेख केलेलाच नाही. म्हणजे कुठल्या पद्धतीमध्ये कारण आम्हाला पर्यावरण कायदा लागू झालेला आहे. मॅडम, सुप्रीम कोर्टाच्या त्याच्यामध्ये डायरेक्शन्स आहेत. १ मे पासून तुम्हाला १०० टक्के सी.एन.जी.च्या गाड्या वापराव्या लागतील. सी.एन.जी.च्या गाड्या आल्या म्हणजे या गुंतवणुकीच्या प्रमाणामध्ये फरक झाला. दुसरी बाब डी.पी. प्लॅनमध्ये म्हणजे आमच्याकडे अशी कुठल्याही प्रकारची आरक्षणे नाहीत. ती आरक्षणे आहेत आणि नसतील तर ती टाकावी लागतील. तिसरी बाब या संपूर्ण ए.ओ.सी.सी.च्या ह्याच्यामध्ये जो कोणी ऑपरेटर येईल त्याला किती गुंतवणूक करावी लागेल. कारण पालिका त्याला काही मदत करणार नाही. मॅडम, पालिका पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याचे काम हे त्या ऑपरेटरवर टाकणार. आता ऑपरेटरने जरी पैशाने तयारी दाखविली तरी त्याला कशा प्रकारच्या जागा कुठे आणि किती? त्याचे क्षेत्रफळ काय आहे? त्यांना साधारण भुसंपादन करायचे म्हटले किंवा विकत घेण्याचे म्हटले किंवा भाड्याने घ्यायचे झाले तर किती याच्यामध्ये ऑपरेटरवर नेमकी किती आर्थिक जबाबदारी पडणार आहे. यामध्ये कुठेही माहिती नाही. म्हणून मघापासून मी त्यांना ते विचारत होतो की, सी.आय.आर.टी.ने ए.ओ.सी.सी.च्या प्रपोजलला जर आम्ही मान्यता दिली तर त्या ऑपरेटरला किती खर्च करावा लागेल याची माहिती नाही आणि त्याच्यामुळे हा एकंदरीत सगळा गोंधळ उडालेला आहे. आपण परिवहन सेवा चालू करण्याचा उपक्रम जो ठरविलेला आहे किंवा जे चालू करायचे निश्चित केलेले आहे. कलम २५ नुसार ते तर स्वागतार्ह आहे. परंतु, आपल्याला जर तो उपक्रम टिकवायचा असेल एक गोष्ट सी.आय.आर.टी.ने अजिबात सांगितलेली नाही की, संपूर्ण खाजगीकरणातून जर एखादा ऑपरेटर कुठल्याही कारणास्तव तो मध्येच सोडून गेला. तर आमची नाचक्की होईल की, पालिकेने परिवहन सेवा सुरु केली आणि आता ही बंद पडली. कारण अशा प्रकारे १०० टक्के खाजगीकरणाला कुठेही चांगला प्रतिसाद मिळाला नाही. बंगलोरमध्ये जे चाललेले आहे की, १०० बसेस आमच्या आणि बाकीच्या बसेस लागल्या तर त्या हायर बेसीसवर चालवा किंवा सगळ्या बेसीस आमच्या आणि हायर बेसीसवर त्याला द्या. आयुक्त साहेब, जे काम केलेले आहे त्याच्याबद्दल मी तुम्हाला १०० टक्के धन्यवाद देतो. मला माहिती आहे तुम्ही त्या दिवशी संपूर्ण दिवसभर चर्चा करित होतात. काही चर्चेत मी स्वतःसुध्दा सहभागी झालो. परंतु, ह्या चार पद्धती ज्या आहेत. कुठल्या पध्दतीने हा उपक्रम चालू करायचा हे निश्चित होणे गरजेचे आहे. म्हणून त्यासाठी सी.आय.आर.टी.चा अहवाल अजूनसुध्दा परिपूर्ण नाही आणि तो सी.आय.आर.टी.चा अहवाल परिपूर्ण करावा. कोणत्याही सत्ताधारी पक्षाने आणलेल्या कुठल्याही ठरावाला आमचा विरोध नाही. परंतु, परिपूर्ण अहवाल आल्यानंतर सभागृह निश्चितपणे त्या दिशेला जाईल. त्या निर्णयापर्यंत पोहोचेल की, कुठल्या प्रकारची सेवा आम्हाला उपलब्ध करुन घ्यायची आहे. त्याच्यानंतर पुढे ट्रान्सपोर्ट कमिटीचे फन्क्शनिंग चालू होईल. तेव्हा या सभागृहाला त्याच्यामध्ये दखल घ्यायची गरज लागणार नाही. ट्रान्सपोर्ट कमिटी कायद्याप्रमाणे ती फन्क्शनिंग करत राहिल. म्हणून मी या ठिकाणी ठराव मांडतो.

(सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम २(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतुक संस्था, पुणे (सी.आय.आर.टी.) यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर सखोल चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत परिवहन सेवा सुरु करण्यासाठी एकुण ४ पद्धतीचे प्रकार सी.आय.आर.टी.च्या प्रतिनिधींनी सभागृहाला माहिती द्यावी.

महापालिका जर स्वतःचा उपक्रम सुरु करीत असेल तर महापालिकेला मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागेल ती ५० कोटींची आहे.

हायर बेसीसवर बस घेऊन चालविल्यास पालिकेचा फायदा होईल असे प्रतिनिधींनी स्पष्ट केले.

तर ए.ओ.सी.सी. स्कीमद्वारे परिवहन सेवा सुरु करावयाची असल्यास चालकाला कशा प्रकारची व किती गुंतवणूक करावी लागेल याची माहिती मात्र सी.आय.आर.टी.ने दिली नाही. तसेच मध्येच सेवा बंद केली तर जबाबदार कोण?

सी.आय.आर.टी.च्या प्रस्तावात बस थांबे, डेपो, बस सर्व्हिस मेन्टेनन्सच्या बाबींचा उल्लेख करुन आर्थिक बाबी स्पष्ट कराव्यात व पुन्हा हा प्रस्ताव महासभेपुढे निश्चित कोणत्या प्रकारचा उपक्रम चालू करावा हे ठरवावे असा मी ठराव मांडत आहे.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने अनुमोदन झाले.

**याकुब कुरेशी :-**

अनुमोदन याच्या अगोदरसुध्दा झालेले आहे.

**लिओ कोलासो :-**

प्रश्न तसा नाही. परिवहन सेवा चालू करण्याचा सत्ताधारी पक्षाने ठराव ठेवलेला आहे. जे मुद्दे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी उपस्थित केलेले आहेत ते ॲन्टिसिपेट आहेत. ते आम्ही गृहित धरुन चालत आहोत. ते अशासाठी गृहित धरुन चालत आहोत. कारण कुठले पण चार प्रस्ताव दिलेले आहेत, चार पध्दती सांगितलेल्या आहेत, त्याच्यातील कोणती मोस्ट वायबल आहे ती स्विकारा. स्विकारावी लागणार आहे. आज समिती किंवा परिवहन प्रकल्प स्थापन करण्याचा ठराव होउन लगेच पहिल्या नंबरची पद्धती आपण अंगिकारली का? असे नाही. आता ते काम त्यासाठी ५५ कलमाखाली जी परिवहन समिती येणार आहे त्या समितीने हे करायचा पाहिजे आणि त्या समितीच्या कक्षा, कायद्याच्या कक्षा किंवा अन्य गोष्टी ज्या आहेत. त्या त्यांनी पडताळून घेतल्या पाहिजेत. निरनिराळे ॲग्रीमेन्टस आहेत. कोणी ऑफर देतील त्यांच्याबरोबर चर्चा, विनिमय, सुसंवाद आणि कायदेशीर बाबींचा निचरा या सगळया गोष्टी येणार आहेत. तरीसुध्दा सत्ताधारी पक्षाने जो ठराव मांडलेला आहे. तो बरोबर आहे. सत्ताधारी पक्षातर्फे आम्ही असे खंडन करतो की, हा अहवाल परिपूर्ण नाही. याच्याशी आम्ही काही सहमत नाही. या अहवालामध्ये जे व्यक्त झालेले आहे. हे या महापालिकेची परिवहन सेवा स्थापन करण्यासाठी आवश्यक आहे. एवढे या अहवालामध्ये आलेले आहे. त्यामुळे जो मुळ ठराव मांडलेला आहे तो बरोबर आहे. जर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अन्य मंडळी यांना वाटत असेल आमची उपसुचना आहे. तर ते सभागृहाने ठरवावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब, आपण गोष्ट फार चांगली आणि सत्य सांगितले की, आमच्यासुध्दा शंका आहेत. म्हणून मघाशी मॅडम, कुठलाही विषय आपल्याकडे येतो तेव्हा असाच गोंधळ होतो. आम्ही तुम्हांनला एक विनंती करतो, जेव्हा एखादा विषय सत्ताधारी पक्षाने आणला म्हणजेच महापौर म्हणून तुम्ही आणला तर तो विषय तुम्ही जेव्हा सभागृहात आणतात तर त्याच्यावर सभागृह नेत्यांना बोलू द्या. ते चांगले बोलतात आणि समजावतात. सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब मी आपली चेष्टा करीत नाही. जर प्रशासनाने तो विषय आणला असेल तर प्रशासनाने त्या बाबींचे स्पष्टीकरण केले पाहिजे की, ही ट्रान्सपोर्ट सेवा कशा प्रकारे उपयुक्त आहे. आता त्यांनी त्यांच्या वक्तव्यात काय सांगितले की, आम्हालासुद्धा अनेक शंका-कुशंका आहेत. आता या शंका कशा राहिल्या.

**लिओ कोलासो :-**

साहेब, आमच्या ज्या शंका आहेत त्या जेव्हा परिवहन समिती येईल त्या समितीकडे मांडल्या जातील आणि त्यावेळी त्याचा निचरा होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा सभागृहाचा अधिकार आहे. सभागृह नेते या नात्याने तुम्ही बोलता. परिवहन समितीमध्ये तुमचा रोल काय असणार आहे. तुम्ही सांगा की, तुम्ही ट्रान्सपोर्ट मॅनेजर तर नसणार आहात. तुम्ही

भावी चेअरमन होणार आहात का? तर आता तुम्हाला शुभेच्छा देतो. सन्मा. सभागृह नेते म्हणून आपण रोल करतात. तेव्हा सभागृह नेत्यांनी सभागृहाला पटवून दिले पाहिजे, ही परिवहन सेवा अशा प्रकारची असावी. आता तुम्हाला शंका असतील तर तुम्हाला ते १०० टक्के पटले आहे. महापौर मॅडम, आपला हा उपक्रम चालू करण्याचा निर्णय जो तुम्ही घेतलेला आहे तो अतिशय स्तुत्य आहे. त्याच्याबद्दल मी तुम्हाला धन्यवाद पण दिलेले आहेत. फक्त कुठल्या पध्दतीने जायचे. कारण बघा कुठली एक पध्दती आपण ट्रान्सपोर्ट कमिटीवर पाठविली. आता ट्रान्सपोर्ट कमिटीच्या कॉन्स्टीट्युटबद्दल मॅडम मी बोलत नाही. नाहीतर माझे ते नेहमीसारखे लांबलचक होईल. ट्रान्सपोर्ट कमिटी त्यांचे अधिकार म्हणजे मग बजेट प्रोव्हिजन आज म्हटली तर बजेट प्रोव्हिजन काय तर ५० लाखाची आहे. तर मला हे काही सर्व बोलायचे नाही. पण कृपया मी कुठली सुचना मांडली नाही. मी ठराव मांडलेला आहे आणि त्याच्यासाठी टाईम घेउन तो प्रस्ताव पुन्हा आणावा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी अतिशय चांगली सुचना केली. मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ५ लाख २० हजार ३०१ होती. आज शहराची लोकसंख्या लक्षात घेतली तर साधारणपणे नोटिंग पॉप्युलेशन पकडून आपण साडे-सात ते आठ लाखाच्या घरात आहोत. या शहरामध्ये एस.टी. च्या माध्यमातून, बी.ई.एस.टी.च्या माध्यमातून आणि टी.एम.टी. च्या माध्यमातून या सरकारी मान्यता प्राप्त वाहतुक संस्था काम करतात. स्वतःची वाहने, रिक्षा, सहा आसनी रिक्षा अशा प्रकारे शहरामध्ये एकूण वाहतुक होत असते. भाईंदर पश्चिमेला बी.ई.एस.टी.चा सर्व्हे झाला. बी.ई.एस.टी. चालू करणार आहे. ज्यावेळेला आपल्याला आज या शहराची स्वतःची परिवहन सेवा असावी अशा मतापर्यंत आपण आलो. कारण शहराचा भाग या महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात येतो तसा चेना, वर्सोवा, काजूपाडा, माशाचा पाडा, दाचकुल पाडा, गावठण, पेणकरपाडा, घोडबंदर, राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन असे ग्रामीण क्षेत्रदेखील येते. या विस्तीर्ण शहराचा सेन्टर पॉईन्ट म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कार्यालय असे आपण पाहतो. शहरामध्ये वाहतुक करताना आपण नुसते नवघरहून एका माणसाने रिक्षाने जर भाईंदर पश्चिमेला यायचे ठरविले तर त्याला किमान दोन रिक्षा बदलाव्या लागतात. जवळजवळ सर्वच नगरसेवकांची स्वतःची वाहने आहेत. त्याच्यामुळे आपल्याला कुठलेही वाहन बदलावे लागत नाही. परंतु, सामान्य नागरिकांची शोकांतिका आहे. गावठणचा माणूस जेव्हा महानगरपालिकेच्या कार्यालयात कामानिमित्त येत असतो किंवा मिरा रोडच्या विभागीय कार्यालयात जात असतो तेव्हा त्याला फार त्रास होतो. मिरा रोड परिसरामध्ये अंतर्गत वाहतुकीमध्ये आपण पाहिले तर एका इसमाने तेथे एक शेअर बेसीसवर मिनी बस सुरु केली आणि अतिशय झोकात चालते. त्याचा चांगला धंदा आहे. लोकांना याची गरज आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये अनधिकृत रिक्षांचा फार मोठा सुळसुळाट आहे. याबाबत पोलिस स्टेशनला सर्व माहिती आहे. रिक्षावाले आपल्या मनमानी रेटने पैसा वसुल करीत असतात. भाईंदरमध्ये शेअर रिक्षा चालते. हा प्रकार मिरा रोडमध्ये पहायला मिळत नाही. एखादा माणूस रिक्षामध्ये बसला तर कमीत कमी १० रुपये जास्तीत जास्त ३५ ते ५० रुपये ७० रुपयापर्यंतचे रेट लावले जातात. हे सगळे पाहताना या शहरामध्ये स्वतःची परिवहन व्यवस्था असावी. त्याच्यासाठी चार वेगवेगळी कामे सांगितली. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव सांगितला. आज आपल्याला इथे बसल्यानंतर वाटले असेल की, तो काहीतरी वेगळा आहे की काय. परंतु, वेगळा काही नाही. त्यांना फक्त सांगायचे आहे की, आजच्या सभेत हे सगळे नको. पुढच्या सभेत पाहिजे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब हा अट्टाहास आपण करु नये. कारण आज आपण हा निर्णय घेतच नाही की, आपण कोणाला देणार आहोत. कारण मिरा भाईंदरची स्वतःची बस सेवा आपण मागणार नाही. हा शहाजोगपणा तुम्हीही मानणार नाही, आम्हीही मान्य करणार नाही. कारण आपल्याला ते न परवडण्यासारखे आहे. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी अतिशय चांगली सुचना केली की, आत्ताच आपल्याला नुकतीच महापालिका होउन अडीच-तीन वर्षे झालेली आहेत. म्हणजे आपण आत्ताच बारस धरतोय. परंतु, महापालिकेच्या आधी आपण नगरपालिकचे काम करताना नगरपालिकेच्या सभागृहात आपण सदस्य होतात. फक्त लोकसंख्या वाढली. शहराच्या आवश्यकता वाढल्या. या शहराच्या गरजा वाढल्या. म्हणून आपल्याला परिवहन सेवा आणायची आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण पुन्हा आपल्या ठरावाचा फेरविचार करावा. कारण आपण म्हणता त्याप्रमाणे पुढच्या सभेत हे सगळे विषय घ्यावेत. या सी.आय.आर.टी.ने आपल्याला स्पष्ट खुलासा केलेला नाही असे आपल्याला म्हणायचे आहे. आपल्याला ही समिती गठीत करायची आहे. समितीच्या माध्यमातून आपल्याला ठरवायचे आहे की, आपण काय करणार आहोत. मग बँगलोर पॅटर्नवर आपण बसेस चालविणार आहोत. आपल्या ऑपरेशन राहणार आहे किंवा आपल्याला त्याच्यातून काय फायदा होणार आहे. दुसरा ए.ओ.सी.सी.

जो आपल्याला प्रकार सांगितलेला आहे. त्याच्यामध्ये आपल्याला इतका फायदेशीर राहिल. हे जेव्हा आपल्याला फायदेशीर राहिले नाही तर आपली कुठल्या प्रकारची जबाबदारी राहणार नाही. ह्या सगळया वाहतुकी चालू असताना ही वाहतुक आपण स्वतःची चालू केली असताना ज्याला आपण सुपरव्हिजन करु. आपले मॉडरेशन राहिल. हे चालू असताना जर बी.ई.एस.टी.ने आपल्या गाड्या चालू ठेवल्या तर त्यात काही चुकीचे राहणार नाही किंवा बी.ई.एस.टी. लगेच तातडीने आपल्या गाड्या बंद करणार नाही. एस.टी. महामंडळाचे लोक मधल्या काळात माझ्याकडे आले होते. मला सांगितले की, सहा आसनी रिक्षा सुरु झाल्यापासुन एस.टी.ला जी काही उत्तनच्या फेरीवर जो काही धंदा मिळविला जातो तो धंदादेखील कमी झालेला आहे. कारण एस.टी.चे भाडे आणि रिक्षाचे भाडे जवळजवळ सारखे आहे. त्याच्यामुळे एस.टी पूर्णपणे लॉसमध्ये आहे. आम्ही एस.टी. भाईंदरमधून बंद करण्याच्या मनस्थितीत आहोत. याबाबतचे निवेदन त्यांनी दिले होते ते ही माझ्याकडे आहे. महापौरांच्या नावाने निवेदन होते, आयुक्तांच्या नावाने निवेदन होते. याबाबत आमची मदत मागितली, सभागृहाची मदत मागितली होती. आता उद्या जर असा प्रकार झाला तर आपली स्वतःची वाहतुक असली तर तुम्हा आम्हाला ठिक आहे. या शहरामधे अनेक शैक्षणिक संस्था आहेत. विद्यार्थ्यांना जाता येताना पुरेवाट होते. सगळे जण रिक्षामधून प्रवास करतील अशातला भाग नाही. सी.आय.आर.टी.ने आपल्याला जो अहवाल दिलेला आहे या अहवालामध्ये कुठल्या नाक्यावर किती वाजता उभे राहिल्यानंतर किती प्रवासी पायी जाणे पसंत करतात. त्याच्यात विद्यार्थी असतात. हे विद्यार्थी व्यायाम करावा किंवा इव्हिनिंग वॉक, मॉर्निंग वॉक असा काही वॉक घेण्यापेक्षा त्यात पैसे वाचविणे हे त्यांचे धोरण असते. जर लोकांचा वेळेचा अपव्यय आपल्याला टाळायचा असेल, लोकांना चांगली सुविधा द्यायची असेल, या शहराला आपल्याला काहीतरी द्यायचे आहे. विरोधात बसले म्हणून या प्रत्येक गोष्टीला विरोध केला पाहिजे या मताचे तुम्ही नाह ते आम्ही नक्कीच मानतो. आपण आपल्या ठरावाचा फेरविचार करुन आजच्या सभेत आपण हा विचार करीत नाही की, आजच आपण कोणाला तरी देउन टाकले आहे. हे देउन टाकण्याचे धोरण निश्चित करण्याचे काम पुन्हा महासभापुढे येणार आहे. तेव्हा आपण तसा निर्णय घ्यायचा आहे. मात्र या समितीला आपले कामकाज करायचा काम मिळणार आहे. म्हणून आजच्या सभेत आपण आपल्या ठरावाचा पुनश्च विचार करावा अशी आपल्याला विनंती करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. उपमहापौरांच्या विनंतीला मान देउन आपण आता जे काही सांगितले त्याच्यामध्ये शेवटचे वाक्य आपण अतिशय महत्वाचे सांगितले की, असा कुठलाही निर्णय होणार नाही की, कुठली पध्दत चालू करायची. तो निर्णय घेण्यासाठी पुन्हा महासभेकडे येवो. आता ह्याच्यामध्ये कायदेशीर बाबींचे मघाशी मी सांगितले मला त्या कायदेशीर बाबींच्यामध्ये जायचे नाही. जर आज सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी ठराव मांडला तो ठराव आज आम्ही मंजुर केला तरी या क्षणापासून ट्रान्सपोर्ट कमिटी आम्हाला स्थापन करायची आहे. ट्रान्सपोर्ट कमिटी स्थापन करतानाच आम्हाला ट्रान्सपोर्ट मॅनेजरची नेमणूक करायची आहे. तिसरी बाब ट्रान्सपोर्ट मॅनेजरची नेमणूक केल्यानंतर ट्रान्सपोर्ट मॅनेजरचे अधिकार आहेत ते तुम्हाला वाचून दाखवितो. ट्रान्सपोर्ट मॅनेजर मे वीथ द सॅन्क्शन ऑफ द ट्रान्सपोर्ट कमिटी कन्स्ट्रक्ट ऑर ॲक्वायर द ॲनी ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग कन्स्ट्रक्ट बिल्डिंग ॲन्ड वर्क पर्चेस ऑर हायर ऑर लिझ इन युवर प्रॉपर्टी ॲन्ड एक्झसाईज ॲनी ऑफ द पॉवरस ऑफ द लायसन्सी होल्डींग अ स्टेट परमिट अंडर एम.व्ही. ॲक्ट १९३९. ट्रान्सपोर्ट मॅनेजर परिवहन प्रबंधकाची नेमणूक झाल्यानंतर या सभागृहाचे अधिकार काही रहात नाही. कुठल्या प्रकारची पद्धत अवलंबायची? काय काय करायचे? हे सगळे ट्रान्सपोर्ट मॅनेजरचे काम असणार आहे आणि ट्रान्सपोर्ट कमिटीचेसुद्धा काम असणार आहे. आम्ही जो आज व्यापक दृष्टिकोन या सभागृहाच्या सर्व सदस्यांच्या संमतीने चारपैकी कुठली रीत वापरायची हे आम्ही आज ठरविण्यासाठी जमलो आहोत. तेव्हा जे सगळे काम ट्रान्सपोर्ट मॅनेजरकडे होईल. कलम २५ मध्ये स्पष्ट केलेले आहे की, एकदा जर तुम्ही असे ठरविले की, ट्रान्सपोर्ट कमिटी एक उपक्रम चालू करायचा तर तो उपक्रम चालु करण्याचे ठरविल्यानंतर ताबडतो तुमची ट्रान्सपोर्ट कमिटी अस्तित्वात येणार आणि सबसिक्वेन्टली ट्रान्सपोर्ट मॅनेजर हा तुमचे काम करायला लागणार. याच्यामध्ये तिसरी बाब महत्वाची आहे की, ट्रान्सपोर्ट कमिटीला स्वतःचे बजेट असणार आहे. प्रपत्र 'ब', परिशिष्ट 'ब' मध्ये ट्रान्सपोर्ट कमिटी अशा प्रकारचे बजेट तयार करणार आहे. आता आम्ही पद्धत कुठली ठरविली नाही की, कुठल्या पध्दतीचा आम्हाला अवलंब करायचा आहे. कॉर्पोरेशन जर करायचे ठरविले तर ५० कोटी रुपये आम्हाला गुंतवणूक करायला लागेल. मग त्याच्यातील काही भाग मॅडम 'ब' प्रकारच्या बजेटमध्ये ट्रान्सपोर्ट कमिटीला त्याचे बजेट करावे लागेल. ते सादर करावे लागेल. दुसरी पद्धत अवलंबिली तर हायर चार्जेसने बस विकत घेउन त्यांना चालवायला द्यायच्या तर त्याची गुंतवणुक किती आहे? याच्यामध्ये त्यांना बजेट सादर करावे लागेल.

ते सर्वसाधारणपणे सभेमध्ये मंजुर करावे लागेल. बघा परिवहन उपक्रमाला आपण स्टँडिंगसारखे समजू नका. स्टँडिंगला सगळ्या आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी मॅडम आपण महासभेत देत असतो तुमच्यापुढे येतात. त्यानंतर त्या टेंडरवरती कार्यवाही स्टँडिंग करित असते. पण ट्रान्सपोर्ट कमिटी एक अशी स्वायत्त यंत्रणा असणार आहे की, त्यांना स्वतःचे बजेट असणार आहे. त्यांचे बजेट ते तुम्हाला न विचारता जे काही सदस्य असतील, १२ लोक जे तुम्ही निवडून दिले असतील तेच त्याच्यावर काम करणार आहेत. म्हणून बजेट प्रोव्हिजन हे करणे हे ट्रान्सपोर्ट कमिटीचे हे काम आहे. ह्या सगळ्या प्रक्रिया आजपासून सुरु होतात. मग आपण कुठला विषय कुठली रित वापरायची हे जर आपण सभागृहाच्यापुढे आणले तर ते अवैधानिक होणार आहे. म्हणून तुम्हाला फार शॉर्ट पिरियडमध्ये आपण हे पुन्हा एकदा लावा आणि हा संपूर्ण अहवाल सादर करा. म्हणून ह्या ठरावाला परत मागे घेता येणार नाही. अशी विनंती मी उपमहापौर साहेबांना करतो.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आपण जसे आता मघासपासून आपापल्या परिने प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकांनी आमची मते मांडली. ती मते मांडते वेळी साधारण एक विषय आला की, आपण अधिकारापर्यंत पोहोचलो. येणाऱ्या समितीला किती अधिकार राहतील? हे आपण करित आहोत ते काय करित आहोत? त्याचा शहराला फायदा होईल की नुकसान होईल? याचेही साधारण नगरसेवकांच्या लक्षात आले आहे. मी सकाळपासून आग्रह करतो की, आयुक्त साहेब हात बांधून का बसले ते मला समजत नाही की, एवढा मोठा पॉलिसी मॅटर. एखाद्या साध्या गोष्टीवर पुन्हा पुन्हा आग्रहाने उभे राहून ते निवेदन करित राहतात. कदाचित त्यांच्या निवेदनाची जरुरी नसते तरीसुध्दा ते करतात. आमचा आग्रह होता की, आता ज्या पद्धतीने हा विषय आलेला आहे त्याच्याही पलिकडे म्हणेन की, जितकी का कोणास ठाउक काही हेतूचा आम्ही सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांना का वाईट वाटते मला समजत नाही. त्यांच्याबद्दल आमचा कधीही गैरसमज नाही. त्यांच्या हेतूबद्दल गैरसमज नाही. त्यांची चालीरितीबद्दल गैरसमज नाही. पण तरी त्यांना भीती वाटते की, एवढी घाई कशासाठी? आजपर्यंत आपण कोणत्याही सभेला काही लिमिट नाही. ही सभा संपली म्हणजे दुसरी सभा होउ शकत नाही असे कुठे कायद्यात तरतुद नाही. ह्या महापौर काही काळासाठी आहेत याचीही जाणीव आम्हाला आहे. पण त्यांचा कार्यकाल संपायच्या आधी सभा लावा. आमचा आग्रह आहे आम्ही तुम्हाला सांगितले की, ह्याच्यात कोणतेही काळगोर घ्यायचे तुम्ही आम्हाला संधी देतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

कार्यकाल वाढवा.

**रोहिदास पाटील :-**

तसे असेल तर कार्यकाल वाढवा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचेही समर्थन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी त्यांना पुण्यालाच सांगितले कार्यकाल आणखी वाढतो ना. तर त्या काही बोलल्याच नाहीत ह्याच्यावर तो विषय नाही. आमची स्पष्ट विनंती आहे की, आज महापालिकेचे आयुक्त म्हणून प्रशासन कोणत्या मुद्यावर आलेले आहे? त्याचे मत काय पडलेले आहे? हे सभागृहाला माहिती पडले पाहिजे. सभागृहात प्रेक्षकगृहामध्ये जे लोक आहेत त्यांना माहिती पडले पाहिजे. पत्रकारकक्ष आहेत त्यांना माहिती पडले पाहिजे. हे एकतर्फी काय चालेले आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, खुलासा द्यायच्या अगोदर मी विनंती करु इच्छितो की, १.५० वाजता माझ्या माहितीप्रमाणे लंच टाईम ठेवलेला आहे आणि आता २.४५ वाजायला आलेले आहेत. एखादा नगरसेवक भुकबळी पडल्यानंतर तुम्ही लंच टाईम करणार आहात का?

**रोहिदास पाटील :-**

महत्वाचा विषय आहे. त्या विषयामध्ये आपण कशासाठी अडचण करतो ते मला समजत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील तुम्ही खाली बसा. विषय संपवून टाका.

**मा. आयुक्त :-**

मी खुलाशाला जास्त वेळ घेत नाही. फक्त सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी या ठिकाणी एक जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. महत्वाचा मुद्दा आहे. त्याचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे. परिवहन सेवा असावी की नसावी? असली तर ती फिजीबल होईल का? या

संदर्भामध्ये अभ्यास करण्यासाठी आपण सी.आय.आर.टी.ला नेमलेले होते. केन्द्र शासनाची ती संस्था आहे. आपण गटनेत्यांनी ती पाहिलेली आहे. प्रथम मी त्यांचे आभार मानतो आपल्या या सर्व सदस्यांच्या वतीने की, ते या ठिकाणी आले. त्यांनी या ठिकाणी प्रेझेन्टेशन दिले. तीन-चार ज्या त्यांनी पद्धती सांगितल्या त्या पद्धतीमध्ये सर्वात चांगली पद्धत म्हणून त्यांनी त्याची शिफारस केली की, ए.ओ.सी.सी. एवढ्या बोजड शब्दापेक्षा एक खाजगीकरणातून आपण म्हणू साध्या भाषेमध्ये की, ही परिवहन सेवा आपल्याला नागरिकांना पुरविता येणे शक्य आहे. हे त्यांच्यातील फायदे, तोटे किती? १०० बसेस जर प्लाय करायच्या ठरविल्या तर त्याच्यासाठी येणारा खर्च आपण फ्लाय केला तर किती देता येईल? लिझमधून आपण जर ॲडॉप्ट केले तर किती फायदा होईल आणि पूर्णतः खाजगीकरण केले तर आपल्याला त्यांनी सांगितले रु. १.५० पर किलोमीटरप्रमाणे आपण चार्ज लावु शकतो. १ लाख रुपये पर बस डिपॉझीट घेउ शकतो. हा जो पैसा आहे हा पैसा आपला जो परिवहन व्यवस्थापक असणार आहे त्याच्या खाली जो सुपरव्हायईजरी स्टाफ असणार आहे. मग तो ट्रॅफिकसाठी असो, अकाउन्टसाठी असो किंवा जनरल ॲडमिनिस्ट्रेशनसाठी असो. त्याच्या ज्या तीन-चार विंग आहेत. त्या तीन-चार विंगवर आपल्याला जे मिनिमम सुपरव्हिजन करायचे आहे. तर त्या सुपरव्हिजनसाठी हे सगळे असणार आहे. याचे जे डिटेलिंग आहे हे सगळे डिटेलिंग परिवहन समितीची स्थापना झाल्यानंतर त्याच्यामध्ये होणार आहे. सगळ्यात महत्वाचा प्रश्न जो सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी विचारला की, आपण जर आज पद्धत ठरविली नाही तर पुन्हा या महासभेपुढे हा विषय येणार नाही हे १०० टक्के बरोबर आहे. मात्र त्याला एक अप्रत्यक्ष चेक असा आहे की, स्वतःचे बजेट 'ब' अंदाजपत्रकामध्ये परिवहन समिती तयार करु शकते. त्यांना ते स्वातंत्र्य आहे. त्या बजेटमध्ये ते काय लिहीणार आहेत? महापालिकेकडून अपेक्षित अनुदान हा विषय तुमच्याचकडे येणार आहे. शेवटी बजेटमध्ये किती तरतुद करायची आहे ती तरतुद ही परिवहन समितीला तुम्ही वर्षभराच्या फेजमध्ये द्यायची आहे. हा त्यांच्या उत्पन्नाचा एक सोर्स आहे. जर तसे नसेल तर ते स्वतःचे उत्पन्न मिळवू शकतात. खाजगीकरणातून जायचे असेल तर तसे जावू शकतात. आपल्याला फक्त फ्लाय विनंती आहे की, आज जर आपल्याला असा निर्णय घ्यायचा असेल तर तो निर्णय घेत असताना फक्त तात्पुरती व्यवस्था जी आपल्याला करायची आहे. त्या व्यवस्थेच्या संदर्भात जो काही निर्णय घ्यायचा असेल तो घ्यायचा आहे. कारण येत्या बजेटमध्ये आम्ही त्यासाठी मिनिमम अमाउन्ट आपल्याकडे अपेक्षित धरणार आहोत. ते अंदाजपत्रक आपल्यापुढे येईल. लास्ट ईयरलासुध्दा आपण मला वाटते ५० लाखाच्या जवळपास याच्यामध्ये तरतुद ठेवलेली आहे. ही जी तरतुद आहे ही फक्त याच कॉन्स्टीट्युशनच्या संदर्भातच असणार आहे. त्याच्यापुढचे जे परिवहन समितीचे कामकाज चालणार आहे. आता सभागृहाचा एकंदरित सेन्स आहे तो खाजगीकरणाला फॉर आहे. तुम्ही त्यांना अनुदान देणे हे अपेक्षित नाही. अर्थात हा जो मुद्दा आहे हा पुन्हा सभागृहापुढे ज्यावेळेला ते बजेटमध्ये आपल्याकडून अनुदान मागतील त्यावेळेला चर्चेमध्ये येणार आहे. त्यावेळेला तुम्हाला हे अनुदान नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. मग स्वतःचे सोर्सेस त्यांना खाजगीकरणातून निर्माण करण्याशिवाय दुसरा काही पर्याय असणार नाही. त्यामुळे हा एक अप्रत्यक्ष अशा प्रकारचा चेक हा त्यांच्यावर राहणार आहे. मला वाटते बाकीच्या मुद्यांवर पुष्कळ चर्चा झालेली आहे. फिजीब्लिटीच्या बाबतीत ते बोलले आहेत की, रिक्षाने किती लोक जातात. मिनिटाला किती रिक्षा पास होतात. आपले जे इन्टरनल शहराची जी वाहतुक व्यवस्था आहे. शहरा अंर्तगत वाहतुक व्यवस्था आणि शहरामधली वाहतुक व्यवस्था याच्या संदर्भामध्ये आपण एक सुरुवात म्हणून शहरातल्या शहरात ही वाहतुक व्यवस्था नागरिकांना देऊ शकू का? अशा प्रकारचा हा विचार आणि याच्या बाबतीतील सविस्तर जे पुढचे धोरण आहे ते परिवहन समितीने आखायचे आहे. त्याच्यामध्येही आपण असणार आहोत. त्याच्यामध्ये काही एक्सपर्ट असणार आहेत. मग त्यानंतर वेळोवेळी परिवहन समितीच्या कारभाराच्या बाबतीत त्यांना द्यायच्या अनुदानाबाबत या महासभेमध्ये नक्की चर्चा होणार आहे. दरवर्षी तशी चर्चा होते. कारण परिवहन व्यवस्थापक म्हणून मीदेखील दोन संस्थांची कामे पाहिलेली आहेत. टी.एम.टी.ला मी व्यवस्थापक म्हणून काम पाहिलेले आहे. पी.सी.एम.टी.लादेखील मी व्यवस्थापक म्हणून काम पाहिलेले आहे. हे जे अनुदान आम्ही ज्यावेळेला महासभेपुढे मागतो. त्यावेळेला परिवहन व्यवस्थापकाला इथे येउन त्याच्या कारभाराचा लेखाजोगा किंवा खुलासा हा सभागृहाला दिलाच पाहिजे. तो तसा दिल्याशिवाय तुम्ही त्याला अनुदान मंजुर करत नाही. त्यामुळे एकमेकांवरती चेक अप्रत्यक्षरित्या त्या नागरिकांच्या जीवनावरती परिणाम घडवणारे परिवहन व्यवस्थेच अंग-उपांग आहेत. याबाबत चर्चाही सभागृहामध्ये नक्कीच त्या त्यावेळेला होत राहिल. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, याबाबतीमध्ये आपण निर्णय घ्यावा. धन्यवाद!

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, आजच्या या महासभेत प्रकरण क्रमांक ५५ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम २(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी केंन्द्रीय रस्ते वाहतुक संस्था म्हणजे सेन्ट्रल इन्स्टिटट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांच्याकडून आलेल्या प्रस्तावावर या ठिकाणी सर्वच सन्मा. सदस्यांनी विस्तृत आणि सखोल चर्चा केलेली आहे. सर्वप्रथम मी महापौर साहेबा आपल्याला धन्यवाद देईन. सर्व सन्मा. गटनेते या ठिकाणी आहेत त्यांनाही धन्यवाद देईन. कारण हा विषय आता या ठिकाणी सभा पटलावर आणण्यापूर्वी सन्मा. महापौर साहेबांनी सन्मा. आयुक्त साहेबांना, सर्व गटनेत्यांना विश्वासात घेउन पुन्हा येथे या ठिकाणी दौरा आयोजित केला. त्याची संपूर्ण विस्तृत माहिती परिवहन सेवा संदर्भात सन्मा. गटनेत्यांना करुन दिली आणि त्यानंतर आता या ठिकाणी सभागृहात पण जे अधिकारी आणि जे एक्सपर्ट या ठिकाणी आलेले आहेत त्यांनीही आपल्याला चलचित्राच्या माध्यमातून या ठिकाणी सर्व सदस्यांनादेखील विस्तृतपणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आता मुद्दा एवढाच राहिला की, आपल्याला या ठिकाणी परिवहन सेवा सुरु करायची आहे की नाही. तर सर्व सन्मा. सदस्य आणि संपूर्ण सभागृहाची ही भावना आहे की, आपल्याला निश्चितपणे आपण जेव्हा या ठिकाणी निवडून आलो. लोकांनी आपल्याला या ठिकाणी निवडून पाठविले तेव्हा प्रत्येकांनी आपल्या परिने आपापल्या पक्षाच्या वतीने सर्वांनी नागरिकांना आपण आश्वासन दिले होते की, आम्ही चांगल्या सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देउ. महापौरांचा जेव्हा या सभागृहात पायगुण लागला. महापौर जेव्हा या ठिकाणी आलेल्या आहेत. तेव्हापासून आपण बघतो की, मिरा भाईंदर शहराचा बऱ्याच प्रमाणात कायापालट झालेला आहे. आज मुंबईवरुन या ठिकाणी किंवा बाहेरच्या ठिकाणावरुन लोक मिरा भाईंदरमध्ये येतात. तर निश्चितपणे त्यांच्या तोंडातून चांगले वक्तव्य बाहेर निघते की, निश्चितपणे आज या ठिकाणी चांगले रस्ते झालेले आहेत. फ्लाय ओव्हर ब्रीज झालेला आहे. सर्व ठिकाणी स्ट्रिट लाईट झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत आपण नागरिकांच्या पुढच्या टप्प्यात नागरिकांना या ठिकाणी परिवहन समिती स्थापन करुन ट्रान्सपोर्ट सिस्टिम सुरु करणार आहोत. तर नागरिकांना त्याचा निश्चितपणे चांगला फायदा होणार आहे. या ठिकाणी परिवहन समिती म्हणजेच ट्रान्सपोर्ट सिस्टिम सुरु करताना एस.टी.च्या बसेस या ठिकाणी चालतात. बी.ई.एस.टी. च्या बसेस या ठिकाणी चालतात. रिक्षा चालत आहेत. खाजगी वाहनेदेखली या ठिकाणी चालतात. पण त्याचा या ठिकाणी कुणालाच याच्यावर काही ताण पडलेला नाही किंवा त्याचा त्रास झालेला नाही. किंबहुना आपल्याकडे सी.आय.आर.टी.चा रिपोर्ट आला आहे. त्यांना तुम्ही सांगितले की, आपल्या मिरा भाईंदर परिसरात ४ हजार रिक्षा आहेत. त्या अधिकृतपणे आपण जर बघितल्या तर २ हजार रिक्षा आपल्याकडे चालतात. आपण प्रत्येकाने बघितले आहे मिरा भाईंदर पोलिस स्टेशनच्या हद्दीत बघा, मिरा रोडच्या हद्दीत बघा किंवा काशीमिरा पोलिस स्टेशनच्या हद्दीत बघा. त्या रिक्षांना स्पेसिफिक नंबर टाकलेले आहेत. भाईंदर पोलिस स्टेशनने नंबर टाकलेले आहेत. काशिमिरा पोलिस स्टेशनने नंबर टाकलेले आहेत. मिरा रोड पोलिस स्टेशनने नंबर टाकलेले आहेत की, त्या जेव्हा रिक्षाना नंबर टाकलेले आहेत. त्या अधिकृत रिक्षा आहेत. बाकीच्या चालणाऱ्या रिक्षा अनधिकृत रिक्षा आहेत. सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की, या सगळ्या परिवहन सेवा सुरु केल्यानंतर नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे. आपल्याला त्यामधून चांगले महसुली उत्पन्न मिळणार आहे. या ठिकाणी दुसरी महत्वाची गोष्ट की, आपण यापूर्वीच वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन केली. महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय याच सभागृहाने घेतला. जेव्हा आपण अशी एखादी समिती स्थापन करतो. आपण जेव्हा या ठिकाणी वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन केली. महिला व बालकल्याण समिती स्थापन केली. ती समिती स्थापन करित असताना आपण त्याच्यावर निर्बंध टाकला नाही की, या समितीने हेच काम केले पाहिजे. त्या समितीने तेच काम करावे.

**रोहित सुवर्णा :-**

तुम्ही स्टँडिंग कमिटीवर राजीनामा का दिला?

**आसिफ शेख :-**

आपला आपला अधिकार आहे. जेव्हा वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन केली, महिला व बालकल्याण समिती स्थापन केली. तर त्या समितीने कुठले काम करावे हे ती समिती ठरविणार आहे. समितीला आपण बायडिंग करु शकतो का? आताच्या आता हिच कामे करा, तिच कामे करा. तर या ठिकाणी आपण जी परिवहन सेवा सुरु करणार आहोत. तर त्यामध्ये आपणच लोक असणार आहोत. ती एक वैधानिक समिती आहे. तर वैधानिक समितीने कोणकोणते निर्णय घ्यावेत ती समिती निवडुन आल्यानंतर ते निर्णय घेणार आहेत. आता आपण याच्यामध्ये फक्त तात्पुरता येथे म्हणजे ते कोणते निर्णय घेणार आहे ते बंधनकारक करु शकत नाही. वैधानिक समिती आहे. त्यामुळे सन्मा. सदस्य

हॅरल बोर्जीस यांनी जो ठराव मांडलेला आहे आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी जे त्याला अनुमोदन दिलेले आहे. ठराव झालेला आहे. याउपर संपूर्ण आणि सविस्तर चर्चा झाली सर्व सभागृहाच्या भावना ह्याच आहेत की, उपक्रम चालू केला पाहिजे. आता रित काय किंवा प्रीत काय? हे ते सदस्य जेव्हा समिती झाल्यानंतर ते ठरविणार आहेत. कायद्याने प्रत्येकाला अधिकार आहेत. ट्रान्सपोर्ट मॅनेजरची काय कर्तव्ये आहेत ती सगळी दिलेली आहे. त्याप्रमाणे ते ॲटोमॅटिक तयार होणारच आहेत. आतापर्यंत चिंता करायला हरकत नाही. कारण आपण वृक्ष प्राधिकरण समिती, महिला व बालकल्याण समिती स्थापन केली. ती स्थापन करुन त्यांनी निर्णय घेतलेला आहे तो निर्णय सभागृह मान्य करते. त्यामुळे आता ही परिवहन समिती सुरु करण्यासाठी या ठिकाणी ठराव झालेला आहे. जर सदस्यांचा परिवहनाला विरोध असेल किंवा उपक्रमाला नागरिकांना जर सुविधा द्यायच्या नसतील तर असा त्यांचा विरोध असेल तर आम्ही जो ठराव मांडलेला आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी ठराव मांडलेला आहे. तर त्या ठरावावर कृपया मतदान करण्यात यावे.

**मा. महापौर :-**

ठराव मतदानाला जाउ दे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख एक मिनिट थांबा. आपण जो ठराव मांडलेला आहे. तो ठराव आपण या सी.आय.आर.टी.च्या अहवालाला मान्यता देउन मांडला आहे ना. म्हणजे सी.आय.आर.टी.चा अहवाल आपल्याला मान्य आहे. म्हणून आपण मांडला आहे. आम्ही काय म्हटले आम्ही ठराव मांडला. दोघांमधील काय फरक आहे की, सी.आय.आर.टी.चा अहवालात आमच्या दृष्टिने सगळ्या पद्धतीचे पूर्ण स्पष्टीकरण दिलेले नाही. म्हणून अपूर्ण आहे. म्हणून तो परिपूर्ण करावा आणि परत सभागृहाला द्यावा. तुमच्या दृष्टिने असे आहे का की, तो अहवाल पूर्ण आहे, तो बरोबर आहे, योग्य आहे. म्हणून तुम्ही हा ठराव मांडलेला आहे का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब एकतर सी.आय.आर.टी.चा जो अहवाल आला. हा अहवाल जो आला आहे तो पूर्ण आहे असे समजून आम्ही स्विकारलेला आहे. आपण सांगितले की, आजच्या सभेनंतर लगेच परिवहन सेवेच्या कर्तव्याला सुरुवात होणार आणि आजचा आपला विषय संपणार. परंतु, असा प्रकार नाही. जेव्हा आपण परिवहन समितीचे सदस्य निवडतो. ते १३ सदस्य निवडल्यानंतरच या १२ व्यक्तींची नेमणूक झाल्यानंतर ती समिती काम करते. आज आपण समितीचे सदस्य नेमत नाही. तर आपण या चार पद्धती होत्या. त्या चार पध्दतींपैकी प्रायव्हेटायझेशन ही पद्धत आपल्याला जास्त सोयीस्कर वाटली. तुमचा या गोष्टीला विरोध नक्कीच नसावा. या शहरात आपण काहीतरी नवीन देतो. या शहरामध्ये शहराचा इतिहासामध्ये नवीन मानाचे पान आपण खोवत आहोत आणि त्याच्यामुळे या शहरातील लोकांना इन्टरनल वाहतुकीसाठी एक चांगला पर्याय उपलब्ध होईल. तुम्ही जर सांगत असाल हा अहवाल आम्ही पूर्ण मानतो का? तर ते त्याच्यामध्ये एक्सपर्ट आहेत. त्यांनी मांडलेल्या गोष्टी आम्ही स्विकारलेल्या आहेत. जेव्हा आपल्याला आवश्यकता वाटेल तेव्हा त्यांच्याकडून मार्गदर्शन घेउन आपल्याला आणखी डिटेल पाहिजे असेल तर आणखी डिटेलमध्ये जाउन पुढच्या सभेत जेव्हा मान्यतेसाठी हा विषय येईल तेव्हा त्याच्यावर अधिक माहिती आपण त्यांच्याकडून घेउ. आता सदस्यांनी सुचना केलेली आहे की, दोन ठराव आहेत. या दोन ठरावापैकी कुठल्या ठरावाला मान्यता द्यायची त्याच्यावर मतदान घ्यायचे. अजूनही आपल्याला वाटत असेल की, या शहराला आपण चांगले काहीतरी देउ इच्छित आहोत. तर आपण अजून ठराव मागे घ्यावा. अन्यथा मताचा विचार करुन घ्यावा.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

जब हमने एक साल पहले सी.आय.आर.टी.को यह पुरा अहवाल फिजीकल पोझीशन मे लगाने को दिया है। तो मै इसके लिए आपको धन्यवाद देता हुँ। इन लोगोने यह नही सुझाया की, यहाँ परिवहन सेवा नही चल सकती। कहने का तात्पर्य यह है की, शहरमे फिजीब्लिटी है। हम लोगों का मन था। आपका भी मन था। एक साल पहले जब यह अहवाल करने के लिए इनको चुना गया। हमने पुरा पैसा दिया। मॅडम, हम लोग कही ना कही विसंगतीयोंमे जा रहे है। हम सब लोग एकही बात चाहते है की, परिवहन समिती बने। परिवहन समिती बनने के बाद जैसे सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स साहब का जो मत है, वह मतसे भी सहमत है की, यह कमिटी मतलब बादमे कौन फायदा देगा। कौन नुकसान देगा। किसमे जादा फायदा है? वह करनेके लिए सक्षम होगी। अभी हम लोग यह डिसाईड नही करते। अभी तो इनका अहवाल संपूर्णतः नकारात्मक, सकारात्मक, फायदे का,

नुकसान का, सब कुछ हमारे हाथमे है। हम यह सोच रहे है की, परिवहन समिती बनाये और शहर को जिससे फायदा हो सके उस तरही की व्यवस्था हम करे।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, आता उपमहापौर साहेबांनी विनती केली आणि त्यांनी एक सांगितले की, कमिटी लगेच बनत नाही. मी सांगितले कमिटीच्या बरोबर ट्रान्सपोर्ट मॅनेजरची नियुक्ती होणार आणि तो त्यांच्या अधिकारामध्ये हे सगळे करणार. आपण जे आता सांगितले की, या अहवालाशी आपण सर्व सहमत आहोत. ज्यांनी ठराव मांडलेला आहे त्यांच्याशी उपमहापौर, महापौर मॅडम सहमत आहेत. या अहवालाच्या अनुरुपच आपण ठराव मांडलेला आहे. आम्ही एवढेच सांगतो की, त्यांची पद्धत निश्चित करा. आमचा ठराव काय आहे की, ती पध्दत निश्चित करा. ती पद्धत निश्चित करण्यासाठी हा अहवाल परिपूर्ण करा आणि मग हा विषय आणा. आता आपण असे म्हणता की, तुमच्या दृष्टिने हा अहवाल परिपूर्ण आहे. मी आरोप करीत नाही. तुमच्या दृष्टिने हा अहवाल परिपूर्ण आहे. या अहवालामध्ये जे नमुद केलेले आहे. ज्याच्या अनुषंगाने तुम्ही खाजगीकरणाद्वारे चालू करण्याची ही पध्दत आपण मांडली. ती बरोबर आहे का? आपण ह्या अहवालाचे पान क्र. ११ वाचा.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम सी.आय.आर.टी. का जब अहवाल है और हमारे पास बुक्स है। हम लोग भी आपके साथ कमसे कम १५-१५ सालसे इसको स्टडी करते है। जितना आपने बताया मॅनेजर की स्थापना से लेकर सारा परिवहन समिती का बताया। हम लोग क्या करते है? हमको भी उतनाही नॉलेज है। ऐसी बात नही। वह काम आपने नही दिया होता। आपके भी शासन कालमे बात निकली। तो मुझे लगता तो मै पी.पी.आर.टी. को दे देता। आप पी.पी.आर.टी. है। आपने जितनी बात बताई है उतना हम लोगोंको भी मालुम है। बुरा मत मानिये। मेरे बोलने का तात्पर्य सकारात्मक सोच है। हँसने की बात नही है। नकारात्मक सोच रखेंगे। ऐसे सी.आय.आर.टी. आप कितनी भी संस्था लाई है। किसीको पसंदही नही आयेगा। नकारात्मक सोच रखेंगे। यह सोच रखेंगे की इस शहरको व्यवस्था देनी है। इस शहरका भला करना है। इस शहर के नागरिकोंको हमे सुविधा देनी है। इसको लंबा मत किजिए। ढाई साल हो गये। इसके पहले प्रभाग समितीयों की बात निकली। सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजी मै आपको बता रहा हूँ। प्रभाग समिती की बात निकली। उसमे थोडासा योगदान डाला गया। आजतक प्रभाग समितीयाँ नही बन पायी।

**प्रफुल्ल पाटील :-**

आता हा विषय दुसरीकडे चालला आहे. सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण विषयांतर मत करो।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आज यह समिती बनाने के बाद मतलब आप कोईभी नकारात्मक बात करेंगे। मुझे लगता है इस समय सी.आय.आर.टी.की बातही नही करनी चाहिए।

**लिओ कोलासो :-**

मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो की, या विषयावर ह्या सभागृहाला सत्ताधारी पक्षाच्या वतीने जे काही इतर सहकारी सदस्यांना, इतर सहकारी पक्षांना जी काही आपापली मते मांडण्यासाठी जो वेळ द्यायला पाहिजे होता तो पूर्णपणे दिलेला आहे. सर्व शंकांचे निःरसन केलेले आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी रिजॉईन्डर म्हणून जरी पाठविले असेल तरी आम्ही सत्ताधारी पक्ष या मताचे आहोत की, हा ठराव मताला टाकण्यात यावा. जे होईल ते पाहण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे. मताला टाकण्यापूर्वी आपण सी.आय.आर.टी.चा अहवाल संपूर्ण वाचला. त्यासाठी आपण संपूर्ण सहमत आहोत असे सांगितले. त्या सी.आय.आर.टी.च्या अहवालामध्ये पान क्र. ११ मध्ये बघा. याच्यामध्ये स्पष्ट असे म्हटलेले आहे.

**मा. महापौर :-**

आता काही नाही. अहवाल मताला टाका.

**लिओ कोलासो :-**

तुमचा जो प्रश्न आहे. तो तुम्ही बघा. मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्यांना त्यांचे अधिकार मांडण्यासाठी अनेक माध्यम आहेत. त्यामुळे आता संपलेले आहे. अहवाल मांडलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मतदानाला टाकावा. सभागृह नेते मी सी.आय.आर.टी.चा अहवाल वाचून दाखवितो. माझे वैयक्तिक मत नाही.

**लिओ कोलासो :-**

तुमचे वैयक्तिक मत असू दे. पण ठराव मांडलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सी.आय.आर.टी.च्या अहवालामध्ये काय लिहिलेले आहे ते तुम्हाला सांगतो. सी.आय.आर.टी.च्या अहवालामध्ये असे म्हटलले आहे की, सध्याच्या परिस्थितीमध्ये महानगरपालिकेकडे आपली स्वतःची संघटना पर्यायी म्हणून स्विकारणे हेच जास्तीत जास्त उपयुक्त ठरते. असा एकंदरीत निष्कर्ष काढलेला आहे. सी.आय.आर.टी.ने काय निष्कर्ष काढलेला आहे की, स्वतःची संघटना करा आणि ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग चालवा. आपण कुठल्या बेसीसवर खाजगीकरण करता? हा सी.आय.आर.टी.चा रिपोर्ट आहे. म्हणून आता ठराव मांडू नका. ठराव मताला टाका. आता मताला टाका. आपण सी.आय.आर.टी.च्या पार्श्वभूमीवर ठराव मांडतात. हा सी.आय.आर.टी.चा अहवाल आम्ही स्विकारला आहे. त्यांनी सगळ्या बाबी सांगितल्या. त्या स्विकारल्या आहेत. मग त्यांचा निष्कर्ष तुम्ही मोडीत काढला का?

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ५५ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी मांडलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ठराव होउ दे. पण माझी आपल्याला एक विनंती आहे की, आपण प्रत्येक वेळेला मताला टाकूनच ठराव पारित करु नये. महापौर म्हणून आपण सदस्यांना विनंती करावी. सर्वानुमते जर हा ठराव मंजुर झाला तर निश्चितपणे या सभागृहाची शान आणि मान वाढेल. महापौर मॅडम कदाचित आपल्या शब्दांचा फरक पडत असेल तर आपण तसे करावे.

**मा. महापौर :-**

मी विनंती करीन माझा मान पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

आपण विनंती करावी अशी मी तुम्हाला सुचना करते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मॅडम, मी सुरुवातीला तुम्हाला धन्यवाद दिले. तुमचा सभागृहात अपमान करायची माझी पूर्वीही इच्छा नाही, आताही नाही, याच्यापुढे कधीही अशी मनोवृत्ती राहणार नाही. आम्ही आमच्या पूर्वीच्या अध्यक्षांचा असा कधीही अपमान केलेला नाही. काही छोट्या मोठ्या गोष्टी होतात. मॅडम, आपण आपल्या बुद्धिला हे पटले पाहिजे की, या अहवालाच्या अनुषंगाने आम्ही निर्णय घेतला. ह्या अहवालामध्ये काय लिहिलेले आहे की, महापालिकेने स्वतःचा उपक्रम चालवावा म्हणून मी मघाशी दोन तीन वेळा स्पष्ट विचारले की, आपण जर हा सी.आय.आर.टी.चा अहवाल.............

**याकुब कुरेशी :-**

त्याचबरोबर आपल्याला तीन ऑप्शन दिलेले आहेत. आपल्याला चार ऑप्शन दिलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांनी ऑप्शनच दिले नव्हते.

**मा. महापौर :-**

हा विषय समितीला घेउ द्या.

**प्र. सचिव :-**

मतदानाला सुरुवात करत आहे.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, एक मिनिट. मतदान करनेसे पहले मेरी इनसे एक शंका है। मुझे थोडा पुछने का है की, आपने जो क्राउडेड और नॉन क्राउडेड एरिया लिस्ट दी है तो आप मतदान होने के पहले पढके सुनायेंगे। यह मेरी शंका है। यह मेरा पुछने का अधिकार है। मैने अलग बात नही पुछी है। क्राउडेड एरिया और नॉन क्राउडेड एरिया आपने डिक्लेअर किया है। नॉन क्राउडेड एरिया की लिस्ट पढके बताईये। आय रिक्वेस्ट यु.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, इन लोगोने बी. पी. रोड का नाम तक बदल दिया। बाळाराम पाटील मार्ग के बदले बॉम्बे-पुना मार्ग लिख दिया। बॉम्बे-पुना मार्ग मिरा भाईंदर मे कहाँ पर आ गया।

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, एक मिनिट जरा ते वाचून दाखवितात.

**रामकृष्ण :-**

हाय ट्रॅफिकवाले पॉईन्टस् गोल्डन केमिकल्स, मिरा रोड, काशिमिरा, ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन, भाईंदर फाटक, गोडदेव नाका, भाईंदर स्टेशन, शंकर नारायण कॉलेज और अभिनव कॉलेज यह क्राऊडेड एरिया है।

**रिटा शाह :-**

और नॉन क्राउडेड एरिया कौनसे है?

**रामकृष्ण :-**

अपना बाजार, जम्मू काश्मीर बँक, एस. के. स्टोन, सिल्व्हर पार्क, ग्रीन अपार्टमेन्ट, बेवर्ली पार्क और लो ट्रॅफिकवाला बॉम्बे मार्केट, पोलिस स्टेशन.

**रिटा शाह :-**

सर, एक मिनिट रुकिये। यह बोलते है की, इनके सर्व्हे रिपोर्ट के हिसाबसे बॉम्बे मार्केट एरिया, पोलिस स्टेशन एरिया नॉन क्राउडेड एरिया है।

**रामकृष्ण :-**

नॉन ट्रॅफिक एरिया नही है।

**रिटा शाह :-**

लो ट्रॅफिक एरिया बोल रहे है। जबकी वह एरिया स्टेशन रोड के उपर है। वहाँ से आनेवाली रिक्षा, सायकल, स्कूटर, एव्हरी व्हेईकल वहाँसे जाती है।

**रामकृष्ण :-**

मॅडम, वह जनरेट नही होता है।

**रिटा शाह :-**

सिर्फ पॅसेंजर नही मिलते। ऐसा उनका बोलना है।

**प्र. सचिव :-**

पहिला ठराव सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांचा आहे आणि दुसरा ठराव सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स यांचा आहे. मी आता दुसरा ठराव पहिला मताला टाकत आहे. सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स यांनी जो ठराव मांडलेला आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

पहिला ठराव त्यांचा झालेला आहे. तो मताला घ्यावा.

**प्र. सचिव :-**

नियमाप्रमाणे दुसरा ठराव मताला असतो. सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. म्हात्रे मिलन वसंत
४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९) श्री. सिंग मदन उदितनारायण
१०) श्री. पाटील रोहिदास शंकर
११) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
१३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१५) श्री. पाटील जयंत महादेव

१६)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१७)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१८)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
१९)	श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
२०)	श्री. पाटील रतन कृष्णा
२१)	श्री. पाटील शरद केशव
२२)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२३)	श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२४)	श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२५)	श्री. मेहता नरेंद्र
२६)	श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२७)	श्रीम. शाह रक्षा एस.
२८)	श्री. जैन रमेश धरमचंद्र

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१)	श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२)	श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३)	श्री. पाटील मोहन मधुकर
४)	श्री. कोलासो लिओ इजिदोर
५)	श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६)	श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७)	श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९)	श्री. शेख आसिफ गुलाब
१०)	श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
११)	श्रीम. गोहिल शानु
१२)	श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
१३)	श्री. नलावडे दिनेश द.
१४)	श्री. पांडे हंसु कमलकुमार
१५)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१६)	श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१७)	श्री. माळी रविंद्र भीमदेव
१८)	श्री. घरत केशव रामभाऊ
१९)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
२०)	श्रीम. वाडे जिवी हिरा
२१)	श्री. गावंड आत्माराम बाळाराम
२२)	श्रीम. पाटील अनिता जयवंत
२३)	श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
२४)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२५)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२६)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२७)	श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२८)	श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२९)	श्री. खान शफीक अहमद
३०)	श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
३१)	श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
३२)	श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
३३)	श्री. पाटील रोहीदास आत्माराम

३४) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३५) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३६) श्री. शहा शशिकांत रतिलाल
३७) श्रीम. शाह रिटा सुभाष
३८) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३९) श्री. पाटील ध्रुवकिशोर
४०) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
४१) श्री. पाटील प्रेमनाथ गजानन
४२) श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
४३) श्री. पाटील मिलन गोविंदराव

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | २८ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | ४३ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | -- |
| एकूण सदस्य | :- | **७१** |

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदन :- श्री. मॉरस रॉड्रीक्स.**

**ठराव बहुमताने नामंजुर**

**प्र. सचिव :-**

दुसरा ठराव मतास टाकला, सुचक सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस आणि अनुमोदन सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असलेल्या सदस्यांनी हात वर करायचे आहेत.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९) श्री. शेख आसिफ गुलाब
१०) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
११) श्रीम. गोहिल शानु
१२) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
१३) श्री. नलावडे दिनेश द.
१४) श्री. पांडे हंसु कमलकुमार
१५) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१६) श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१७) श्री. माळी रविंद्र भीमदेव
१८) श्री. घरत केशव रामभाऊ
१९) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
२०) श्रीम. वाडे जिवी हिरा
२१) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
२२) श्रीम. पाटील अनिता जयवंत
२३) श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
२४) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२५) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत

२६) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२७) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२८) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२९) श्री. खान शफीक अहमद
३०) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
३१) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
३२) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
३३) श्री. पाटील रोहीदास आत्माराम
३४) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३५) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३६) श्री. शहा शशिकांत रतिलाल
३७) श्रीम. शाह रिटा सुभाष
३८) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३९) श्री. पाटील ध्रुवकिशोर
४०) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
४१) श्री. पाटील प्रेमनाथ गजानन
४२) श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
४३) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. म्हात्रे मिलन वसंत
४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९) श्री. सिंग मदन उदितनारायण
१०) श्री. पाटील रोहिदास शंकर
११) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
१३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१५) श्री. पाटील जयंत महादेव
१६) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१७) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१८) श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
१९) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
२०) श्री. पाटील रतन कृष्णा
२१) श्री. पाटील शरद केशव
२२) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२३) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२४) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२५) श्री. मेहता नरेंद्र
२६) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२७) श्रीम. शाह रक्षा एस.
२८) श्री. जैन रमेश धरमचंद्र

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ४३ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २८ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | -- |
| एकूण सदस्य | :- | **७१** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मॅडम, आपको फिर एक बार बहुत बहुत धन्यवाद।

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, सदर मतदानाची प्रक्रिया चुकीची झालेली आहे. चार सदस्यांनी याच्यावर मागणी केलेली नाही. त्याच्यामध्ये हा टेक्निकल मुद्दा उपस्थित झालेला आहे. ठराव वैध की अवैध ते बघावे. चार सदस्यांनी मागणी केलेली नाही.

**प्र. सचिव :-**

एकाच विषयावर दोन ठराव आल्यामुळे मतदान घेणे क्रमप्राप्त आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मॅडम, आपको फिरसे बहुत बहुत धन्यवाद। आपके पिरियड मे कम से कम परिवहन सेवा चली। लेकिन बी.ई.एस.टी.के ठेकेदारोने बता दिया की, आपको कितना विरोध है। इस पब्लिक को यह बस देना नही चाहते। अभी हमारी परिवहन सेवा मे कम से कम इतना लिखना की, बुरी नजरवाले तेरा मुँह काला।

**मिलन म्हात्रे :-**

आप बैठो बस चलाने के लिए। सिटी हम बजायेंगे।

**प्रकरण क्र. ५५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम २(अ) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतुक संस्था, पुणे (सी.आय.आर.टी.) यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर सखोल चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या विचारात घेता परिवहन सेवा सुरु करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवा सुरु केल्यास नागरीकांना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देता येईल. तसेच यामुळे मिरा भाईंदर शहराचा विकासही साधता येईल.

प्रकरणी केंद्रीय रस्ते वाहतुक संस्था, पुणे यांच्या अहवालावर सखोल चर्चा करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २० नियम ३४२(२)(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम स्थापन करणेंस ही सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

या प्रकरणी प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी यास ही मंजुरी देत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९) श्री. शेख आसिफ गुलाब
१०) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
११) श्रीम. गोहिल शानु
१२) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
१३) श्री. नलावडे दिनेश द.
१४) श्री. पांडे हंसु कमलकुमार

१५) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१६) श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१७) श्री. माळी रविंद्र भीमदेव
१८) श्री. घरत केशव रामभाऊ
१९) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
२०) श्रीम. वाडे जिवी हिरा
२१) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
२२) श्रीम. पाटील अनिता जयवंत
२३) श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर
२४) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२५) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२६) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२७) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२८) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२९) श्री. खान शफीक अहमद
३०) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
३१) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
३२) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
३३) श्री. पाटील रोहीदास आत्माराम
३४) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३५) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३६) श्री. शहा शशिकांत रतिलाल
३७) श्रीम. शाह रिटा सुभाष
३८) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३९) श्री. पाटील ध्रुवकिशोर
४०) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
४१) श्री. पाटील प्रेमनाथ गजानन
४२) श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
४३) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. म्हात्रे मिलन वसंत
४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९) श्री. सिंग मदन उदितनारायण
१०) श्री. पाटील रोहिदास शंकर
११) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१२) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
१३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१४) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१५) श्री. पाटील जयंत महादेव
१६) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१७) श्री. कोलासो जेम्स इजिदोर

१८) श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
१९) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
२०) श्री. पाटील रतन कृष्णा
२१) श्री. पाटील शरद केशव
२२) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
२३) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२४) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२५) श्री. मेहता नरेंद्र
२६) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२७) श्रीम. शाह रक्षा एस.
२८) श्री. जैन रमेश धरमचंद्र

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ४३ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २८ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | -- |
| एकूण सदस्य | :- | **७१** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांचा ठराव बहुमताने मंजुर झालेला आहे. आता जेवायची सुट्टी करण्यात यावी.

**(लंच टाईम दु. ३.१५ वा. ते दु. ४.२० वा.)**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)**

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो प्रकरण ५६ महानगरपालिका क्षेत्रात नवीन आरोग्य केन्द्र सुरु करणेबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा दि. १९/०४/२००३ चा ठराव क्र. ०५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात एकूण सात आरोग्य केन्द्रे आणि फिरता दवाखाना सुरु करण्यासाठी कर्मचारी वर्ग आणि करार पध्दतीने नेमणूक करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली होती. त्याच्यानंतर आपल्या शहरामध्ये आपण आज आपली जी आरोग्य केन्द्रे सुरु आहेत त्याबद्दल जवळजवळ समाधानकारक काम सुरु असल्याचे आपल्याला जाणवत आहे. कारण आपले उद्दीष्ट आहे की, आपल्याला हॉस्पिटल बनविले पाहिजे. आपण दवाखाना केला पाहिजे. या सन्मा. सभागृहाचीसुद्धा या करिता मान्यता आहे आणि या संदर्भामध्ये नामदार गणेश नाईक साहेब यांनी महापौर म्हणून आपणास आणि आयुक्त यांना मंत्रालयात पाचारण केले. जागा हस्तांतरणाबाबत त्यांनी संबंधित डिपार्टमेन्टचे पी.डब्ल्यु.डी., आरोग्य आणि नगरविकास या खात्यांच्या सचिवांना बोलावून आपल्याला ती जागा हस्तांतरीत होण्याच्या बाबतीमध्ये त्यांनी पुढाकार घेतला आणि तसे सचिवांना त्यांनी निर्देश दिलेले आहेत. लवकरच ही जागा हस्तांतरीत होण्याच्या संदर्भामध्ये आपल्याला तसे कार्यादेश करतील. आपल्याला लवकरच या ठिकाणी हॉस्पिटल होणार आहे. तरी आरोग्य केन्द्र आपण सुरु केले. त्या आरोग्य केन्द्रामार्फत आपण या सर्व जनतेला आरोग्य सेवा पुरविलेल्या आहेत. त्याच्यामुळे आपल्याला जवळजवळ समर्थपणे त्याचे रिपोर्ट आपल्याकडे येतात. तरी या ठिकाणी आपल्याला ही अशी उपकेन्द्रे सुरु झाली पाहिजेत. त्याबद्दल या सभागृहात विषय आलेला आहे. अशी उपकेन्द्रे सुरु झाली पाहिजेत. या दृष्टिकोनातून सर्व सन्मा. सदस्यांनी याकरिता आपल्याला सहकार्य करावे अशी मी सभागृहास विनंती करतो. धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आरोग्य सेवा केन्द्र आपण मागे पण सुरु केलेले आहेत. ते आता सध्या किती आहेत आणि किती चालू आहेत? त्याच्यामध्ये आपण ज्या नेमणुका करता म्हणजे डॉक्टर वगैरे, त्यांचा कालावधी किती? त्यांचे पेमेन्ट किती?

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया, आपण यापूर्वी भाईंदर पश्चिम विभागात दोन आरोग्य केन्द्रे, भाईंदर पूर्व विभागात दोन आरोग्य केन्द्रे, मिरा रोडला एक, पेणकरपाड्याला एक, उत्तन विभागात एक आणि घोडबंदर विभागामध्ये एक फिरता दवाखाना असे प्रस्ताव मंजुर केलेले आहेत. त्यानुसार उत्तन वगळता इतर सर्व आरोग्य केन्द्रे सुरु झाली आहेत. याच्यामध्ये वैद्यकिय अधिकाऱ्याला आपण दरमहा रु. १०,०००/-, परिचारिकांना रु. ४,५००/-, प्रसविकांना रु. ३,०००/- आणि फार्मासिस्ट कम लिपिक यांना रु. ३,५००/- अशा प्रकारे आपण या सर्व कर्मचाऱ्यांना पगार देतो. आता आपल्याकडे एकूण वैद्यकिय अधिकारी सात, परिचारिका सात, फार्मासिस्ट आठ आणि ए.एन.एम. सोळा असा कर्मचारी वर्ग सध्या कार्यरत आहे. या आरोग्य केन्द्राच्या मार्फत आरोग्य केन्द्र टप्याटप्प्याने सुरु झाल्यानंतर आतापर्यंत एकूण १,११,८७५ रुग्णांना आपण सेवा दिलेली आहे आणि केस पेपर पोटी आपल्याला आतापर्यंत रु. ५,५९,३७५/- त्याचा महसुल जमा झालेला आहे. याशिवाय सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम कुटूंबकल्याण, पल्स पोलिओ लसीकरण, शालेय चिकित्सा, अ जीवनसत्वाचे वाटप तसेच शासनाचे जेवढे क्ष रोग नियंत्रण व जेवढे आरोग्य कार्यक्रम असतात ते महानगरपालिकेला राबविणे हे बंधनकारक असते. हे महानगरपालिकेमार्फत राबवावे लागतात आणि त्यासाठी आपल्याला ह्या प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्या लागतात आणि त्यानुसार आपण करतो. शासनाचा नियम असा आहे की, साधारणतः पन्नास हजार लोकसंख्येला एक आरोग्य केंद्र द्यायला पाहिजे. ह्या आरोग्य केंद्रामध्ये जसे आपण आता भाईंदर पश्चिम किंवा उत्तनला आहे त्या आरोग्य केंद्रामध्ये जवळजवळ एकूण १६ ते १७ इतका स्टाफ असतो. दोन वैद्यकिय अधिकारी, दोन हेल्थ असिस्टंट मेल फिमेल, चार ए.एन.एम., फार्मासिस्ट, क्लर्क वगैरे परंतु आपण आपले बजेट आणि एक आपले अजून आपल्याकडे अनुभव नव्हता की, कशा प्रकारे सुविधा आणि काय अडचणी निर्माण होतात. यानुसार कमीत कमी सुविधांमध्ये आपण आपले आरोग्य केंद्र सुरु केलेले आहेत. आज या प्रसंगी सभागृहाला एक माहिती पुरवू इच्छितो की, केंद्र शासनाकडे केंद्र शासनाच्या योजनेखाली आर.सी.एच. फेज-२ या योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाला प्रस्ताव सादर केलेला होता की, या योजनेमध्ये आम्हांला आपण मॅटरनिटी आणि चिल्ड्रन हॉस्पिटल आणि आरोग्य केंद्र मंजुर करावेत आणि हे फंड पाच वर्षासाठी असतात आणि राज्य शासनाकडून माहिती मिळालेली आहे की, तत्वतः आपल्याला हा आपला संपूर्ण प्रस्ताव पाच कोटी छत्तीस लाख रुपयांचा प्रस्ताव आपण शासनाला पाठविला होता. तो तत्वतः आपला प्रस्ताव मंजुर झालेला आहे. एप्रिलपासून हा कार्यक्रम किंवा आर.सी.एच. फेज-२ आपल्याकडे बहुतेक लागू होणार आहे आणि त्याची तयारी आपण आतासुद्धा करत आहोत. शासनाने त्यासाठी एक सोसायटी स्थापन करायला सांगितली आहे. तरी त्या सोसायटीची तयारी आपली पूर्ण झालेली आहे. त्यासाठी आर.सी.एच. फेजमध्ये हे कर्मचारी त्यामध्ये दहा आरोग्य केंद्र, तीन मॅटरनिटी आणि चिल्ड्रन हॉस्पीटल अशी आपल्याला सेवा पुरवायची आहे. सध्याचा जो कर्मचारी वर्ग आहे हा आपल्याला त्या प्रोग्राममध्ये दाखवून आपला जो खर्च आता आपण करतो आहे हा खर्च आपल्याला पाच वर्षे तरी वाचवता येईल. पाच वर्षासाठी हे सर्व कर्मचारी आपल्याला त्या कार्यक्रमामध्ये आर.सी.एच. फेज-२ मध्ये दाखविता येतील आणि संपूर्ण खर्च औषधासहित आपल्याला त्याच्यातून भागवता येईल. त्यामुळे आपल्याला जास्तीचा खर्च बहुतेक करावा लागणार नाही. कदाचित एप्रिलपासूनच या कार्यक्रमाची अंमलबजावणी आपल्याकडे करावी लागेल.

**रिटा शाह :-**

सध्या जे आपल्याकडे वैद्यकिय डॉक्टर आहेत त्यांची अवधी किती आहे? एका वर्षासाठी आहे का? त्याबाबत माहिती द्यावी. कारण मी कशासाठी विचारते की, आपण जे नविन केंद्र सुरु करत आहोत तर ती चांगली गोष्ट आहे आणि करायला आपण दिलेले आहे. मिरा रोडचे दोन स्पॉट दिलेले आहेत, प्रभाग क्र. १४ आणि प्रभाग क्र. २५ तर नेमके कुठल्या जागी करणार आहात? तर ते दिलेले नाही. तर मला असे वाटते की, जागा फिक्स झालेली नसेल.

**डॉ. बावस्कर :-**

दोन तीन जागा बघितल्या असून अजुन जागा ह्या फिक्स झालेल्या नाहीत.

**रिटा शाह :-**

कारण मी कशाला विचारते अवधी की, एकदा आपण कुठल्याही आरोग्य केंद्रात आपण डॉक्टर नेमले तर त्याचा दहा हजार रुपये पगार आहे असे मी ऐकले आहे आणि तो पगार त्यांनी सॅटीस्फाय नाही आणि तसेच ते परमनंटसुद्धा नाही. म्हणजे गॅरंटीसुद्धा नाही. म्हणून कोण डॉक्टर तिथे काम करायला तयार नाही असे मी ऐकले आहे. तर याचेमध्ये काय तथ्य आहे?

**डॉ. बावस्कर :-**

यामध्ये आपण जो प्रस्ताव मंजुर केलेला आहे त्यात पदनिर्मिती केलेली आहे. त्या पदनिर्मितीस महाराष्ट्र शासनाची मंजुरीसाठी आपण प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याचा फॉलोअप आपल्याकडे चालू आहे. मागच्याच महिन्यामध्ये नगरविकास सचिवांकडे याच्याबद्दल आमची बैठक झाली. त्यावेळी त्यांना सांगण्यांत आले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही लवकरात लवकर दवाखान्याच्या आणि आरोग्याच्या सुविधा म्हटल्या म्हणजे त्याबद्दल आम्ही प्रस्ताव थांबवणार नाहीत व त्यावर प्रोसेस सुरु झालेले आहे. दोन-तीन महिने असा अंदाज सांगतो. परंतु बहुतेक लगेचच अशी पदे मंजुर झाल्यानंतर त्यावर हा स्टाफ कायम होईल आणि कंत्राट पद्धतीने राहाणार नाही. सध्या आपण करार पद्धतीने घेतलेले आहे. साधारणतः मार्च अखेरपर्यंत पदे ही मंजुर होऊन येतील आणि पदे मंजुर झाल्यानंतर वैद्यकिय अधिकाऱ्यांना रु. १४,५००/- एवढा पगार राहील. म्हणजेच त्या बेसिकमध्ये जेवढा पगार सगळे बेसिक आणि सर्व भत्ते मिळून जेवढा पगार आपल्याला येणार आहे तेवढा पगार आपल्याला त्यांना देता येईल.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपण आता एवढे दवाखाने चालू करणार आहोत. डॉक्टर साहेब आपल्याकडे वाहनांची आवश्यकता आहे. आपल्याकडे जे फिरते दवाखान्यासाठी वाहन जे आहे ते फक्त एकच आहे आणि काही नादुरुस्त आहेत. तर आपण ताबडतोब त्वरीत ते रिपेअरिंग करुन ते आपल्याला उपलब्ध करुन घ्यावी आणि परत आता ज्या रुग्णवाहिका, शववाहिका आहेत त्या वारंवार बंद पडतात आणि थोड्या थोड्या कारणाने बंद पडतात व रिपेअरींगला जाऊन दोन-दोन महिने किंवा वर्षोनवर्षे बंद असतात. तरी त्याकरिता आपण वाहने उपलब्ध नसल्यामुळे आणि आपण एवढे दवाखाने उघडूनसुद्धा त्या शववाहिका व रुग्णवाहिकांचा येथील गरीब लोकांना त्याचा उपयोग होत नाही. तरी आपण ताबडतोब ती वाहने रिपेअरींग करुन घ्यावी. तसेच आपण एक ऑक्सीजन ठेवण्यासाठी गाडीमध्ये सोय होईल अशी सोय आपण करावी अशी माझी एक सुचना आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, इतर महानगरपालिकांमध्ये औषधावरती त्यांचे शिक्के असतात. नॉट फॉर सेल किंवा युज फॉर ओन्ली बी.एम.सी. वगैरे असे शिक्के असतात. आपल्या येथे महापालिकेमध्ये असे शिक्के औषधावरती का मारत नाही?

**डॉ. बावस्कर :-**

आपली सुचना बरोबर आहे. सुरुवातीला फार कमी स्टॉक असतो. सुरुवातील रिक्वायरमेंट आपली कमी होते. त्याच्यामुळे कंपन्या असे स्टॅम्प मारायला तयार होत नाही. परंतु पुढच्या निविदेमध्ये आपण त्यांना असा स्टॅम्प मारण्याचे कंम्पल्सरी करु किंवा आताच आपला एक स्टॅप बनवून, स्टीकरसारखे त्यावर आपण लावण्याची व्यवस्था करु.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, प्रकरण क्र. ५६ या संदर्भात हा विषय ह्या सभागृहापुढे आलेला आहे. डॉक्टर साहेब, मला दोन-तीन गोष्टीचे स्पष्टीकरण आपल्याकडून पाहिजे. आपण नया नगर येथे जे आरोग्य केंद्र चालू केलेले आहे ती जागा महापालिकेची आहे का? नया नगर पहिला मजला अस्मिता सुपर मार्केट, ती जागा महापालिकेची आहे का? किंवा महापालिकेने कशा प्रकारे भाडे तत्वावर घेतलेली आहे का? तसेच कोणी आपल्या महापालिकेला वापरायला दिली आहे का? त्याबद्दल जरा स्पष्टीकरण करावे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. महापौर महोदया, सदरची जागा ही महानगरपालिकेची नाही. ही जागा मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांच्या मालकीची आहे आणि त्यांनी आपल्याला मोफत वापरण्यासाठी दिलेली आहे. तसेच तसा करारनामा केलेला आहे. ऑफीशिअली तसा करानामा केला आहे.

**रतन पाटील :-**

ऑफिशिअली म्हणजे कायमस्वरुपी का?

**डॉ. बावस्कर :-**

आपली दुसरीकडे व्यवस्था होईपर्यंत. कायमस्वरुपी नाही.

**रतन पाटील :-**

अशा पद्धतीचे ॲग्रीमेंट झालेले आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

होय. ॲग्रीमेंट झालेले आहे.

**रतन पाटील :-**

धन्यवाद त्यांचेसुद्धा आभार आणि तुम्ही तशा पद्धतीने प्रयत्न केला म्हणून तुमचेसुद्धा आभार. आपण आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात कुटूंब कल्याण हा कार्यक्रम राबवतो. तरी अशी महापालिकेमार्फत कुटूंब कल्याण कार्यक्रम आपण कुठे कुठे राबविला? आणि असा कुटूंब कार्यक्रम सध्या चालू आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

कुटूंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत स्त्री आणि पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया, दुसरे कॉपर टी बसविणे, तिसरे ओरल पिल्सचे वाटप करणे तसेच चौथे कंडोमचे वाटप करणे.

**रतन पाटील :-**

आपली महापालिका करते काय? एवढेच मला विचारायचे आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आपल्या महानगरपालिकेत आपल्या आरोग्य केंद्रामार्फत हा कार्यक्रम राबविला जातो. आतापर्यंत आपण शस्त्रक्रिया शिबीरे आपण सुरु केलेली आहेत. आतापर्यंत दोन शिबीरे झाली. आत्ताच १५ तारखेला एक शिबीर झाले. त्यात २९ शस्त्रक्रिया झाल्या आणि आता २५ तारखेला आपले शिबीर आहे आणि दर १५ दिवसाला आपण असे शिबीर आयोजित करतो.

**मा. महापौर :-**

आता आपले बोलणे बस्स झाले. इतर सन्मा. सदस्यांनासुद्धा बोलायचे आहे.

**रतन पाटील :-**

डॉक्टर साहेब, आपण या आरोग्य केंद्रास महापालिका क्षेत्रातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद असून रोज सरासरी ५०० ते ७०० बाह्य रुग्णांवर औषधोपचार करण्यांत येतो. म्हणजेच या महापालिकेच्या दृष्टीने आपण ७०० रुग्ण रोज तपासतो. म्हणजे ही महापालिकेची चांगली अवस्था आहे की, महापालिकेचे चांगले आरोग्य आहे हे आपण असे नमुद केलेले आहे. म्हणजे या महापालिकेमध्ये जास्त रुग्ण आहेत असे आपण आरोग्यातील अधिकाऱ्यांनी दिलेले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब, याचा अर्थ असा होत नाही की, आजाराचे प्रमाण वाढले.

**रतन पाटील :-**

आपले एकूण महापालिकेचे आठ आरोग्य केंद्र असून त्याची जर अशी अवस्था आहे तर मिरा भाईंदरमध्ये हॉस्पीटल तरी आहेत. मिरा भाईंदर दवाखाने किती आहे? आणखी दुसरे मॅटरनिटी होम आणि नर्सिंग होम किती आहेत याची आपल्याला कल्पना आहे का? त्यामध्ये रुग्ण हे जात आहेत किंवा नाही? ते सर्व रुग्ण हे आपल्या महापालिकेच्या आरोग्य केंद्रातच येत आहेत का? याबाबतचे सर्वेक्षण मला द्यावे. विगतवरी द्यावी. महापालिकेची एवढी जर भावना आहे आणि अन्य हॉस्पीटल्सची संख्या ही आपल्याकडे आहे का? याबाबत खुलासा द्या.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर, मला वाटते विषयाचे विषयांतर होत आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांना जे काही विचारायचे आहे ते त्यांनी एकच विचारले पाहिजे. हे जसे काही कोर्टामध्ये कोणाला तरी उभे करुन एक एक प्रश्न विचारतो आहे आणि त्याचे उत्तर मागतो असे नाही.

**रतन पाटील :-**

या पाठीमागचा उद्देश आपल्याला समजत नाही. मी आपल्याला माहिती देतो की, आज आपल्याकडे ३६ हॉस्पीटल आहेत, क्लिनीक २२१ आहेत, मॅटरनिटी नर्सिंग होम ६ आहेत आणि नर्सिंग होम १५ आहेत आणि ह्यामध्ये जे रुग्ण आहेत त्यांची संख्या किती आहे आणि आज महापालिकेच्या आठ केंद्रामध्ये ७०० ते ८०० रुग्ण आपण सांगता तर ह्याच्यामध्ये किती आहेत आणि मिरा भाईंदरमध्ये हे आरोग्याच्या दृष्टीने चांगले आहे का? एवढे मला सांगा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम मला बोलण्यांस परवानगी द्यावी.

**(सभागृहात गोंधळ)**

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी मला बोलण्यांस परवानगी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील, आपणांस परवानगी दिली परंतु अर्धा तासपेक्षा जास्त आपण बोललात.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषयावर आम्ही बोलत असून वेगळे असे काही बोलत नाही. या महापालिकेच्या क्षेत्रामध्ये मलेरियाचे रुग्ण किती व अन्य साथीचे रुग्ण किती आहेत याची माहिती आहे का? आरोग्याच्या सेवेमध्ये आपण एवढा महापालिकेचा एवढा पैसा खर्च करतो आणि ही असली आरोग्य सेवा का? महापालिकेच्या माध्यमातून आपण सामान्य नागरीकांना यांच्यातून काय सुविधा देतो? आपण ह्या करधारक नागरीकांना काय देतो? आणि असे आठ हजार रुग्ण अन्य दवाखान्यांमध्ये आहेत.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी जी माहिती दिली त्या माहितीच्या आधारे सर्व सभागृह हे खदाखदा हसत होते. मला कळले नाही की, विनोद म्हणून चालले होते की, त्यांची प्रशंसा चालली होती. ते मला माहित नव्हते.

**रतन पाटील :-**

हे आपण आपल्या शब्दात सांगावे.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये जेव्हा आरोग्य केंद्र सुरु झाले तेव्हा त्यांनी समाधान व्यक्त केले की, चांगली सेवा सुरु आहे. म्हात्रेजी मला जरा बोलू द्या मग तुमची स्तुती आम्ही जरुर घेऊ. तर मिरा भाईंदरमध्ये आरोग्य केंद्र सुरु असतांना ही अशा सुविधा निर्माण होतात. प्रायव्हेट जे खाजगी दवाखाने हे होते आणि आज मिरा भाईंदर महापालिकेने जेव्हा आरोग्य केंद्र सुरु केले त्यावेळेला जो गोरगरीब तसेच झोपडपट्टीवासीयांमधून जो काही नागरीक तसेच अल्प उत्पन्न गटातील जी काही लोक आहेत त्यांना आपण दारिद्र्य रेषेखालील जी लोक आहेत त्यांना आपण ह्या सुविधा द्याव्यात या उद्देशाने आपण हे आरोग्य केंद्र सुरु केली आणि त्याचा प्रतिसाद चांगल्या पद्धतीने मिळाला आणि काही आमचे या ठिकाणी असलेले सन्मा. सदस्य जे झोपडपट्टीमधले कार्यकर्ते त्याच्या प्रभागामध्ये झोपडपट्ट्या आहेत तरी त्यांनीसुद्धा समाधान व्यक्त केले आणि स्वतः जातीने हजर राहून त्यांना आरोग्य केंद्राकडे पेशंट किती येतात आणि किती जातात ते चेक करतात. असे काही सन्मा. सदस्य चांगले काम करत आहेत आणि अशा पद्धतीने काम करीत असतांना जर एका बाजूने जर अशा रुग्णाची यादी वाचली आणि तयाला तर वेगळ्या बाजूने जर असा संशय घेतला तर ही आश्चर्याची बाब आहे असे मला बोलायला वाटणार नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, यात आश्चर्याची बाब नाही. आपण त्याच महापालिकेमध्ये होतात.

**याकुब कुरेशी :-**

मॅडम, सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलत असताना सन्मा. सदस्य रतन पाटील मध्ये का बोलतात? यांना जरा खाली बसवा.

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशी साहेब, सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब बोलत असताना तुम्ही मध्ये बोलायचे नाही. प्रत्येकाला अधिकार आहेत. प्रत्येक सदस्याला आपापल्या समस्या मांडु द्या. कोणीही मध्ये बोलू नका. महापौर मॅडम बघून घेतील.

**मोहन पाटील :-**

रुग्ण काय आणि अरुग्ण काय? या ठिकाणी हा मोठा चर्चेचा विषय झालेला आहे. उद्या आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये दवाखाना बांधायचा आहे. याबद्दल मी मघाशी वाच्यता केली की, नामदार नाईक साहेबांकडे आपण हा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तशा पद्धतीची मिटींगसुध्दा कॉल केली होती आणि आपण हॉस्पिटलसुध्दा बांधणार आहोत. आपण दोनशे घरांचे हॉस्पिटल बांधणार आहोत.

**रतन पाटील :-**

आमचीच मागणी होती.

**मोहन पाटील :-**

यांना खुर्ची दिली की, नाही ते आम्हाला माहिती नाही.

**रतन पाटील :-**

आमच्याकडे खुर्ची आहे. आम्ही स्थायी समितीचे सभापती नाही आहोत.

**मोहन पाटील :-**

उद्या आपण या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये एखादे हॉस्पिटल बांधल्यानंतर आपण ही जंत्री घेणार का? की हया हॉस्पिटलमध्ये किती लोक येतात? गेली आहेत की नाही गेली? रुग्ण आहेत की नाहीत? मग रुग्णाचा जर त्या ठिकाणी भरणा झाला मग काय अर्थ काय होतो की, मिरा भाईंदरचे आरोग्य कुठेतरी बिघडलेले आहे, संतुलन बिघडले. मान्य करु का? पण आरोग्य बिघडले अशा पद्धतीचा अर्थ होईल. जर एका बाजूने एखादा सन्मा. सदस्य असे बोलत असेल की, या ठिकाणी आरोग्य केन्द्र सुरु केले. त्याचे समाधान आहे आणि समाधान व्यक्त करित असताना जर आपण सांगितले की, या ठिकाणी सातशे-आठशे रुग्ण येतात. म्हणजे मिरा भाईंदरमध्ये आरोग्य सेवा ही बरोबर नाही. मिरा भाईंदरच्या लोकांचे आरोग्य बिघडलेले आहे. अशा पद्धतीने जर एका वेगळ्या दिशेने बोलत असाल तर नक्कीच त्या कामाच्या समाधानकारकपणे बोलता की, टिकेतून बोलता ते तुम्ही बोला. आता आम्ही बोललो आम्ही हॉस्पिटलची मागणी केलेली आहे. मिरा भाईंदर क्षेत्रातील भाग नाही. तो विरोधकांचा जो हक्क आहे. एखाद्या ठिकाणी कुठे काम करत असतील तर तिथे आपला बोर्ड लागला पाहिजे. ते काम आम्ही केले असे सांगितले पाहिजे. त्या कामाबरोबर ते क्रेडिट घेतले पाहिजे अशा पद्धतीचे काम विरोधकांकडेच असते. ते काम आपण त्यांना दिलेले आहे. ते आम्हाला मघाशी बोलले. आम्ही ही मागणी केली होती. होय, तुम्हीच सर्व मागणी केली होती. कुटुंबकल्याणाची मागणी तुम्हीच केलेली आहे. आम्ही तुम्हाला बोललो नाही की, तुम्ही काहीही केलेले नाही.

**रतन पाटील :-**

मागणी आमचीच होती.

**मोहन पाटील :-**

पण मागणी करणे आणि काम करणे. जसे मागच्या वेळेला या सभागृहामध्ये आपण परिवहन समितीची मागणी केली. मागणी त्यांनीही केलेली आहे असे नाही. मागणी करताना प्रत्यक्षरित्या आल्यानंतर आम्ही मागे आहोत. जर एखाद्या कुठल्या गोष्टीचा परिणाम झाला. आम्हाला जर हे मिळाले तेव्हा मी मागे होतो. म्हणून जर या शहरामध्ये आरोग्य केन्द्र सुरु असताना..............

**रतन पाटील :-**

आम्ही काय चुकीचे बोललो तेवढे आम्हाला सांगा.

**जयंत पाटील :-**

स्थायी समिती सभापती साहेब किती वेळा तुम्हीच बोलता. हॉस्पिटल होणार हे सर्वांना माहिती आहे. आरोग्य केन्द्राचा विषय आहे.

**मोहन पाटील :-**

आरोग्य केन्द्राचाच विषय आहे. पण आरोग्य केन्द्राचा विषय असताना जर काही रुग्ण येतात. गोरगरिबांना सेवा मिळते आणि त्या गोरगरिबांच्या सेवेचा वेगळा अर्थ काढला तर कसे काय करायचे?

**रतन पाटील :-**

साहेब, अर्थाचा अनर्थ करु नका.

**मोहन पाटील :-**

जर आज मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आरोग्य केन्द्र असताना उपकेंद्र सुरु करण्याची जर मागणी आलेली आहे. याचा अर्थ रुग्णांना चांगल्या प्रकारची सेवा ही मिरा भाईंदर महानगरपालिका देत आहे. जर उपकेन्द्र या ठिकाणी व्हावीत अशा पद्धतीचा विषय या ठिकाणी आलेला आहे.

**रतन पाटील :-**

पण आम्ही मिरा भाईंदरची सत्य परिस्थिती दाखवितो.

**मोहन पाटील :-**

पण आम्हाला बोलू द्या.

**रतन पाटील :-**

ठिक आहे. तुम्ही बोला.

**मोहन पाटील :-**

आरोग्य केन्द्र सुरु आहेत. उपकेन्द्राची मागणी आलेली आहे. कारण आरोग्य केन्द्राचा समाधानकारक रिपोर्ट असल्या कारणाने या ठिकाणी उपकेन्द्रे व्हावीत असे मी या ठिकाणी मांडतो.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, या शहरामध्ये आरोग्य केन्द्र बनली पाहिजेत. हे महापालिकेचे कर्तव्य आहे. या शहरातील लोकांचे आरोग्य चांगल्या तऱ्हेने रहावे, त्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, निरोगी रहावे, याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे काही कारण नाही. लवकरच चांगले, सुसज्ज हॉस्पिटल होणार आहे. हे अनेक वेळेला आमचे स्थायी समिती अध्यक्ष सांगत आहेत. सन्मा. सदस्य रतन पाटील यांचा सांगण्याचा उद्देशसुध्दा चुकीचा नव्हता. कारण त्यांची वाक्यरचना चुकीची आहे. या आरोग्य केन्द्रास महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद आहे. आरोग्य केन्द्रामध्ये पेशन्ट येणे हे या शहराला भूषण आहे हे माझे मत आहे. तुम्ही मधल्या काळात वर्तमानपत्रात वाचले असेल आपले पालकमंत्री मा. गणेशजी नाईकसाहेब हे उत्पादन शुल्क मंत्री आहेत त्यांनी जेव्हा असा ठराव मांडला. म्हणजे थोडेसे विषयांतर करुन सांगतो की हया शहरातील गावठी दारु बंद होण्यासाठी ज्या ठिकाणी लोकवस्ती आहे, दारु लोक पिणारच. ती गावठी दारु बंद व्हावी. जेणेकरुन लोक मरण्याचे थांबेल. त्यासाठी महाराष्ट्र गव्हर्नमेन्ट जी दारु बनविते त्या दृष्टिने ती चेष्टा केली गेली. त्या विषयाचा वर्तमानपत्राने वेगळ्या तऱ्हेने अर्थ लावला आणि हे लोकांना दारु प्यायला शिकवितात. त्यांचा तो उद्देश नव्हता. नवशक्तीत जो लेख आला होता त्यासंबंधी लिहिले होते. त्याच्यात अतिशय चांगले वाक्य होते. त्यांनी सांगितले की, या महाराष्ट्रातील माणूस एकही जण दारु पिणार नसेल तर मला सगळ्यात आनंद होईल. मग एकही रुपया उत्पादन शुल्क मिळाले नाही तरी चालेल. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब हे त्यांचे वाक्य अतिशय महत्वाचे आहे. त्याच्या मागे त्यांची भावना आमचेही तेच म्हणणे आहे की, या शहरामध्ये आरोग्य केन्द्र नाही चालले तरी चालेल, या शहरातील एकही माणूस रोगी होता कामा नये. तो त्या आरोग्य केन्द्रात जाता कामा नये. ही त्याच्या मागची भुमिका सन्मा. सदस्य रतन पाटील यांची असावी असे मला वाटते. ही त्याच्या मागची भावना आहे. चुकीची नाही. आरोग्य केन्द्र बनविणे हे आमचे कर्तव्य आहे. तिथे स्टाफ असणे, तिथे डॉक्टर असणे, नर्स असणे. उद्या कोणी मेले नाही म्हणून आम्ही स्मशान बनविणार नाही अशातला अर्थ नाही. स्मशान आम्ही बनविणार पण कोणी लवकर मरु नये हा त्याच्या मागचा उद्देश होता. विषय चांगला आहे. परंतु, आता जी आपल्याकडे आरोग्य केन्द्र आहेत. डॉक्टर साहेब, मी बऱ्याच वेळा आमच्या शेजारी असलेल्या आरोग्य केन्द्राला भेट देतो. आरोग्य केन्द्र चांगली आहेत. चांगल्या तऱ्हेने चालली आहेत. लोक येतात. त्यांची सोय चांगल्या तऱ्हेने केली जाते. परंतु, आरोग्य केन्द्रातील जो स्टाफ आहे तो आपल्यावर नाराज आहे. आतापर्यंत आम्ही त्यांना सांगितले की, मार्चपर्यंत त्यांची पगारवाढ होईल. त्यांना नोकरीची खात्री नाही. वाशी महापालिकेतून डॉक्टर म्हणून रु. २८,०००/- चा पगार सोडून एक डॉक्टर आपल्या नवघरच्या आरोग्य केन्द्रामध्ये आहे. रु. २८,०००/- पगार आज आपण त्यांना रु. १०,०००/- पगार देत आहोत. फक्त उत्तनला राहतात, मिरा भाईंदर सोयीचे आहे ह्या एकाच गोष्टीतून त्या इथे कामाला लागल्या. त्यांची सेवा चांगली आहे. इतर गोष्टीमध्ये त्यांची तक्रार नाही. परंतु, अनेक गोष्टी त्यांच्या बाबतीत घडलेल्या आहेत किंवा त्या स्टाफच्या बाबतीत घडलेल्या आहेत. आपल्याला कदाचित माहिती नसेल की, आपल्याकडून तीन डॉक्टर सोडून गेले. त्यांना पगार परवडत नसेल किंवा इतर गोष्टी त्यांना परवडत नसतील. पाच स्टाफ आपल्याकडून सोडून गेलेले आहेत. त्याच्यामागचे हे कारण आहे. त्यांचा पगार व्हायला पाहिजे. उद्या आम्ही इकडे गप्पागोष्टी करतो. पण ते लोकांना जीवदान देतात. लोकांचे जीव वाचविण्याचे खरे काम ते करतात. त्यांना पगार वाढला पाहिजे. त्यांना वेळेचे बंधन नाही. त्यांची वेळ ९ ते ४ वाजेपर्यंत आहे. परंतु, पेशन्ट जर आले तर ते ५ ते ६ वाजेपर्यंत फक्त रु. १०,०००/- मध्ये कामे करतात. आपण त्यांचा उपयोग कुठे कुठे करतो हे जर बघितले तर आश्चर्य वाटेल. पल्स पोलिओसाठी आपण त्यांचा वापर करतो. शहरामध्ये शालेय आरोग्य तपासणीसाठी आपण त्यांचा वापर करतो. गणपती उत्सव आला की, आपण त्यांना खाडी किनारी नेवून ठेवतो. रात्री २ ते ३ वाजता आमचे काम संपले की, मग डॉक्टर कसे जातात हे बघायला आमचे डॉक्टरसुध्दा तिथे नाहीत किंवा सन्मा. सदस्य जयंत पाटील नाहीत. पण त्यांना लांबून येणाऱ्या लोकांना सोयीचे काही नाही. त्यांना जायची व्यवस्थासुध्दा आपण करित नाही. डॉक्टर साहेब, ही अतिशय वाईट गोष्ट आहे. चुकीची गोष्ट आहे. या गोष्टीचासुध्दा आपण विचार केला पाहिजे. बिचारे कामे करतात, इमाने इतबारे कामे करतात. पण आपले दुर्लक्ष अतिशय होत आहे. महापौर साहेब ही गोष्ट गंभीर आहे याचा विचार जातीने करावा आणि जेव्हा तुम्ही विचार करता तेव्हा नक्कीच तुमच्या मनामध्ये ठसलेला असतो अशी माझी भावना आहे. नवघरच्या या आरोग्य केन्द्रामध्ये

आलेल्या डॉक्टरांना बेस्ट डॉक्टरचा ॲवॉर्ड तीन वेळा मिळालेला आहे ही गोष्ट या शहरातील कोणाला माहिती नाही. त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे. त्यांच्या अभ्यासाचा उपयोग करुन घेणे. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करुन घेणे आणि त्यांना सगळ्या सोयी सुविधा देणे हे आपले कर्तव्य आहे. आरोग्य केन्द्र चांगले चालू व्हावे याबद्दल माझे मत आहे. आता जो विषय आलेला आहे. ही आरोग्य केन्द्र चालू व्हावीत अशा तऱ्हेचा मी ठराव मांडत आहे.

**जेन्वी आल्मेडा :-**

या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापौर मॅडमला माझी विनंती आहे मी कधीपासून परवानगी मागत आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी मला बसविलेले आहे. प्रकरण क्र. ५६ महानगरपालिका क्षेत्रामध्ये नवीन आरोग्य उपकेन्द्र सुरु करणेबाबत मी डॉक्टर साहेबांच्या निदर्शनास आणून देतो की, केबीन नाका येथे आपण प्राथमिक आरोग्य केन्द्र सुरु करणार होतो. दोन-तीन वेळा आम्ही तुमच्याशी चर्चाही केलेली. आम्ही आता करु उद्या करु चालले. ते लवकरात लवकर सुरु करावे. ही जी पाच उपकेंन्द्र सुरु करणार आहेत त्याच्यात सहावे ते नोंद करावे अशी मी तुम्हाला विनंती करतो असा मी ठरावसुद्धा मांडत आहे.

**मा. उपमहापौर :-**

उपसुचना असेल तर थोडक्यात करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आरोग्य खात्यातील आता जो पगाराचा विषय निघाला त्या संदर्भात बोलतो. आरोग्य खात्यातील इमर्जन्सी ड्युटी म्हणून जे वर्कर काम करतात त्यांना सुट्टीच्या दिवसाचा पगार किंवा ड्युटी ऑफ दिला जात नाही. तो का दिला जात नाही? याचा मला सविस्तर खुलासा हवा. जवळजवळ २००० सालापासून आपण त्यांना पगार देत नाही. त्यांच्याकडून काम करुन घेतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस एकतर या विषयाला लागूनच आपला पुढचा विषय आहे. त्या डॉक्टरांना आपण सहा महिन्याच्या मुदतीवर घेतलेले आहे. त्यांचा पगार फिक्स केला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्या नगरपालिकेचे परमनन्ट वर्कर जे सुट्टीच्या दिवशी इमर्जन्सी म्हणून येतात त्यांना सुट्टीच्या दिवशीचा पगार दिला जात नाही किंवा ड्युटी ऑफही दिला जात नाही. मी त्या विषयी प्रश्न विचारलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

एकतर हा विषय या विषयाशी संबंधित नाही. आपल्या ज्या सुचना आहेत त्या सुचनांचा विचार केला जाईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, हे सगळे आरोग्य खात्यातीलच कामगार आहेत. ज्या वर्करला आपण कामावर बोलावतो त्याचा आपण पगार देत नाही ही किती गंभीर गोष्ट आहे.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडमनी सांगितले की, या विषयात ते आरोग्य अधिकाऱ्यांशी आणि कमिशनर साहेबांशी बोलून योग्य ते निर्णय घेतील.

**मा. महापौर :-**

हा विषय संपवून टाका.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, आरोग्य केन्द्राचा विषय होता. तो चांगला विषय आहे. ठराव झालेला आहे. अनुमोदनही झालेले आहे. पण माझी एक छोटीशी सुचना आहे की, आपण आरोग्य केन्द्र नवीन सुरुवात करत आहोत तर त्याच्यामध्ये पॅथॉलॉजिकल लॅब जशी रक्त तपासणी आहे, युरिन तपासणी आहे. जे आपले गोरगरिब लोक असतात त्यांच्यासाठी आपण हा प्रोजेक्ट सुरु केलेला आहे. तर असेही सुरु करा अशी माझी सुचना आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

गोल्डन नेस्ट जवळ केन्द्र सुरु करायचे अशी मी सुचना मांडलेली आहे.

**गजानन भोईर :-**

महापौर मॅडम आपण आता जी नवीन पाच आरोग्य केन्द्र सुरु करणार आहोत. मला असे वाटते भाईंदर पूर्वेला मराठी शाळेमध्ये एक आरोग्य केन्द्र आहे, बंदरवाडी शाळेमध्ये. पण माझी सुचना आहे की, त्या खारीगावच्या आरोग्य केन्द्रावर आपण जर आता आरोग्य केन्द्र सुरु करणार आहोत तर एक आय स्पेशालिस्ट, इ.एन.टी. स्पेशालिस्ट असे डॉक्टर आणून बसवा. जेणेकरुन गरिब लोकांना याचा फायदा होईल अशी मी सुचना करतो.

**रोहिदास पाटील :-**

संख्या दोन्ही बाजूने सारखी आहे. म्हणजेच पूर्व आणि पश्चिम या दोन्ही बाजूने संख्या सारखी आहे. दोन्ही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर या सुविधा लोकांना द्याव्यात अशी त्यांची मागणी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. मॅडम, नवीन आरोग्य उपकेन्द्र सुरु करण्यासाठी आपण पाच जागा निवडलेल्या आहेत. त्यात तीन नावे आहेत. तलाव रोड महानगरपालिका शाळा खारीगाव येथे हप्त्यातून एकदा घेणार आहेत की, रोजच हे आरोग्य उपकेन्द्र चालू करणार आहेत.

**डॉ. बावस्कर :-**

दररोज आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मग तिथे वर्ग किती आहेत? शाळा आहे, त्या शाळेत किती क्लास आहेत? विद्यार्थी बसायला जागा नाही. शिक्षकांना टीचर रुम नाहीत. ते कुठून सुरु करणार आहेत?

**डॉ. बावस्कर :-**

हे सर्व ॲडजेस्ट करुन घ्यावे लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही कुठल्या दिवशी ॲडजेस्ट करणार? विद्यार्थ्यांना बसायला जागा नाही. शिक्षकांना टिचर रुम्स नाही. मग ते हे सुरु कुठे करणार? एक्स्ट्रा वाढवणार का?

**डॉ. बावस्कर :-**

ती जागा आरोग्य केन्द्रापुरती वर जागा आहे. ती काही दिवसामध्ये वेगळी बांधून घेणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

कधी.

**डॉ. बावसकर :-**

बांधकाम खात्याला तसा प्रस्ताव ऑलरेडी आम्ही पाठवलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे उपकेन्द्र तुम्ही कधी सुरु करणार?

**डॉ. बावस्कर :-**

या केन्द्राला अजून दोन-तीन महिने जातील. फक्त आरोग्य केन्द्रापुरती जागा.

**रोहिदास पाटील :-**

पहिली तुम्ही एक टिपणी दिली. टिपणीमध्ये डॉक्टरांची संख्या कमी लिहिलेली आहे, दवाखान्यांची संख्या जास्त लिहिलेली आहे. म्हणजे चुक की बरोबर आहे? काय आहे? डॉक्टर चार लिहिलेले आहेत, दवाखाने पाच आहेत.

**मा. महापौर :-**

एक डॉक्टर गैरहजर असेल तर दुसरा डॉक्टर घेणार.

**रोहिदास पाटील :-**

दवाखान्याची संख्या कमी पाहिजे, डॉक्टरांची संख्या जास्त पाहिजे. इथे डॉक्टरांची संख्या कमी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, आपल्या महापालिकेच्या ओ.पी.डी. केन्द्रामध्ये निःशुल्क सेवा करायला या शहरातील सर्व तज्ञ डॉक्टर यांनी अनेक वेळा मा. आयुक्त आणि आरोग्य अधिकाऱ्यांना आपण पत्रव्यवहार केलेला आहे. त्याच्या कॉपीसुध्दा माझ्याकडे आहेत. परंतु, शहराच्या आरोग्याच्या माध्यमातू आपण सगळ्या लोकांच्या तोंडातून ऐकतो की, सेवा चांगल्या प्रतीने मिळाली पाहिजे. या शहरातील तज्ञ डॉक्टर एक तास, किंवा दोन तास त्यांना जशा सोयीस्कर वाटेल तशा मोफत स्वरुपात आपल्याला एक ते दीड वर्षापासून मागणी करतात की, तुम्ही आम्हाला परमिशन दया. आम्ही तुमच्या ओ.पी.डी. मध्ये येवून रुग्णांना तपासू. त्यांना आम्ही कन्स्ल्टींग करु तरी अशा प्रकारे कुठल्याही अशा

वैद्यकिय डॉक्टरांना सगळ्या प्रकारच्या म्हणजे जे सर्व निरनिराळ्या ह्याच्यातील तज्ञ आहेत त्यांना किंवा आता जे मेडिकल कौन्सिलचे आपल्या इकडचे अध्यक्ष आहेत. डॉक्टर नाकोडा हॉस्पिटलचे जे डॉक्टर आहेत, त्यांचे नाव विमल जैन आहे. त्यांनी अध्यक्ष या नात्याने आपल्याला पत्रव्यवहार केलेला आहे. त्या डॉक्टरांना आपल्या प्रशासनाच्या वतीने दोन ओळीचे उत्तर आजपर्यंत कोणीही दिलेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

डॉक्टर पाच केलेले आहेत.

**मा. महापौर :-**

साहेब, पुढचा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, एक मिनिट. अतिशय महत्वाचा विषय आहे. आपल्या इकडे जे मोफत सुविधा द्यायला निघालेले आहेत. सेवा द्यायला तयार आहेत. त्यांना आपण आजपर्यंत परमिशन देत नाही. त्याला कारण काय आहे? ते लोक आपल्याकडे येउन त्यांच्या ज्ञानाचा आपल्याला फायदा करुन द्यायला तयार आहेत. त्याच्याबद्दल आपण साधे करस्पॉन्डन्ससुध्दा केलेले नाही.

**मा. महापौर :-**

डॉक्टरांना भेटायला बोलवा. आपण चर्चा करु.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांची अपॉईंन्टमेन्ट आहे. त्यांना द्यावे कि नाही द्यावे. त्यांना रिजेक्ट करायचे. त्यांना पत्र पाठवा. दिड-दोन वर्ष त्याच्यावर लक्ष नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही त्यांना बोलवा. घेउन या.

**स्टिवन मेंडोसा :-**

महापौरांनी सांगितले तरी तुम्ही बोलतच राहणार आहात का?

**मिलन म्हात्रे :-**

ऐकायला येत नाही. एवढी काय घाई आहे. आम्ही कशाला बोलायचे?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

ऐसे लोगो का प्रपोजल आने दिजिए बादमे चर्चा करेंगे।

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या. बस झाले. खुप चर्चा झाली.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, मिरा रोड प्रभाग क्र. १४ मध्ये शांती स्टार बिल्डरच्या प्रोजेक्टमध्ये शांती स्टार बिल्डरने आपल्याला अंडरटेकिंग दिलेले आहे की, मी स्वतः सार्वजनिक दवाखाना बनवून महानगरपालिकेच्या ताब्यात देणार ते फक्त आपल्याला ताब्यात घ्यायचे आहे. मी सुचना देतो. आपण कशाला जागा शोधता? आपण फक्त शांती स्टार बिल्डरला पत्र द्या. ते आपल्याला स्वतः जागा देतील. त्यांनी तसे अंडरटेकिंग चार वेळा दिलेले आहे. सुचनेची नोंद करुन घ्या.

**मा. महापौर :-**

नोंद करुन घेणार आहे.

**प्रकरण क्र. ५६ :-**

आरोग्य उपकेंद्र सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ६३ :-**

मा. महासभा दि. १९/४/२००३ ठराव क्र. ५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात एकुण ७ आरोग्य केंद्रे व एक फिरता दवाखाना सुरु करणेस व त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग करारपध्दतीने नेमणुक करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे.

आता पर्यंत महापालिका क्षेत्रात महानगरपालिका जुने कार्यालय इमारत, गणेश देवल जय अंबे नगर, बंदरवाडी भाईंदर पुर्व महानगरपालिका शाळा, नवघर भाईंदर पुर्व महानगरपालिका शाळा, पहिला मजला अस्मिता सुपर मार्केट नयानगर, समाज मंदिर पेणकरपाडा या ठिकाणी आरोग्य केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. याशिवाय काशिमिरा विभागात एक फिरता दवाखाना सुरु करण्यात आलेला आहे.

महानगरपालिकेने सुरु केलेल्या आरोग्य केंद्रात बाह्य रुग्ण विभागात रोज रुग्णांना तपासून औषध उपचार करणे, या महानगरपालिका क्षेत्रात कुटूंब कल्याण, आर.सी.एच. लस टोचणी, पोलिओ

निर्मुलन, अंधत्व निवारण, कुष्ठरोग निर्मुलन व इतर सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम महानगरपालिकेच्या सर्व विभागात राबविण्यासाठी वैद्यकीय सुविधात वाढ करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य सुविधाची आवश्यकता, सन्मा. नगरसेवकांची मागणी विचारात घेऊन महानगरपालिका क्षेत्रात खालील विभागात आरोग्य उपकेंद्र सुरु करणे आवश्यक आहे.

१) राई, मुर्धा - मुर्धा गाव समाज मंदिर
२) विनायक नगर, भाईंदर पश्चिम
३) तलाव रोड महानगरपालिका शाळा, खारीगाव, भाईंदर पुर्व
४) मिरारोड प्रभाग क्र. १४
५) प्रभाग क्र. २५

या ठिकाणी आरोगय उपकेंद्रे सुरु करणे व त्यासाठी लागणाऱ्या खालील कर्मचारी वर्गास तात्पुरत्या कालावधीसाठी करारपध्दतीने नेमणुक करणे आवश्यक आहे

**१) वैद्यकीय अधिकारी - पद संख्या - ५**

शैक्षणिक पात्रता :- मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी, महाराष्ट्र मेडीकल काऊंसिलची नोंदणी आवश्यक.
आनुभव :- शासकीय /निमशासकीय संस्थेतील वैद्यकीय अधिकारी म्हणुन कामाचे अनुभवास प्राधान्य.
वय :- ३५ वर्षापर्यंत, मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलक्षम.
वेतन :- करारपध्दतीने ठोक वेतन रु. १०,०००/-

**२) परिचारीका / एन.एम. - पदसंख्या - ५**

शैक्षणिक पात्रता :- शासनमान्य संस्थेतून जनरल नर्सिंग व मिडवाईफरी पदविका उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कांऊसिलची नोंदणी (आर.एन.आर.एम.) आवश्यक.
अनुभव :- शासकीय / निमशासकीय /खाजगी संस्थेत परिचारीका /एन.एम म्हणुन अनुभवास प्राधान्य.
वय :- ३० वर्षे पर्यंत, मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलक्षम.
वेतन :- करारपध्दतीने ठोक मासिक वेतन रु. ४५००/-

**३) प्रसविका - पदसंख्या - ५**

शैक्षणिक पात्रता :- शासन मान्य संस्थेतील ए.एन.एम. अभ्यासक्रम उत्तीर्ण.
अनुभव :- शासकीय /निमशासकीय संस्थेतील प्रसविका /ए.एन.एम. कामाचे अनुभवास प्राधान्य.
वय :- ३० वर्षापर्यंत, मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलक्षम.
वेतन :- करारपध्दतीने ठोक मासिक वेतन रु. ३०००/-

**४) फार्मासिस्ट तथा लिपीक - पदसंख्या - ५**

शैक्षणिक पात्रता :- १२ पास व शासन मान्य संस्थेतील फार्मासिस्ट मधिल पदविका उत्तीर्ण.
अनुभव :- शासकीय /निमशासकीय संस्थेतील अनुभवास प्राधान्य.
वय :- ३० वर्षा पर्यंत, मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलक्षम.
वेतन :- करारपध्दतीने ठोक मासिक वेतन रु. ३५००/-

वरील कर्मचाऱ्यांना करारपध्दतीने नियुक्त केल्यास मासिक रु. ९५,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिका क्षेत्रात वरील ठिकाणी आरोग्य उपकेंद्र सुरु करणेस व त्यासाठी वर नमुद केलेला कर्मचारी वर्ग करार पध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणेस, आरोग्य केंद्रास लागणारी आवश्यक ती औषधे, फर्निचर व उपकरणे पुरविणेस येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील. अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. उत्तनला अजून दवाखाना झालेला नाही. गेल्या महासभेत पण त्या दवाखान्यासाठी लागणाऱ्या कामगारांची आपण भरती केली. आपण त्यावेळेला मंजुरी दिली तर आता ते कामगार उत्तनला दवाखाना नसल्याने कुठे आहेत? त्यांना आपण पगार देतो का? ते आता सध्या कुठे काम करतात?

**डॉ. बावस्कर :-**

उत्तन विभागाचे आरोग्य केन्द्र सुरु करण्यासाठी आपल्याकडे त्या ठिकाणी जागा उपलब्ध नव्हती. ती जागा आपण खाजगीरित्या नॉमीनल भाड्यावर आपल्याला जवळजवळ उपलब्ध झालेली आहे. बहुतेक पुढील एक महिन्याच्या आत महापौरांशी माझी चर्चा झालेली आहे. महापौरांची वेळ मागितली की, आपण वेळ द्या. आपण ते आरोग्य केन्द्र सुरु करणार आहोत. परंतु, तयारी झालेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठे आहे.

**डॉ. बावस्कर :-**

उत्तन गावातच आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नक्की सांगता येणार नाही का?

**डॉ. बावस्कर :-**

मी तुमच्या बरोबर येउन तुम्हाला दाखवु शकेन. बस स्टँड अलिकडेच आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठिक आहे. पगाराचे सांगा. आपण त्यावेळेला वर्कसची मंजुरी घेतली होती.

**डॉ. बावस्कर :-**

आपण मला परवा भेटलात त्यावेळी मी सुचना दिली की, त्यांना कम्पेन्सेटिव्ह चार्ज आपण देत आहोत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी समजलो नाही.

**डॉ. बावस्कर :-**

जे कामगार सुट्टीच्या दिवशी काम करतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते मी सांगत नाही. या उत्तन दवाखान्यासाठी सांगा.

**डॉ. बावस्कर :-**

उत्तन दवाखान्यासाठी वैद्यकिय अधिकाऱ्याची पोस्ट व्हॅकेन्ट आहे. त्याच्यावर नियुक्ती झालेली नाही. बाकीचा जो स्टाफ आहे, ज्या व्हॅकेन्ट पोस्ट आहे. इतर ठिकाणी ते काम करतात. आपल्याकडे हेल्थ वर्कर किंवा नर्सेस तशा कमीच आहेत. आपण त्यात ॲडजेस्ट करतो. आता काही व्हॅकेन्ट पोस्ट त्यासाठी आपण जाहिरातसुध्दा मागितली होती. त्यांची नियुक्ती करुन आपल्याला उत्तनच्या दवाखान्यात पाठविण्यात येतील. त्यांची उत्तनच्या दवाखान्यासाठी नेमणुक केलेल्या कर्मचाऱ्यालासुध्दा आपण एक-दोन कर्मचारी सुरुवातीला होते. त्याच्या व्हॅकेन्ट पोस्ट होत्या. त्यासाठी वापर केला. अशा उत्तनच्या नावाने त्याचा पगार काढला जात नाही.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, डॉक्टर कामिनी चौधरी नावाची फार्मासिस्ट आपल्याकडे आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

कामिनी चौधरी फार्मासिस्ट म्हणून आपल्याकडे आहे. परंतु, कामिनी चौधरीबद्दल बऱ्याच मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. आता मागच्या महिन्यात ती प्रत्येक वेळेला अधूनमधून गैरहजर असते. निघून जाते. हिशोब देत नाही. औषधांचा हिशोब बरोबर ठेवला जात नाही. वैद्यकिय अधिकाऱ्यांची तिथल्या बाबतीत डॉक्टर अंजली पाटील आहेत. त्यांनी बऱ्याच वेळेला तक्रार दिलेली आहे. सगळ्या स्टाफने तक्रार दिली. तिच्या बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत. आता याच महिन्यामध्ये जवळजवळ आठ ते दहा

दिवस न सांगता ती गैरहजर राहिली. ती भाईंदरमधील लोकांना दिसायची. परंतु, दवाखान्यात यायची नाही. त्यांच्यामुळे तिचे रिकमेन्डेशन म्हणजे साहेबांकडे याचा संपूर्ण पत्रव्यवहार झालेला आहे. साहेबांना ते प्रकरण दाखविलेले आहे. तिला मेमो इश्यु केला होता. त्याच्यामुळे तिचे रिकमेन्डेशन आपण केलेले नाही. कारण आपल्याला दवाखाने चांगल्या पद्धतीने चालले पाहिजेत. इतर स्टाफबरोबर म्हणजे इथे बोलायला नको पण ती विनाकारण भांडत राहते. सगळ्या स्टाफने मिळूनच ती तक्रार केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

आतापर्यंत संपूर्ण जो स्टाफ आहे. ह्या सगळ्यांचे रेकॉर्ड आपल्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत का?

**डॉ. बावस्कर :-**

माझ्या माहितीप्रमाणे सध्या जेवढा स्टाफ रिकमेन्ड केलेला आहे त्या सगळ्यांची प्रत्येक वेळेला मी माहिती घेत असतो, मिटिंग घेतो, व्हिजीट देतो. सगळ्यांकडून माहिती घेउन त्यानुसारच त्यांचे रिकमन्डेशन करण्यात येते.

**जयंत पाटील :-**

आपल्या म्हणण्याप्रमाणे काही जणांची १९ तारखेला मुदत संपलेली आहे. बरोबर आहे. आजची २० तारीख आहे. मग आजच्या दिवशी काय आपण खाडा करणार आहेत का?

**डॉ. बावस्कर :-**

एक दिवस खंडीत करणार.

**जयंत पाटील :-**

म्हणजे एक दिवस खाडा आणि बाकीचे ज्यांचे आहे त्यांचा खाडा होत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

प्रत्येकाचा एक दिवस खंडीत होईल.

**अनंत पाटील :-**

महापौर महोदया, आरोग्य खात्यामध्ये आपण आता जी कर्मचाऱ्यांची यादी दिलेली आहे. या यादीमध्ये हजर किती अधिकारी आहेत व गैरहजर किती अधिकारी आहेत की, नव्या नेमणुका केलेल्या आहेत का?

**दिनेश नलावडे :-**

महापौर महोदया, सभागृहामध्ये प्रकरण क्रमांक........

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे साहेब, आपल्याला जे सेक्शन दिलेले आहे. ते आपण वाचले का? ५३(१) वाचले का? जरा खाली बसा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, मागचे सदस्य बोलतात. तुम्ही बसा. या ठिकाणी शिक्षण अधिकारी म्हणून महापौर मॅडम बसलेल्या आहेत. त्या आदेश देतील की, पाठीमागे सदस्य आदेश देतील. आम्ही ठराव मांडतो. तुम्ही तुमच्या पध्दतीने बोला काय आहे ते. आदेश तुम्ही देतात. तुम्हाला कारण माहिती आहे का? तुम्हाला बोलायचे असेल तर तुम्ही पहिले आपण असे सांगू नका की, तुम्ही बसा. आम्हाला महापौर मॅडम बसायला सांगतील.

**मिलन म्हात्रे :-**

सेक्शनने बोला. आम्ही आदेश देत नाही. आम्ही विनंती करतो.

**अनंत पाटील :-**

महापौर महोदया, ज्यावेळेला आपल्याला ही कर्मचाऱ्यांची लिस्ट दिलेली आहे. यात गैरहजर किती जण आहेत? आता नव्याने नेमणुक किती केलेली आहे? याची माहिती मिळेल का? की सुरुवातीपासूनच ही यादी आहे. त्यात काही बदल झालेले आहेत का?

**डॉ. बावस्कर :-**

ही सुरुवातीपासूनची यादी आहे. नव्याने नेमणुका याच्यामध्ये कुठल्याही दाखविलेल्या नाहीत. मागच्या महासभेत सहा महिन्यापूर्वी ज्या ठरावाला मंजुरी घेतली होती. त्यातीलच हे कर्मचारी आहेत. त्यांचा आपण मुदतवाढीचा प्रस्ताव दिलेला आहे. नव्या कर्मचाऱ्यांचा याच्यामध्ये समावेश नाही.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, याच्यामध्ये सेक्शन ५३ च्या (१) जो आपण कोर्ट केलेला आहे. सेक्शन ५३(१) पूर्ण वाचा. सेक्शन ५३ (१) च्याकरिता आपण ती मंजुरी देतो. ती कर्जविषयक कामासाठी करावयाच्या

कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्याहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने या अटीवर करता येतील. या ज्या कर्जविषयक बाबी आहेत या संपूर्ण आपल्या आरोग्याच्या ह्याच्यामध्ये ५३(१) कुठे लागू होतो ते मला जरा सांगा. आपण काय कुठे कर्ज काढले आहे का? व्यवस्थित वाचा आणि कर्ज विषयक काढले असेल तर क्लिअर करा नाहीतर मग ठराव करुन घ्या आणि मग पास करा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, प्रकरण क्र. ५७ आपल्या सभागृहापुढे आलेला आहे. आरोग्य केन्द्रासंबंधामध्ये बरोबर चर्चा झालेली आहे. प्रत्येक सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत.

(सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**रविंद्र माळी :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठरावाला विरोध नाही. तरतुद अशी आहे. ठराव झालेला आहे. अनुमोदन झालेले आहे. पण जी तरतुद आहे ती सहा महिन्यापासून जास्त नविनीकरण करता येत नाही. तेव्हा एक वर्षासाठी जेव्हा तुम्ही एक्स्टेन्शन दिलेले आहे. कायदेशीररित्या ते चुकीचे आहे. सहा महिन्याचे नविनीकरण करा आणि.............

**दिनेश नलावडे :-**

या ठिकाणी आपण एक वर्षाची मुदतवाढ करतो. ती दुरुस्ती करुन पुन्हा सहा महिन्याची करावी अशी मी सुचना करित आहे.

**रविंद्र माळी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी करारपद्धतीने नेमण्यांत आलेल्या कर्मचारी वर्गास मुदत वाढ देणे बाबत.

**ठराव क्र. ६४ :-**

मा. महासभा विषय क्र. ०५ ठराव क्र. ०५ दि. १९/४/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात

| | |
|---|---|
| भाईंदर पूर्व | २ |
| भाईंदर पश्चिम | २ |
| उत्तन | १ |
| मिरारोड | १ |
| काशी मिरा | १ |

व एक फिरता दवाखाना सुरु करणेसाठी व त्यासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाची करारपध्दतीने नेमणूक करणेसाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. आरोग्य केंद्रासाठी लागणारे कर्मचारी करारपध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणेस मा. महासभा ठराव क्र. १२ दि. ०५/०६/२००४ अन्वये सहा महिन्यासाठी नियुक्तीस मंजूरी दिलेली आहे. ती मुदत या महिन्यात संपत आहे.

आरोग्य केंद्रासाठी तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने नेमलेल्या खालील कर्मचाऱ्यास एक वर्षाची मुदत वाढ देणेसाठी प्रशासनाकडून शिफारस करण्यात आलेली आहे.

| नाव | हजर दिनांक | ६ महिन संपल्याचे मुदत दिनांक |
|---|---|---|
| डॉ. चंद्रशेखर कांबळे | २९/७/२००४ | २८/१/२००५ |
| डॉ. प्रमोद पडवळ | १०/८/२००४ | ९/२/२००५ |
| डॉ. अंजली पाटील | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| डॉ. रत्नप्रभा पिसाळ | १७/८/२००४ | १६/२/२००५ |
| डॉ. नंद किशोर लहाने | २३/७/२००४ | २२/१/२००५ |
| डॉ. वंदना पाटील | २०/९/२००४ | १९/३/२००५ |
| **एन. एम.** | | |
| श्रीमती लिटा कारवालो | २९/७/२००४ | २८/१/२००५ |
| श्रीमती ज्योती सातवे | २०/७/२००४ | १९/१/२००५ |

| | | |
|---|---|---|
| श्रीमती रसिका दळवी | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती मीना तेरडे | १३/७/२००४ | १२/१/२००५ |
| श्रीमती मेघना चुरी | १०/८/२००४ | ९/२/२००५ |
| श्रीमती शकुंतला देवळेकर | २/९/२००४ | १/३/२००५ |
| श्रीमती जागृती वेताळे | २/९/२००४ | १/३/२००५ |
| **फार्मासिस्ट कम लिपिक** | | |
| श्री. राहुल भोईर | १३/७/२००४ | १२/१/२००५ |
| श्री. सचिन करंडे | ११/८/२००४ | १०/२/२००५ |
| श्रीमती रुपाली कोलते | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्री. संजीव धुमाळे | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती वैशाली मोरे | २९/१०/२००४ | २८/४/२००५ |
| श्री. प्रकाश थोरात | १६/९/२००४ | १५/३/२००५ |
| श्री. सुधीर पावले | १८/१०/२००४ | १७/४/२००५ |
| **ए. एन. एम.** | | |
| श्रीमती रेश्मा शेट्टी | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती रुपाली दरेकर | २१/७/२००४ | २०/१/२००५ |
| श्रीमती भोंगाडे पदमा | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती परिदा पठाण | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती मनिषा हिंदळेकर | २१/७/२००४ | २०/१/२००५ |
| श्रीमती संध्या शिंगाडे | २८/७/२००४ | २७/१/२००५ |
| श्रीमती प्रिया पागधरे | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती शितल पवार | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती सरिता ठाणकर | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती प्रमिला देसाई | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती सिमा चव्हाण | २०/७/२००४ | १९/१/२००५ |
| श्रीमती जयश्री सावंत | २८/९/२००४ | २७/३/२००५ |
| श्रीमती निलीमा मोकल | १७/९/२००४ | १६/३/२००५ |
| श्रीमती जॉयसी हेन्ड्रीक्स | ९/९/२००४ | ८/३/२००५ |
| श्रीमती अश्विनी पोतदार | ७/९/२००४ | ६/३/२००५ |
| श्रीमती संदेना पवार | १४/९/२००४ | १३/३/२००५ |

तरी वरील सर्व कर्मचाऱ्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून एक दिवसाची सेवा खंडीत करुन पुढील ६ (सहा) महीन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने नेमणुकीस ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश द. नलावडे.　　　अनुमोदन :- श्री. रविंद्र माळी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी पुरक घोषणा क्र. ५८ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सर्वप्रथम सन्मा. महापौर मॅडम, आपण माझा प्रस्ताव स्विकारला आणि चर्चेला परवानगी दिली. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सचिव साहेब हा प्रस्ताव पूर्ण वाचून दाखवायला लागेल का?

**प्र. सचिव :-**

नको.

**मिलन म्हात्रे :-**

काही गरज नाही ना. शॉर्टमध्ये मला काही मुदद‍े बोलायचे आहेत. या सभागृहात बसलेले बहुतेक सर्व नगरसेवक ज्यांच्या प्रभागामध्ये सार्वजनिक स्वरुपाची शौचालये बनविलेली आहेत त्यांना

एक-दिड वर्षापूर्वी मी स्वतः स्टॅंडिंगला सदस्य असताना काही खाजगी संस्थांना त्यांची आर्थिक पात्रता न पाहता आपण सांगा लोकांना काही कार्य करायला मिळेल. त्यांना फायदा होईल. मोबदला होईल. या दृष्टिकोनातून महापालिकेची स्वतःच्या खर्चाने बांधलेली शौचालये साफसफाई करण्याकरिता पैसे द्या आणि वापरा या तत्वावर आपण दिली गेली. सर्वपथम आपला हा प्रयोग होता. हा प्रयोग ज्यावेळेला आपण करावयाचा होता. म्हणजे सुरु करण्या अगोदर स्थायी समितीमध्ये याच्यावर साधकबाधक चर्चा झाली. सगळ्या नगरसेवकांच्या दृष्टिकोन असा होता की, हा एक नवीन प्रयोग आहे आणि जेणेकरुन झाल्यानंतर शहरामध्ये सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता वाढेल. माझ्या प्रभागामध्ये जवळजवळ चार ठिकाणी ही सेवा चालू आहे. परंतु, या सेवेचे एक-दिड वर्षाचे काम पाहता बहुतेक बऱ्याच ठिकाणी नागरिकांमध्ये निरनिराळ्या प्रकारचा रोष आणि त्या ठिकाणी हाणामारीचे आणि कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रसंगसुद्धा उद्‌भवलेले आहेत. आरोग्य विभागाकडे आपण काही तक्रारी केल्या की, आरोग्य विभाग म्हणतो सदर प्रस्ताव हा बांधकाम विभागाचा आहे. बांधकाम विभागाकडे तक्रार केली की, ते म्हणतात साफसफाईचे प्रकरण आहे ते आरोग्य विभागाकडे आहे. ही दोन्ही उत्तरे आपल्याला मिळतात. परिणामी लोक प्रत्येक घरातून रु. २०-२० घेतल्यानंतरसुध्दा म्हणजे या प्रकरणामध्ये जो नागरिकांचा त्रास आहे. तो वाढत चालला आहे आणि त्यामध्ये काहीतरी सुधारणा करावी असे आपल्याला सगळ्यांनाच वाटते. तर माझ्या प्रस्तावावर मी माझा ठराव आपल्याला वाचून दाखवितो. प्रकरण क. ५८ मिरा भाईंदर मनपा हद्दीतील...........

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, एक मिनिट थांबा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्हाला याच्यावर बोलायचे आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला या विषयात विनंती करतो.

**जेन्वी आल्मेडा :-**

एवढे बोलायचे म्हणजे ते बोलतच राहतील. आम्ही ऐकतच रहावे का?

**महेन्दसिंग चौहाण :-**

अध्यक्ष महोदय ऐसा प्रस्ताव पहिले पास हो चुका है। पैसे द्या आणि वापरा यह प्रस्ताव पहले स्टॅंडिंग कमिटीमे पास हो चुका है। इसमे नया क्या है? हम लोग पहले स्टॅंडिंग कमिटीमे पास कर चुके है।

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, माझे निवेदन अजून पूर्ण संपलेले नाही.

**मोहन पाटील :-**

ते पत्र आपल्याला दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पत्र निराळे आहे. पत्रावर नीट वाचलेले नाही. आपण ते जरा वाचा आणि आमचा त्याच्यावर ठराव आहे.

**महेन्दसिंग चौहाण :-**

लेकिन रु. २०/- प्रति कुटूंबका दिया है। उसको मेरा विरोध है। आप रु. २० नही ले सकते।

**मिलन म्हात्रे :-**

ले रहे है। ठराव पास हो गया। वही तो हम बोल रहे है। आप हिन्दी मे बोल रहे हो। मै मराठी मे बोल रहा हूँ। इतनासा फरक है।

**महेन्दसिंग चौहाण :-**

कुछ फरक नही पडता है। आप मराठी मे बोलो। मै समझता हूॅ।

**मिलन म्हात्रे :-**

क्या है बोलो।

**महेन्दसिंग चौहाण :-**

यह रु. २०/- प्रति कुटूंब लिखा है। उसके लिए आप रु. ५/- प्रति कुटूंब रखिये।

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समिती आपकी है। सभापती आपके है। सब कुछ आपका है। आपने वह नक्की किया है।

**महेन्दसिंग चौहाण :-**

तो यह चॅप्टर दुबारा कैसे आया?

**मिलन म्हात्रे :-**

यह आप लोगोने दो साल पहले रु. २०/- नक्की किया है। मॅडम, मला यांच्याबरोबर वेळ घालवायचा नाही. मॅडम, मी हा प्रस्ताव मांडलेला आहे. त्याला तुम्ही परवानगी दिलेली आहे. म्हणून मी उभा राहिलो.

**महेन्दसिंग चौहाण :-**

यह भी थे। आपने बात की है तो फिर यहाँ पर प्रस्ताव लाने की क्या जरुरत है? घडी घडी समय खराब करने का क्या मतलब है?

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, याच्यामध्ये प्लॅनिंग करुन ठरावावर चर्चा करुन द्यायची नाही असे ठरलेले आहे.

**महेन्दसिंग चौहाण :-**

ऐसा कुछ नही है।

**मिलन म्हात्रे :-**

मग असे का चाललेले आहे?

**जेन्वी आल्मेडा :-**

खाई त्याला खवखवी असे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खवखवी नाही. आम्ही खाईसुध्दा नाही आणि खवखवीसुध्दा नाही.

**मा. उपमहापौर :-**

या विषयामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपण एक प्रस्ताव दिलेला आहे. आपण या प्रस्तावामध्ये असे म्हणतो की, मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील शौचालये पैसे द्या आणि वापरा या तत्वावर आपण दिलेली आहेत. तर त्याच्या बदल्यामध्ये आपण बऱ्याच ठिकाणची अशी शौचालये आहेत की, जी शहराच्या प्रमुख रस्त्यावर किंवा ज्या ठिकाणी जे क्राउडेड एरिया आहे. तिथे आहे. अशा ठिकाणी त्या शौचालयाने चांगला धंदा मिळतो. परंतु, कुठे दाट वस्त्यामध्ये आहेत. तिकडे धंदा मिळण्याचे एकमेव साधन म्हणजे जे लोक वापर करतात. त्या लोकांसाठी रु. २०/- फी ठरवायची असे आपण स्थायी समितीमध्ये असताना असा ठराव झाला होता आणि आता आपली सुचना अशी आहे की, संपूर्ण शहरामध्ये ही जी शौचालये आहेत. त्यांची वसुली त्या त्या कॉन्ट्रॅक्टरने न करता ही संपूर्ण घरपट्टीच्या माध्यमातून ही रक्कम लावली जावी. परंतु, शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी, बऱ्याच लोकांच्या घरात स्वतःची टॉयलटस् आहेत. ज्यांच्या घरात ही टॉयलेटस् आहेत हे लोक त्या शौचालयाचा उपयोग करत नाही. आरोग्य रस्त्यावर आहे. त्या रस्त्यावर त्या परिसरातील लोक त्याचा वापर करण्यापेक्षा तिथून येणारे-जाणारे जास्त वापर करित असतात. त्याच्यामुळे आपण जो प्रस्ताव सांगितलेला आहे. तो प्रस्ताव मुळातून मला चुकीचा वाटतो.

**मिलन म्हात्रे :-**

माझा ठराव तर वाचा. मी काय बोलतो ते ऐका. मला काय बोलायला द्याल तर खर.

**मा. उपमहापौर :-**

बोलायला देतो. पण तुम्ही ठराव मांडता सांगितले म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

माझा ठराव तर ऐका. नसेल तर त्याच्यावर मतदान घ्या. फेटाळून लावा. त्याच्यात काय आहे? काही बोलायला तर द्याल. एवढ्यात माझा ठराव वाचून झाला असता. आपण जे रु. २०/- ठरविले त्याचा दुरुपयोग काय झालेला आहे. ते मी अगोदरच बोललो. रु. २०/- स्थायी समितीचे आपण जे नक्की केले. प्रस्ताव वाचून झाला. मी प्रस्ताव संक्षिप्त वाचला. ठराव वाचायला घेतला तर इकडे बोंबाबोंब सुरु झाली. एवढ्यात माझे वाचून झाले असते. (ठरावाचे वाचन केले.) याच्यात मी चुकीचे काय बोललो? ज्या संस्था फेल्युअर गेलेल्या आहेत त्यांचे करारनामे रद्द करा आणि रु. २०/- जसे पूर्वीपासून खरेदी करायचे तशीच सिस्टीम ठेवा. मी काहीही बोललो नाही. ठराव एकदम क्लिअर आहे.

**मोहन पाटील :-**

पहिला ठराव क्लिअर आहे. आपण पुन्हा अतिरिक्त बोजा देतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

अतिरिक्त बोजा कुठे आहे ? सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब तुम्ही अध्यक्ष असताना जे ठराव केले. तेच ठराव आहेत.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे. पण आपण ते टॅक्सच्या माध्यमातून देत नव्हतो.

**मिलन म्हात्रे :-**

पण ठरावामध्ये मी ते घेतलेले नाही.

**मोहन पाटील :-**

पण आपण ते कराराच्या बाजूने देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावाच्या कॉप्या घ्या. मी सदर ठराव सभागृहापुढे सुचक या नात्याने ठेवत आहे.

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**महेन्दसिंग चौहाण :-**

इसमे जो दिया है। मै पुछना चाहता हुँ पहले ठराव ऑलरेडी हो चुका है। सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपने रु. २०/- मे कितने आयटम रखे? दो आयटम है। या एक आयटम है। पेसाब करना भी इसमे शामिल है। संडास तो अलग है। आपने दो आयटम रखे या एक रखा। यह घडी घडी हो गया। यह एक बाद ठराव हो गया। रु. २०/- प्रति कुटूंब रखने का क्या मतलब है?

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, की, हा विषय महापौरांसहित सर्व अत्यंत गंमतीने घेतात. गंमतीने घेण्याबद्दल काही वाद नसावा. पण त्या विषयातील महत्वाचे जे समजून घ्यायचे आहे त्याला बगल देउन आपण विषय चालवितो आहे हे दुर्दैव आहे. नगरपरिषदेने लाखो रुपये खर्च करुन सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी खेडेगावात, ग्रामीण भागात किंवा शहरी भागात ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधली. आता ती सत्ताधारी पक्षाची नुसती री चाललेली आहे. हे आम्ही केले. हे आम्ही आता असे बोलू शकतो का की, त्यांचे सगळे दरवाजे तोडले हे तुम्ही तोडले. त्यांची भांडी फुटली, ती तुम्ही फोडली. त्यात लाईट नाही, ती लाईट तुम्ही घालविली. जे पाणी बंद केले ते तुम्ही बंद केले. जेव्हा ह्या नगरपरिषदेने सर्वसामान्य नागरिकांच्या भावना आणि गरजा ओळखून हे कामकाज केले. त्या नगरपरिषदेतील सगळ्या अधिकाऱ्यांना, सन्मा. सर्व नगरसेवकांना सर्वसामान्य जनतेने धन्यवाद दिले. पण जेव्हा वापरायची कस्टडियन म्हणून तुमच्याकडे जबाबदारी आली. आम्ही सत्ताधारी हे सकाळपासून चालले आहे. मी तुम्हाला आगह करतो की, महापौरांची यशस्वी कारकीर्द म्हणून एक तुम्ही अधिवेशन लावा. स्वतंत्र सभा घ्या. त्या सभेमध्ये महापौर मॅडमनी हे केले. जेवढे तुम्हाला बोलायचे तेवढे करा आणि अभिनंदनाचा ठराव करा. तर आम्हाला जेवढे चांगले वाटेल त्याचे आम्हीही अभिनंदन करु. पण नको त्या ठिकाणी उगाच काहीतरी आपण दाखवितो. कुणीतरी आमच्याकडे बघावे असे काही कारण नाही. तुमचे तुम्हीच आहात. याची नैतिक जबाबदारी घ्या की, ते दरवाजे कोणी तोडले. सत्ताधारी पक्षाने तोडले का? ते पाणी कोणी बंद केले. ती तुमची नैतिक जबाबदारी आहे. तुम्ही पार पाडत नाही. एखादा सन्मानित सदस्य एक साधारण सुचना करतो आहे तर त्यात हसण्याचे काय कारण आहे. त्यांना कशासाठी हसावे. संख्याबळ दाखवितो, सक्ती दाखवितो की, आपली मस्ती दाखवितो. काही कारण नाही.

**महेन्दसिंग चौहाण :-**

अध्यक्ष महोदय, ऐसी बात नही है। यह इतना गंभीर नही है। जितना यह गंभीर ले रहे है।

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला संपूर्ण सभागृह मान देते. तुम्ही सगळ्या गोष्टी चर्चेला नेउ नका.

**मोहन पाटील :-**

चुका झाल्या असतील तरी माणुस चुका सुधारतो.

**महेन्दसिंग चौहाण :-**

आपको बोलने की जरुरत नही है। आप अपना काम किजिए।

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी चुका झाल्या तरी त्याला अधिकारी जबाबदार आहेत का? किंवा काय त्याचा खुलासा करावा. त्याने सभागृहाचे मत वाढते. तेव्हा काल संडासची दारे तोडलेली होती. आठ दिवसात चांगली झाली. तिथे लाईट नव्हती, तिथे लाईट आली. तिथे पाणी नव्हते, तिथे पाणी आले.

अशी काहीतरी घोषणा करा की, हे सगळे काम आठ-पंधरा दिवसात होईल. सफाईचे काम होत नाही. काही ठिकाणी तुडुंब भरलेले आहे की, नाही किंवा जातच नाही. मागचे सेफ्टिक टँक कुठे आहे त्याचा पत्ता नाही. अशी जी स्थिती आहे ती काय स्थिती आहे? त्याच्यावर आपण जरा रुलिंग दिले तर त्याच्यात आणखी सन्मान वाटेल.

**मिलन पाटील :-**

आपण ही जी सुविधा केलेली आहे ही गरिबांकरिता केलेली आहे. रोडवर जे बसणारे लोक आहेत त्यांच्याकरिता आपण ही सुविधा उपलब्ध केलेली आहे. महापौर साहेब, मी एक सुचना करु इच्छितो की, भाईंदर पश्चिमेला आपले स्टेडियम आहे. तिथे जे शौचालय आहे ते इतके घाट्यामध्ये चालवितो की, रु. २०/- जे ठेवलेले आहे तिथे झोपडपट्टी तर लांब आहे. येणारे जाणारे आहेत त्यांना परवडतसुध्दा नाही. आता स्टेडियमवर जे मुले खेळायला येतात ती मुले खेळायला आल्याने तिथे संडास आणि मुताऱ्या आहेत त्या पुरेशा प्रमाणात नाहीत. म्हणजे त्या संडास आणि मुताऱ्या या स्टेडियमच्या बाजूला बांधाव्यात जेणेकरुन त्या स्टेडियमवर मुले, मुली ज्या खेळायला येतात त्या मुलींकरिता तिथे काही सोय नाही. ज्या शाळेच्या मुली खेळायला येतात त्यांच्याकरिता तिथे काही सोय नाही. तरी एक दहा गाळ्याचे शौचालय तिथे बांधावे अशी माझी सुचना आहे. या ठरावाचे वैधानिक माझी सुचना आहे ही मान्य करावी.

**संगिता म्हात्रे :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मोहन पाटील :-**

मघाशी जे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी जो आपल्याला या ठिकाणी ठराव दिला होता व ठराव वाचला. तरी माझी प्रशासनाला विनंती आहे की, आपण जो प्रस्ताव दिलेला आहे. तो वेगळा आहे. प्रस्तावाच्या सुविधेच्या वाक्य असे आहे की, पूर्तता करुन घेउन संबंधित रक्कम शौचालय वापरणाऱ्याकडून रु. २०/- प्रतिमहिना (रु. १२०/- प्रतिवर्षी) घरपट्टीतून वसुली करण्यात ठराव पारित होण्यास महासभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तर घरपट्टीने घेण्याचा तुम्ही प्रस्ताव दिलेला आहे. तुम्ही ठराव मांडताना वेगळा मांडलेला आहे. आपण जेव्हा ठराव मांडण्यास 'ज' जे प्रस्ताव देता त्या पध्दतीने ठराव आले पाहिजेत की, आणखी वेगळे ठराव आले पाहिजे याचा जरा प्रशासनाने खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये प्रतिमहिना आणि मासिक असे दोन प्रकार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

'ज' चा प्रस्ताव मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार असतो. त्यांना जसा हवा तसा तो मांडू शकतात. प्रस्ताव मांडते वेळी वेगळा ठराव देते वेळी वेगळा.........

**मिलन म्हात्रे :-**

हे बेकायदेशीर आहे.

**रोहिदास पाटील :-**

बेकायदेशीर असेल तर फेटाळा.

**मोहन पाटील :-**

फेटाळण्याचा पश्न येत नाही.

**मोहन पाटील :-**

परंतु, यात आपण 'ज' खाली मासिक आणि वार्षिक बोलतात. तेव्हा मासिक म्हणायचे का वार्षिक म्हणायचे.

**मिलन म्हात्रे :-**

मासिक हे प्रत्येकाचे घरुन करतात का? हाउस टॅक्स मासिक घेतात का? वार्षिक ना. मी दोन अल्टरनेट ठेवलेले आहेत. मासिक आणि वार्षिक. ठराव मासिकच दिलेला आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आमचे असे म्हणणे आहे की, आपण या ठिकाणी वेगळा पस्ताव दिलेला आहे. आपण घरपट्टीतून पैसे वसुल करावे असे आपण दिलेले आहे. आपण ठराव मांडताना दुसरे दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. याच्यामध्ये दोन प्रपोजल आलेली आहेत. एक महिना रोकडे घ्यायचे आणि दुसरे प्रपोजल आहे की, तुम्ही टॅक्समध्ये घ्यायचे. आम्ही ठरावामध्ये फक्त महिन्याचे बोललो, संपले. आता जे चालले आहे तेच काय आहे. नवीन ठराव नाही. त्यांचाच तो ठराव आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपण आता जे ठरावात दिलेले आहे. त्याची प्रोसेस आपली सध्या चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी काय म्हणतो त्यांच्या ठरावानुसार कार्यवाही चालू राहिल. आयुक्तांना मीसुध्दा नेउन दाखविलेले आहे. ठराव आपण झाल्यानुसार पैसे फक्त ते कलेक्शन करतात. शहरामध्ये साफसफाई होत नाही. हे माझे इलिगेशन आहे. त्याच्याकरिता त्या सगळ्या संस्था टर्मिनेट करुन ज्या संस्था आर्थिक दृष्ट्या सबळ आहेत अशा लोकांना कॉल करा आणि त्यांना ती कामे द्या म्हणजे कामे चांगली होतील हे माझे म्हणणे आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आताच जे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी निवेदन केले. त्यांच्याशी मी सहमत आहे. कारण आमच्या वॉर्डमध्ये असे सहा ते सात संडास होते. त्यानंतर त्या संडासाचे दोन राहिलेले आहेत. ते सुव्यवस्थित नाहीत. त्याच्यासाठी त्याची जी भांडी, दरवाजे वगैरे तोडलेले असतील ते रिपेअर करावे किंवा कोणी शौचालय चालविणारे कोणी चालक असेल, सोसायटी असेल त्यांच्या हाती देउन या पुढील व्यवस्था त्यांनी करावी आणि ज्या टाक्या भरलेल्या आहेत त्या सुद्धा खाली करुन आणि महापालिकेच्याद्वारे साफसफाई फिनाइल वगैरे टाकून करावी अशी तुम्हाला विनंती करतो.

**शुभांगी नाईक :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते. आतापर्यंत सुलभ शौचालयाची चांगली स्तुती झाली. परंतु, आपल्या मिरा भाईंदर हद्दीमध्ये जे संडास आहेत. खालून वरपर्यंत चौथ्या माळ्यापर्यंत किती वास मारतो. संडासाला तर औषधाची फवारणी नाही. काही नाही. लेडिज कशा कन्डीशनमध्ये जातात हे त्यांनी स्वतः जावे आणि बघावे. साफसफाई कधीच वेळेवर होत नाही. आपल्या महानगरपालिकेची ही स्थिती अशी सध्या चालली आहे आणि लेडिजचा प्रॉब्लेम आहे.

**रतन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आपल्या नवघरची शाळा क्र. १३ मध्ये गेल्यानंतर आपले आरोग्य केन्द तिथे आहे. शाळेच्या दोन्ही बाजूला संडास, बाथरुम आहेत. पण एका साईडचे संडास, बाथरुम तिथे आरोग्य केंद्र आल्यामुळे ते बंद करण्यात आलेले आहे अशी तेथील शिक्षकांची तक्रार नाही. पण त्यांनी मला तसे सांगितलेले आहे की, अशा पद्धतीने येणाऱ्या विद्यार्थ्यांना एकाच बाजूला जायला लागते. विद्यार्थी, शिक्षक एकाच बाजूला जातात. म्हणून तिथे फार गर्दी होते. आउटलाईनसुद्धा व्यवस्थित निघालेल्या नाहीत. जर दुसरी जी संडास, बाथरुम हे बाजूला आहेत, आरोग्य केंद्राकडे आहेत ते परत एकदा चालू करावेत.

**धनराज अग्रवाल :-**

जो विषय चालू आहे. त्या विषयावर बोलायचे. वेगळे कशाला बोलता?

**रतन पाटील :-**

वेगळ्या विषयावर बोलत नाही.

**मा. महापौर :-**

हा विषय संपवून टाका.

**रतन पाटील :-**

त्यांना त्रास होतो म्हणून ते बोलतात. आम्हाला त्रास होत नाही. साहेब, ज्यांना त्रास होतो तो त्रास सांगतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आतापर्यंत पहिली आपली नगरपालिका होती. त्यावेळेला जे संडास बांधले. त्याच्यानंतर नगरसेवकांच्या निधीतून जे संडास बांधतात. तर असे संडास मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जवळजवळ १७५ आहेत. त्या संडासाच्या बाजूने आपल्याला जायला होत नाही. हे असे का होते? तर त्याच्यावर पाणी नाही. तरी अशा सगळ्या संडासांना महानगरपालिकेने पाणी द्यावे अशी माझी उपसुचना आहे. ती जरा ह्याच्यामध्ये समाविष्ट करावी.

**प्रकरण क्र. ५८ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक १२/०१/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शौचालये ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर चालविण्यास देणे कामी धोरण निश्चित करणे.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महापालिकेने स्वतः बांधलेलया शौचालयाच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे रु. २०/- प्रति कुटूंब मासिक वापरणाऱ्या नागरीकांकडून आकारुन चालविणेंस खाजगी संस्थांना यापुर्वी म.न.पा.ने दिलेली आहेत. संबंधित संस्थांना त्यांना दिलेलया शौचालयाची आवश्यक ती दुरुस्ती रंग रंगोटी, आवश्यक ती औषध फवारणी करणे, पाण्यांची टाकी बसवून पाणी पुरवठा करणे, लाईट कनेक्शन देणे, दररोज साफसफाई करणे हि कामे करायची होती. महानगरपालिकेने संबंधित संस्थांना कामे देतांना त्यांची आर्थिक क्षमता पाहिली नाही व त्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य दिले होते. परंतु, या स्थानिक संस्था आर्थिक दृष्ट्या पुर्ण अपयशी ठरलेल्या आहेत. याबाबत मी स्वतः मा. आयुक्त यांना प्रत्यक्ष हि शौचालये नेऊन दाखविलेली आहेत. या संस्थांच्या कामाबाबत मा. आयुक्त यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. अशा प्रकारे सदर संस्थांवर आरोग्य व बांधकाम विभागाचे जराही नियंत्रण नाही व हे आरोग्याच्या दृष्टीकोनातून हानीकारक आहे.

वरील सर्व मुद्दे विचारात घेता खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्यांत यावे.

१) यापुर्वी बांधकाम विभागाकडून दिलेलया सर्व संस्थांचे करारनामे व परवानग्या त्वरीत रद्द करण्यांत याव्यात.

२) महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व शौचालयांची प्रभाग अधिकारी व आरोग्य विभागातील स्वच्छता निरिक्षक यांनी पाहणी करुन विभागवार शौचालयांचे गट स्थापन करुन आर्थिक क्षमता असलेल्या व अनुभवी संस्थांकडून नव्याने निविदा मागवून करारनामे करुन रु. २०/- प्रति कुटूंब मासिक या दराने वापरणाऱ्यांकडून संस्थांनी वसुली करुन येणाऱ्या सर्व ठिकाणच्या संस्थांना शौचालये चालविण्यांस देण्यांत यावीत.

३) संबंधित संस्थांना शौचालयाची वीज, पाणी, औषध फवारणी इत्यादी व्यवस्था व दैनंदिन साफसफाई करणे बंधनकारक करावे व त्यावर आरोग्य विभागातील स्वच्छता निरिक्षक व इतर अधिकारी यांचे नियंत्रण ठेवण्यांत यावे. त्यांच्याकडून संबंधित संस्थांचे कामाबाबत साप्ताहिक अहवाल घेण्यांत यावेत व संबंधित संस्थांची कामे समाधानकारक नसल्यास त्वरीत करारनामे व परवानग्या त्वरीत रद्द करण्यांत याव्यात. तसेच नविन कामात हलगर्जीपणा करणाऱ्या म.न.पा. अधिकारी व कर्मचारी यांच्यावर महापालिका अधिनियम १९४९ नियमानुसार कारवाई करावी.

वरीलप्रमाणे प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्यांस हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन व. म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. नयना गजानन म्हात्रे.**

मा. सचिवांकडून सभागृहात ठरावाचे पुनर्वाचन करुन ठराव कायम करण्यांत आला.

ठराव पुढील कारवाई करीता मा. आयुक्तांकडे तात्काळ पाठविण्यांत यावा.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी पुरक घोषणा क्र. ५९ चे वाचन केले.)

**महेन्दसिंग चौहाण :-**

महापौर मॅडम, यह जो पत्र पढ रहे है। इस एरिया के नगरसेवकोंकी इस तरहकी कोई डिमान्ड नही है। यह एरिया नं. ८ हायवे काफी लंबा है। इसमे नामोनिशान तक नही है।

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. मा. महापौर मॅडम, सदरचा प्रस्ताव सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी या सभागृहापुढे आणला आणि स्थानिक नगरसेवक म्हणून आम्हीसुध्दा त्या प्रभागामध्ये कार्यरत आहोत आणि कार्य करतो अशा प्रकारची मागणी मी स्वतः पालिकेच्या माध्यमातून केलेली

होती.  विकास आराखड्याच्या रस्त्यानिमित्त पालिकेने त्याची पूर्वी कुठली कार्यवाही केलेली आहे.  ते संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट करावे.

**एन्. आर. शेंडे :-**

मा. महापौर महोदय, विषय क्र. ५९ जो आलेला आहे.  विकास आराखडा यात जे तीन रस्ते सुचविण्यांत आले आहेत ते त्यात नसल्यामुळे तरी विकास आराखड्यात तशी दुरुस्ती करावी.  या विषयासंदर्भात मला असे सांगावेसे वाटते की, सन्मा. नगरसेविका सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांचीसुद्धा याबाबत मागणी होती व त्यांनी तशी मा. आयुक्त साहेबांकडे सुद्धा विनंती केलेली होती आणि त्याप्रमाणे त्यांना सुचवायचे जे रस्ते होते जिकडे विकास आराखड्यात रस्ते नाहीत व कच्चे रस्ते आहेत त्या रस्त्यांच्या बांधकामाबाबत ज्या अडचणी येत होत्या त्याप्रमाणे सर्व्हे करुन आणि पुढे काय करता येईल याबाबत विचारविनिमय झाला होता आणि मा. आयुक्त साहेबांनी तसे आदेश दिले होते.  त्याप्रमाणे मी माझ्या विभागातील कर्मचारी वर्गांना त्या भागांचा टेन्टीटिव्हली सर्व्हे करण्याचा आदेश दिला होता. त्याप्रमाणे त्यांनी टेन्टीटिव्हली सर्व्हे करुन मला रिपोर्ट दिलेला आहे.  सद्यस्थितीत त्या ठिकाणी विकास आराखड्यात रस्ते नाहीत आणि जे वापरात आहे ते कच्च्या स्वरुपाचे आहेत.  साधारणतः १० फुट किंवा २० फुट अशा प्रकारचे आणि नागमोडी स्वरुपाचे रस्ते आहेत.  तरी हे रस्ते जर विकास आराखड्यात दाखवायचे असतील आणि त्याचा विकास करावयाचा असेल तर प्रथमतः त्या क्षेत्राचा एग्झीस्टिंग लॅन्डविझेशन सर्व्हे करावा लागेल आणि एग्झीस्टिंग लॅन्डवेज सर्व्हे केल्यानंतर त्या ठिकाणी कशा प्रकारचे रस्ते प्रस्तावित करता येतील याचा डिटेल प्रस्ताव तयार करुन मा. महासभेपुढे सादर करावा लागेल.  तरी अजुन डिटेल सर्व्हे करायला काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.  त्यामुळे सद्यस्थितीत विकास आराखड्यात बदल करण्याचा प्रस्ताव आम्ही सादर केलेला नव्हता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम जर स्थानिक नगरसेवकांनी मागणी केलेली आहे.  सदर बाबतीत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही सुरु केलेली आहे.  मा. महापौर आपणासोबत त्याबाबत चर्चा झालेली आहे.  मा. आयुक्त साहेबांबरोबर सुद्धा सदर रस्त्याबाबत चर्चा झालेली आहे. तरी सदर रस्त्यामधील त्या जागेच्या मालकांना बोलावुन पालिकेमध्ये चर्चा झालेली आहे. मग महानगरपालिका कारवाई करत आहे. तर मग असे प्रस्ताव 'ज' च्या नियमाखाली आणुन सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांना काम दाखवायचे आहे आणि काय सुचवायचे आहे याबाबत मला काही समजत नाही.  तरी मा. महापौर मॅडम अशा प्रकारचे प्रस्ताव आणुन उगीच एखाद्या वार्डामध्ये इतर नगरसेवकाने हस्तक्षेप करणे हे काही योग्य नाही.  ज्याला त्याला आपआपल्या वार्डामध्ये काम करण्याचे परमिशन मिळाले पाहिजे आणि तो स्थानिक नगरसेवक त्या प्रभागामध्ये काम करीत असतो.  परंतु आता मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे प्रस्ताव आणुन एक नवीन पायंडा पाडण्यास सुरुवात केलेली आहे. कारण ज्या नगरसेवकांनी त्या प्रभागात काम केलेले आहे.  त्या नगरसेवकाचे श्रेय लुटल्याचे जर असे चालले असेल तर हे काही योग्य नाही आणि अशा प्रकारचे प्रस्ताव मला वाटते मंजुर करुन इतर लोकांना काय दाखवायचे आहे हे काही कळत नाही आणि मला वाटते माझे सहकारी नगरसेवक सन्मा. सदस्य श्री. आत्माराम गावंड आणि सौ. जिवी हिरा वाडे यांनीसुद्धा याबाबत पत्रव्यहार केलेला आहे आणि जर इतर पक्षाचे नगरसेवक त्याला आणखी सहकार्य करीत असतील तर ते योग्यच आहे. त्याबद्दल धन्यवाद.  परंतु त्याच्याआधी की काय कारवाई सुरु आहे.  हे सुद्धा पाहणे अत्यंत गरजेचे आहे आणि मला वाटतें आता या विकास आराखड्यामध्ये जर हे रस्ते घ्यायचे असतील किंवा सदर प्रस्ताव मंजुर करायचा असेल तर त्याच्या आधी स्थानिक नगरसेवक, सदर जागेचे मालक आणि संबंधित अधिकारी ह्यांना प्रथम विश्वासात घेऊन मग त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.  कारण माझ्या प्रभागामध्ये अशा प्रकारचा रस्ता एकही नाही आणि मला वाटते ह्यांनी प्रस्तावात तीन रस्ते नमुद केलेले आहेत आणि त्याच्यामधला लक्ष्मीबाग ते दाचकुलपाड्याचा रस्ता हा खाजगी जमीन मालकाचा आहे आणि खाजगी जमीन मालक श्री. हरेश किणी ह्यांच्याबरोबर संबंधित पालिकेमध्ये नगरपलिका अस्तित्वात असताना आणि महापालिका झाल्यानंतर मा. आयुक्त साहेबांबरोबर दोनदा चर्चा केलेली आहे.  तसेच माशाचा पाडा येथील रस्ता ह्या मंदिराकडे जाणारा यातील अर्धा रस्ता १९९७ साली पालिकेने केलेला आहे.  अगोदरच केलेला आहे आणि त्याच्यानंतर त्या रस्त्यावरुन टँकर जात असताना तो खोदला गेला आणि तो रस्ता तुटलेला आहे आणि तोच रस्ता पुन्हा दलित वस्तीच्या माध्यमातुन या योजनेअंर्तगत तो रस्ता आपण करणार आहोत आणि त्या रस्त्यामध्ये श्री. सुरेश पाटील नावाच्या खाजगी जमीन मालकाची ती जागा आहे.  तरी त्या मालकाशी पालिकेत चर्चासुद्धा झालेली आहे आणि त्यांनी जर आपल्याला रस्ता बनविण्याकरीता जागा दिली तर तिथे विकास आराखड्यामध्ये ते नमुद करण्याची मला वाटत नाही की, गरज आहे.  तसेच बाभळीचा भाट नं. १ आणि २ कडे जाणारा जो

रस्ता आहे तो आपल्याच सन्मा. नगरसेविका सौ. जयाबाई भोईर यांची खाजगी जमीन मालक आहेत आणि त्यांसबंधी चर्चा मा. आयुक्तांनी आणि मा. महापौरांनी केलेली आहे. तरी ते जर स्वतःहुन जागा द्यायला तयार असतील तर तो रस्ताही आपल्याला करता येईल. तसेच आमच्या भागामधील मांडवी पाड्याचा रस्ता, भटाच्या पाड्याचा रस्ता, दाचकुल पाड्याचा रस्ता, धोंडुले पाड्याचा रस्ता हे दलित वस्तीच्या दुर्बल घटकाच्या अंतर्गत किंवा जनरल फंडातुन किंवा कुठल्याही माध्यमातुन आपण हे काम झाले पाहिजे अशी आमची कळकळीची मागणी आहे आणि या कळकळीच्या मागणीला जर सर्व पक्षाचे नगरसेवक मदत करीत असतील आणि करत आहेत असे मला वाटते आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी हा प्रस्ताव येथे आणला आणि त्या संबंधात मला बोलायला संधी मिळाली असे नसुन त्याच्याआधी सुद्धा मी संबधित रस्त्याबाबत महापालिकेत चर्चा केलेली आहे आणि ते रस्ते झाले पाहिजे अशी आमची मागणीसुद्धा आहे आणि असेच जर प्रस्ताव आणुन काय सुचवायचे आहे आणि काय नाही सुचवायचे आहे. तरी ते भाषणामधुन बोलतीलच. परंतु अशा प्रकारचा जर पालिकेला एक वेगळ्या प्रकारचा पायंडा पाडणे हे चुकीचे आहे असे जर असेल तर उद्या मी सुद्धा त्यांच्या वार्डामध्ये पत्रव्यवहार करुन त्याच्या वार्डामध्ये इतर कामे करु शकते आणि माझ्या वार्डामध्ये कामे आम्ही करतो आणि तिथे नारळ फोडुन उद्घाटन दुसरेच करतात ही जी प्रथा महापालिकेत चाललेली आहे. ती कुठेतरी थांबवावी आणि जर उद्घाटन जर तुम्हाला करायचे असेल तर स्थानिक नगरसेवकांना बरोबर घेऊन तुम्ही करावे. तुम्ही काम करता असे तुम्हाला वाटते तर मग स्थानिक नगरसेवकांना डावलुन, लपुन छपुन जाऊन का उद्घाटन करता? तुम्ही स्थानिक नगरसेवकांना बरोबर घेऊन करा अशा प्रकारची ही जी पद्धत चाललेली आहे ती मा. महापौर मॅडम, मला चुकीची वाटते आणि अशा प्रकारचे जर कुणी नगरसेवकाला श्रेय घ्यायचे असेल तर ते त्यांनी घेऊ नये आणि स्थानिक नगरसेवक तिथे कार्यरत असेल तर कमीत कमी अशा गोष्टी घटना कामा नये असे आजच्या ह्या निवेदनात म्हणते.

**संगीता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, जे सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे यांनी जी सुचना मांडली त्याच्याशी मी सहमत आहे.

**महेंद्रसिंह चौहान :-**

अध्यक्ष महोदय सभागृह नेत्यांशी निवेदन है की, अधिनियम १९४९ च्या कलम (१) ज के अनुसार कोई अधिनियम का गैरफायदा न उठाये। अपने अपने वार्ड के उपर सिमित रहे। अगर काम करने का ज्यादाही शौक है की, बहुतसे ऐसे सब्जेक्ट है, बहुतसी ऐसी चिजे है जिनके उपर हम सब लोग सामुहिक रितीसे काम कर सकते है। लेकिन यह नियम का फायदा उठाके हर जगह अपनी वाहवा अगर ज्यादा लेटर या मिनिट मे नाम आनेकी यह बरबादी कही ना कही तो रोकनी पडेगी।

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, हे जे बाभळीची भाट ही जी जागा आहे त्या विषयाबाबत तेथील सन्मा. नगरसेवकांना विश्वासात न घेता असा प्रस्ताव सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी आणला. तरी त्यांना त्या ठिकाणी तिथे जाण्याची काय गरज आहे का? तो आमचा रस्ता आहे व आमची जागा आहे. आम्ही त्याचे काय करायचे ते करु. परंतु तुम्हाला त्याची काय गरज? तुम्ही तिथे जाऊन कशाला ढवळाढवळ करता?

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी जो विषय आणलेला आहे. मी त्याचे समर्थन करतो आहे आणि समर्थन यासाठी करतो आहे की, जे महापालिकेचे अधिकारी म्हणजे जसे आता लक्षात आल्यासारखे काम करुन म्हणजे जे निवेदन झाले तर हा विषय त्यातला नाही. काशिमिरा विभागातील आदीवासी पाड्यावर सुखसोई द्याव्यात म्हणुन अनेक वर्षाच्या मागण्या आहेत. ते लोक अनेक वर्षापासुन उपेक्षित आहेत. तरी त्यासाठी विविध पक्षातील लोक, विविध पक्षातील नगरसेवक आपआपल्या क्षमतेनुसार प्रयत्न करतात. त्यात कुणी कुणाला डावलण्याचा प्रश्न येत नाही. पण जेव्हा विषय नवीन आणल्यासारखा दाखवत असतील तर तसे नाही. माझ्याकडे त्याचा रेकार्ड आहे की, जेव्हा पहिल्यांदा प्रांत अधिकारी श्री. दौड साहेब यांनी नगरपरिषदेला सुचना केलेल्या आहेत की, या आदीवासी पाड्यावर जाण्यासाठी हे आरक्षित रस्ते यांचे डिमार्केशन होणे जरुरीचे आहे आणि नगरविकास खात्याकडुन आणि त्याला परवानगी मिळविणे गरजेचे आहे. याबाबतचा पत्रव्यवहार नगरपरिषदेबरोबर झालेला आहे. त्यानंतर आलेले प्रांत अधिकारी श्री. भरत शितोळे साहेब, यांची ही त्या ठिकाणी व्हिजीट झाल्यानंतर या पाचही ठिकाणी अशा पद्धतीचे रस्त्याचे डिमार्केशन करणे जरुरीचे आहे. परंतु असे न होता त्या ठिकाणी जसे आपण आदिवासींना न्याय द्यायचा किंवा ते दुर्लक्षित ठेवायचे त्याच्यावरती लक्षच द्यायचे नाही अशी जी अधिकाऱ्यांची भुमिका आहे

त्याच्याबद्दल आम्हाला खेद होतो आहे. परंतु काम कुणी केले, कसे केले, कधी केले आणि कुणी म्हणु शकतो की, इकडे करावे की नाही करावे? परंतु ही वस्तुस्थिती आहे की, तो एका दिवसाचा विषय नाही सन १९८७ पासुनचा चाललेला तो विषय आहे आणि जे मालक आहेत आणि कधी जर कोणी सांगितले की, आम्ही बोलणी केले आणि ते बोलणी केलेले चुक काहीच नसते. मा. महापौर सर्वश्री आहेत म्हणुन सर्वांना त्यांना भेटणे गरजेचे आहे किंवा त्याच्यासमोर मांडणे हे गरजेचे आहे. त्यातही चुक नाही. परंतु यश कुठे आहे? यश जर येत नसेल तर ह्याही निर्णयाला आजच्या घटकेला ही महापालिका सांगू शकत नाही की, दाचकुल पाड्याच्या आदीवासींसाठी हे डिमार्केशन प्लॅन तयार झालेले आहे. भटाच्या पाड्याच्या आदीवासींसाठी डिमार्केशन प्लॅन तयार झालेला आहे किंवा बाभळीच्या भाटसाठी हा डिमार्केशन प्लॅन तयार आहे हे आजच्या घटकेला ते तयार केलेले नाही त्याचाही खेद आहे. त्याच्यावर कुणावर टिकाटिपणी करण्याचा खेद नाही. हा खेद असा आहे की, वास्तविक विषय जे आहेत ते विषय तसेच टोपलीत राहतात ते पडीत राहतात व पडून आहेत. त्याला वाचा फुटावी म्हणून मी सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रेंना धन्यवाद देतो आहे. एक प्रश्न असा येतो की, जेव्हा मालकी असेल तर ह्या मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये आता जसे सन्मा. सदस्य सौ. जयाबाई भोईर यांनी सांगितले तर तसे आम्ही काही खोडु शकत नाही त्यांचे आपल्याला मानावे लागेल कारण जमीन त्याच्या मालकीची आहे.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील जसे आमच्या मालकीची जमीन आहे असे सांगतात तरी आमच्या जागेवर झोपडपट्टी झालेली आहे ती जाउन तोडा.

**रोहिदास शं. पाटील :-**

सन्मा. सदस्या सौ. जयाबाई भोईर झोपड्या तोडण्याचा अधिकार आपल्याला नाही. झोपड्या तोडणारे ते बघा वरती बसलेले आहे. त्यांना सांगावे किंवा लिहा की, ह्या झोपड्या तोडा.

**जयाबाई भोईर :-**

मग त्यासाठीच आम्ही रस्त्याला जागा देऊन अजुन झोपडपट्टी वसु द्यायची का?

**रोहिदास पाटील :-**

ह्या मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये सर्वच ठिकाणी जागा ह्या खाजगी आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, माशाचा पाडा रस्ता हा सुद्धा डि.पी.मध्ये नव्हता व मांडवी पाड्याचा रस्ता हा सुद्धा डि.पी.मध्ये नव्हता. पण तिथल्या स्थानिक जमीन मालकांना आपण विश्वासात घेऊन त्यांच्या मनातील अडचणी आपण ऐकुन महापालिकेच्या माध्यमातुनच आपण रस्ते तयार केलेले आहेत आणि आजही तिथे रस्ते आहेत. जसे सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी सांगितले की, रस्ते नाहीत असे नाही त्यांना माहित नसेल की, त्यांच्याच माहितीसाठी सांगते की, तिथे रस्ता झालेला आहे आणि भटाच्या पाड्याला सुद्धा रस्ता झालेला आहे. तसेच माशाचा पाडा येथे सुद्धा रस्ता तयार केलेला आहे. परंतु आता फक्त दलित वस्तीचा फंड यायचा बाकी आहे. तो जर फंड आला तर तो रस्ता आपण तयार करणार आहोत आणि सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी जो येथे प्रस्ताव दिलेला आहे. तो प्रस्ताव ह्या मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचा आहे. तर तो जो रस्ता आपल्याला करायचा आहे. तर त्या ठिकाणची जी आदीवासी लोक आहेत. तर त्यांना यापुर्वीच वनविभागाने नोटीसा दिलेल्या आहेत की, त्यांच्या झोपड्या त्यांनी खाली कराव्यात. जर वनविभागाने त्यांच्या झोपड्या खाली करणेबाबत नोटीसा दिलेल्या आहेत तर त्या ठिकाणी आपण रस्ता तयार कशाला करायचा? आणि तो डी.पी.मध्ये घ्यायचा कशाला? महापालिकेला जर विकास आराखड्यामध्ये घेऊन जर रस्ते तयार करायची गरज वाटत आहे. आपल्यालासुद्धा घ्यायचे आहेत आणि रस्ते करायचे आहेत. तर डि.पी. मार्कींग विकास आराखड्यामध्ये माझ्या प्रभागामधील रस्ते आहेत ना ते करा. निलकमल हॉटेलपासून अंगणवाडीपर्यंतचा रस्ता ६० फुटी डि.पी. मार्कींग केलेला आहे तो दोन वर्षापासुन पालिकेने केलेला नाही. तरी तो का केला नाही याचे उत्तर द्यावे. अंगणवाडी ते ग्रिनव्हिलेज पर्यंतचा जो रस्ता आहे. डि.पी. मार्कींग केलेला आहे. ६० फुटीचा रस्ता आहे तो करावा. प्रस्ताव मी दिलेला आहे व माझी मागणी आहे तरी तो रस्ता करावा. तसेच वेस्टर्न पार्क ते जरीमरी पर्यंतचा रस्ता ६० फुटी आहे तो सुद्धा करावा. तरी तो काय नाही करत ते सुद्धा विकास आराखड्यामध्ये घेतलेले आहे. एकही रस्ता अजुन केलेला नाही. मग आता हे नविन जे जमीन मालक जागा द्यायला तयार आहेत. तरी आम्ही त्यांच्याशी चर्चा करुन व आम्ही त्यांच्याकडुन रस्ता संपादन करुन घेऊन रस्ते करत आहोत आणि केलेले आहेत आणि आम्ही सक्षम आहोत असे मला वाटते.

**रोहीदास शं. पाटील :-**

विषयाची गफलत होऊ नये. जो सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेचा विषय आहे. कुठेही कोणताही रस्ता केला तरी तो विकास आराखड्यानुसार नकाशावर येणे आवश्यक असते. त्या ठिकाणी आरक्षणाचा विषय येतो आहे. त्या ठिकाणी तो खाजगी मालकाचा असला तरी तो आरक्षणात रस्त्याच्या डिमार्केशनमध्ये मालकाशी बोलणे करुन घ्यावा लागतो आणि त्या ठिकाणचे रस्ते अजुन विकास आराखड्यात दाखविलेले नाहीत. म्हणुन त्यांची मागणी आहे म्हणुन त्यांची मागणी चुकीची आहे किंवा कोणता हस्तक्षेप आहे असा विषयच येत नाही. जे डिमार्केशनमध्ये दाखविलेले रस्ते आहेत ते करायला महापालिका मोकळीच आहे. त्यांना कुणीही अडविलेले नाही.

**मिलन पाटील :-**

मा महापौर मॅडम ही आमच्या पार्टीची बदनामी चाललेली आहे आणि ही बदनामी आम्ही खपवुन घेणार नाही. आमचे जर नगरसेवक त्या ठिकाणी सक्षम असतील. तसेच आमच्या नगरसेवकांनी सुचना ह्या केलेल्या आहेत. आमच्या नगरसेवकांची पहिली जी सुचना आहे ती अगोदर कार्यान्वीत करायला पाहिजे. हे आमच्या पक्षाच्या मतदारांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. तसेच हा जो ठराव घेतलेला आहे. हा दिशाभुल करण्याचा प्रयत्न आहे. तेथील तीन नगरसेवक हे सक्षम आहेत. आमच्या पार्टीचे तीन नगरसेवक आहेत.

**(सभागृहात गोंधळ)**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, येथे ८४ नगरसेवक बसलेले आहेत. ८४ नगरसेवकांपैकी जो विकास आराखड्यामध्ये रस्ते नसतील तर ते रस्ते ह्या कुणी नगरसेवकांनी जर मागणी केली तर ते तुम्हाला घ्यावे लागतील असे होईल ते नमुद करावे लागेल आणि मग सगळेच प्रस्ताव तुम्ही आणा अणि मगच तुम्ही ह्याला मंजूरी द्या. संपुर्ण मिरा भाईंदर क्षेत्रातील असे रस्ते जे विकास आराखड्यामध्ये नमुद केलेले नाहीत असे प्रस्ताव येथे मा. महासभेपुढे आणा आणि मग तुम्ही मंजुर करा. त्याला सुचक म्हणुन मी असेल आणि अनुमोदन म्हणुन सन्मा. सदस्या सौ. जयाबाई भोईर ह्या देतील.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या सौ. जयाबाई भोईर ह्या जमीनीच्या मालक आहेत. त्यांच्याशी बोलणी करुन मगच रस्ता तयार करावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आदीवासीचे नेतृत्व करण्यास आमच्या नगरसेविका ह्या सक्षम आहेत. तरी ते नेतृत्व करतील. दुसऱ्या कोणाचीही काही गरज नाही.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते की, सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे यांनी खरोखरच चांगला प्रश्न मांडलेला होता की, प्रत्येक विभागामध्ये नगरसेवक सक्षम असताना कोणत्याही नगरसेवकांनी त्यात ढवळाढवळ करु नये. म्हणुन मीसुद्धा असेच म्हणते की, माझ्या प्रभागामध्ये सुद्धा असे चाललेले आहे. स्थानिक नगरसेवक हे कशासाठी असतात?

**(सभागृहात गोंधळ)**

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी जो 'ज' खाली प्रस्ताव आणलेला आहे.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, ज्या ठिकाणी कोणत्याही प्रभागामध्ये जे वहिवाटीचे रस्ते आहेत त्याच्यावर आपण डांबर टाकत गेलो. लोकांनी तक्रार केली नाही ते रस्ते उपयोगात आपण आणले. परंतु ज्या ठिकाणी लोकांनी तक्रारी केल्या त्या ठिकाणी रस्ते आपण बनवु शकलो नाहीत. मिरा भाईंदरमध्ये अशा अनेक ठिकाणी अशा खाजगी जागा आहेत ज्या ठिकाणी त्याच्याशी बोलणी केल्याशिवाय रस्ते आपण करु शकत नाही. सरळ सरळ दिला तिथे तो बनला. नाही केला त्याबाबत कोणीतरी बोलायला पाहिजे ना आणि तुम्ही १० वर्षे सत्तेत असून तुम्ही बोलतच नाही म्हणुन असे जर कुणी बोलले तर वाईट कशाला वाटते ते मला समजतच नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्या ठिकाणी जो प्रस्ताव सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी आणला त्याच्याविषयी सर्व सन्मा. नगरसेवक/नगरसेविकांनी आपले म्हणणे या ठिकाणी मांडलेले आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सुकावतो हा विषय प्रथम माणसांनी घेतला पाहिजे. प्रत्येकाला आपल्या

विभागात काम होते आणि काम केलेच पाहिजे याची काळजी असते. त्या पद्धतीने संपुर्णपणे जो विषय सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडला तर त्यांनी गेल्या चार ते पाच वर्षामध्ये ज्या पद्धतीने पत्रव्यवहार केला आणि माझ्या माहितीप्रमाणे मा. महापौर मॅडम आपण स्वतः त्या प्रभागात जाऊन मी आपल्या बरोबर होतो. अधिकारी आपले बरोबर होते. आपण सर्व रस्त्यांची पहाणी केली आणि त्या ठिकाणी काही नगरसेवकांची जागा होती. त्यावेळी तो विषय चर्चेला आयुक्तांसमोर आपण आणला आणि तो विषय आणल्यानंतर त्याच्यावर कारवाई सुरु आहे. परंतु काही वेळा आपण बघतो की, हे काम होत असताना कोणताही कायदेशीर अडचण आली नाही पाहिजे. तिकडच्या माणसांना कुठलेही नुकसान पोहोचले नाही पाहिजे. परंतु काही लोकांना असे वाटते की, संपुर्ण मिरा भाईंदर हे आमचेच आहे. मिरा भाईंदर अडचणी ह्या आमच्याच आहेत. या ठिकाणी जे नगरसेवक निवडून आलेले असतात त्याचाही अधिकार त्या ठिकाणी पोहोचतो. त्या ठिकाणच्या नगरसेवक/नगरसेविकांना आपण ॲप्रोच झाले पाहिजे हे आपल्याने होत नाही. परंतु ह्या प्रकरणामुळे झालेले वातावरण कारण ज्या नगरसेविका, शिवसेनेच्या नगरसेविका, आघाडीच्या नगरसेविका या कधीही आपल्या या सभागृहात संभाषणामध्ये भाग घेत नाही. परंतु त्यांनाही कळते की, कोणत्याही प्रभागात जाऊन कोणीही ढवळाढवळ करतात ते केले नाही पाहिजे. प्रस्ताव जरुर तो असेल सदर प्रस्तावाच्या संदर्भात नगरसेविकांनी त्या ठिकाणी कोणते प्रयत्न केले नसतील या चार ते पाच वर्षात कोणतेही काम केलेले नसेल. ज्या पद्धतीने कामाचा आणि कार्याचा आढावा सौ. ज्योत्स्ना हसनाळे घेतला की, या ठिकाणी आम्ही डांबराचे रस्ते केले, या रस्त्यासाठी प्रयत्न आम्ही केला, या लोकांना त्यांच्या जागेसाठी भेटलो किंवा जमीन मालकांना भेटलो आणि काही ठिकाणी वनविभागाची जागा आहे आणि वनखात्याच्या जागेमध्ये तुम्ही डि.पी. मार्किंग आपण करु शकत नाही. जर अशा वेळेला असेच 'ज' चे प्रस्ताव आणुन जर आपण काम पूर्ण करायला लागलो आणि तसे जर प्रस्ताव आणले तर मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये प्रभाग निहाय हे काम होणारच नाही. उद्या मलाही वाटले की, सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे यांच्या प्रभागात काम करायचे आहे आणि तसा जर प्रस्ताव मी आणला तर त्यांना काय वाटेल की, सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे हे त्या ठिकाणी कार्यक्षम नाहीत असे होईल. म्हणुन सर्व सन्मा. नगरसेवकांना माझी नम्र विनंती आहे की, आपण असे प्रस्ताव संबधित नगरसेवक / नगरसेविकांना सांगितले पाहिजे की, या ठिकाणी आपण जे काम करीत आहात ते होत नाही . तरी मी आपणांस याबाबत मदत करु का? अशी विचारणा केली पाहिजे. पंरतु या ठिकाणी सक्षम नगरसेविका आहेत, नगरसेवक आहेत. त्यांनी जे प्रयत्न चालवलेले आहेत त्यांचे पुरावे त्याच्याकडे आहेत. त्यांचे पुरावे प्रशासनाकडे असुन ते काम ए.टी.पी. करील आणि असे असतांना जे 'ज' प्रस्ताव आणले तर या नगरपालिकेत जे वातावरण निर्माण झालेले आहे ते बिघडेल. म्हणुन सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रेंना नम्र विनंती आहे की, आपण असे प्रस्ताव कृपया आणु नका. कारण असे प्रस्ताव आणुन एकमेकाच्या नजरेसमोर अपिलेख होईल म्हणुन कृपया जी कारवाई सुरु झालेली आहे त्याप्रमाणे कारवाई सुरु करावी आणि या प्रस्तावाला मागे ठेवुन ती कारवाई पुर्ण करावी असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील आपण या मिरा भाईंदर महापालिका या शहराचे नगरसेवक आहेत आणि याबद्दल आपण या शहराच्या विकासाबद्दल वारंवार चर्चा करत असतो. त्या विकासासाठी भांडत असतो. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब आपण खरोखर फार मोठ्या भावनेने शहराच्या विकासाकडे लक्ष देता परंतु हे नगरसेवक सुद्धा आपल्यासारखेच निवडुन आलेले आहेत आणि ज्या प्रकारचे वातावरण या सभागृहामध्ये झाले तर आपण आपले जरा थोडेसे भावनांना आवर घातला तर अधिक चांगले राहील. कारण तुमची इच्छा आहे. आम्ही काही सांगू शकत नाही. फक्त विनंती करतो की, भावनांना आवर घाला. आपल्या भावना ह्या शहराच्या विकासाच्या आहेत. हे आपण सांगता. याच्यापुढे आपण हे ही सांगणार आहात की, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी सांगितले की, वहिवाटीचे रस्ते आहेत तर ते असे विकसित करता येत नाही. तर ते आपल्याला डि.पी. प्लॅनमध्ये घ्यावे लागतील. या संदर्भात सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे. आता ह्या सर्व गोष्टीची तुम्हाला माहिती नसेल किंवा मी काहीतरी नविन करत आहे आणि मला हे केलेच पाहिजे अशी जी तुमची भावना असेल तर तो भाग वेगळा. परंतु सदर बाबत योग्य ती कारवाई सुरु आहे. आपल्या प्रस्तावाबद्दल सभागृहात जे वातावरण निर्माण झाले त्याच्यावरुन आपल्या प्रस्तावाची आपल्याला माहिती मिळाली असेल तरी आपल्याला तो मतदानास ठेवायचा असेल तर ठेवा नसेल ठेवायचा तर हा प्रस्ताव प्रामाणिकपणे मागे घ्या. अशी मी विनंती करतो.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, ह्या बी.जे.पी.वाल्यांनी त्या जागेवर बोर्डसुद्धा लावलेला आहे. तो बोर्ड त्यांनी अजुन काढलेला नाही. मी स्वतः पोलीस कम्प्लेंट करुनसुद्धा त्यांनी तो बोर्ड काढलेला नाही. सदर बोर्ड हा आमच्या जागेत लावलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम, प्रस्ताव पर्टिक्युलरी एकासाठी नसावा. प्रस्ताव हा पर्टिक्युलरी एका प्रभागासाठी नसावा. मिरा भाईंदर शहरालासाठी असावा असे माझे मत आहे. तरी यांनी पर्टिक्युलरी प्रस्ताव हा एक वार्डासाठी दिलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम सचिवांना विचारु इच्छितो की, सभागृह संपण्याची वेळ काय आहे.

**प्र. सचिव :-**

संध्याकाळी ७.०० पर्यंत आहे.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम माझी तिथे जागा आहे. म्हणुन मी बोलत आहे मी मुद्दामहुन बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आपली परवानगी आहे का? जरा कृपा करुन माझ्या अगोदर भरपुर लोकांचे बोलुन झालेले आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

इनका बोलने की परवानगी नही, लेकिन यह बताईए यह सब्जेक्ट इस तरह फिरसे हाऊस मे न लाये, और दुसरे वार्ड मे न जाये, नही तो कलसे तकलीफ होगी।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम हे जे बोलतात ते चुकीचे बोलतात.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम माझा प्रस्ताव मला अगदी संक्षिप्त आणि फार थोड्या वेळामध्ये मला याच्यामध्ये चर्चा करायची आहे. सभागृहामध्ये किंवा महापालिकेमध्ये किंवा या राजकारणामध्ये असे चुकीचे मॅसेज मुद्दामहुन पसरवला जातो कि एक नगरसेवक निवडुन आला की त्याने फक्त त्याच्या वार्डापुरत बघायच. लक्षात घ्या. जेवढ्या आपल्या पक्षाची लोक इकडे बोंबाबोंब करतात. तुम्हाला स्वतः मी आज विनंती करतो म्हणा, तुमचा मान ठेवला आतापर्यंत मी आजपर्यंत कधीही तुमच्या केबिनपर्यंत या गोष्टीबद्दल तक्रार करायला आलेलो नाही. ज्या माझ्या वार्डामध्ये ज्या वस्तीकरीता मी पत्र लिहिले की मला ह्या वस्तीमध्ये अमुक अमुक ह्या सुविधा द्याव्यात. त्यांच्या उत्तरादाखल प्रशासनाने मला लेखी उत्तर दिले की दि. १/१/१९९५ नंतरची वसाहत असताना इकडे ही असल्यामुळे आपण सुचविलेल्या कामाचे काम करता येत नाही असा आपल्या प्रशासनाने मला लेखी सुचविलेले आहे. परंतु आपल्या राष्ट्रवादीच्या एका कार्यकर्त्याने तिकडे पाईपलाईन महानगरपालिकेच्या खर्चातुन टाकुन घेतलेली आहे. हे सगळ्याचे उत्तर मी आज देत आहे. तेव्हा मी असा आपल्याकडे कधीही कावकाव करीत आलो नाही का हो माझ्या वार्डामध्ये तुमची लोक कशाला ढवळाढवळ करतात. आलो का मी?

**मोहन पाटील :-**

अहो जे कार्यकर्ते आहेत ते नगरसेवकांच्या दृष्टीस आणले पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

लक्षात घ्या. माझ्या वार्डामध्ये आपल्या पक्षाचे राजकीय कार्यकर्ते कार्यरत आहेत. आमच्या इकडे महापालिकेच्या कार्यामध्ये ढवळाढवळ करतात. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना आम्ही तुम्हाला शेठपुढे उभे करु. मॅडमपुढे उभे करु अशा धमक्या देतात परंतु आम्ही काहीच बोलत नाही. लोकांच्या तक्रारी येतात. मॅडम पण मी कधीच बोलत नाही. परंतु माझी अशी इच्छा आहे ना की तुम्ही अशी ढवळाढवळ करत जा. तुम्हाला हे मी उदाहरण दिले आणि याच्यावर मी कुठे कुणावर अन्याय करतो आहे. माझा बंगला तिकडे नाही किंबहुना माझ्या बंगल्यापर्यंत तुम्ही रोड घेऊन या आणि नगरपालिकेचा पैसा खर्च करा. माझा प्रस्ताव टेक्निकल दृष्टीकोनातुन अगदी परफेक्ट आहे. दुसरी गोष्ट सांगतो स्थायी समितीला सभा असताना सभेमध्ये विषय आले मॅडम माझ्या वार्डमधली आरक्षणे, माझ्या वार्डमधील रस्ते या सगळ्याला तुमच्या लोकांनी सुचक आणि अनुमोदन देऊन ठराव ठेवले तेव्हा त्या गोष्टीला आम्ही कधीही विरोध केला नाही. हे लक्षात ठेवा. आठवण करुन देऊ का? १९ रस्ते होते तेव्हा माझ्या वार्डमध्ये अशाच प्रकारचे ठराव आणले होते आणि सुचक आणि अनुमोदन म्हणुन राहिलात मी कधीही विरोध केला नाही की माझ्या वार्डामध्ये का ढवळाढवळ करतात. म्हणुन....

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

असे कधी झाले नाही कामे ही सगळ्यांची होतात व कामे ही सगळ्यांची चालु आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जोरात बोलतात. सगळेजण बोलतात. तुम्ही त्यांना बोलायला देत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहीदास पाटील मी आपणांस बोलू देत नाही का? प्रत्येक विषयावरती चार-चार, पाच-पाच कामेही तुमचीच आहेत.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर आपण मला बोलू देतात परंतु सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे हे बोलण्यास उभे राहिले. बोलले तर काय बोलले आणि ते जे बोलले ते सकाळचे वातावरण त्यांनी बघितले का? तुमची संख्या जास्त आहे. आम्ही मान्य करतो. सकाळी लोक उपोषणाला बसलेले होते. ते कशासाठी बसले होते. येथे सभा चाललेली होती तर तिथें गेटवरती काय चालले होते. आम्ही राजकारण करु इच्छित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

अहो मा. आयुक्तांच्या केबिनला सगळ्या मिटींग झाल्या.

**महेंद्रसिंग चौहान :-**

उपोषणमध्ये बैठनेका मतलब है की नगरपालिकेने तोडा इसलिए था।

**रोहीदास पाटील :-**

उनका नही निवेदन पढा क्या अधिकारीयोंके बारे मे, नगरसेवकोके बारे मे लिखा था।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम एक लक्षात घ्या. आता आमचे जेष्ठ सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी चार-चार वेळा सांगितले की आमचे नगरसेवक सक्षम आहेत. अहो हायवेला जेव्हा पाच माणसे मेली त्यावेळेला सुद्धा हे नगरसेवक सक्षम होते की नाही. तेव्हा त्यांनी हे प्रस्ताव मांडुन त्याच्यावर कारवाई करायला पाहिजे होती. एकही शब्दाचा उल्लेख केला गेलेला नाही. पाच जीव नाहक मारले गेले. त्यानंतर चौकशी लागली किंवा नाही त्याचेही कुणी पत्र दिले नाही.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब आपण हा आरोप करीत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

आरोप नाही मी सत्य तेच सांगत आहे.

**केशव घरत :-**

बरोबर. हा अपघात झालेला आहे. कोणी मुद्दामहुन माणसे मारलेली नाहीत. हा अपघात झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अपघाताची चौकशी होते.

**केशव घरत :-**

तुम्ही कशाला गेला होता तिकडे आम्ही बघितले असते.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडच्या नगरसेवकांनी ते तयार करायला पाहिजे होते. आपण केले नाही म्हणुन आम्ही ते केले.

**केशव घरत :-**

आपल्याला काय सर्व भाईंदरचा ठेका दिलेला आहे का? तिकडे आम्ही आहोत ना. आम्ही सक्षम आहोत. मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. आम्ही मान्य करतो. मी कुठे नाही बोलतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा या ठिकाणी सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी हा जो विषय काढलेला आहे. एक मिनिटातच  बोलतो जास्त वेळ घेत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम हे काय चाललेले आहे. माझे निवेदन चाललेले आहे. मला संपवायचे आहे. मघाशी बरीच चर्चा झालेली आहे. आपण जरा शांत बसा. मघाशी बरीच चर्चा होत असताना मी गप्प बसलेलो होतो. मला जरा थोडक्यात सांगायचे आहे. महापालिकेत कुठेही आम्ही सांगितले का की, हा नगरसेवक अकार्यक्षम आहे. मला जे नगरसेवक या नात्याने दिसले मी उदाहरण दिले. माझ्या वार्डमधील रस्ते तुम्ही प्रस्तावित केलेत ना. मी कधी बोललो का? नाही. प्रस्ताव तुमचे होते, आमचे नव्हते. आणले तुम्ही. ठराव झाला. अनुमोदन झाले. सगळे काही झाले. आता अनेक बाकी जी दुसरी काही कामे आहेत. माझ्या वार्डमध्ये आरोग्याचे दवाखाने खोलले. ठरावावर सुचक अनुमोदक हे लोक राहिले त्याबद्दल मी कधी नाही बोललो नाही. मी कशालाही ऑब्जेक्शन घेतलेले नाही. हा जो माझा ठराव आहे. हा माझा पुर्णपणे अधिकार आहे. महापालिका हद्दीमध्ये महापालिकेच्या फंडातुन जे काही चांगले वाईट करायचे ते येथे बसलेल्या सर्व नगरसेवकांचा तो अधिकार आहे. माझ्या एकट्याचा आणि तो सगळ्याचा आहे. लक्षात घ्या. ज्या ठिकाणी मी अकार्यक्षम ठरेल तिकडे माझ्या वार्डमध्ये सुद्धा खरे काम असेल तर त्यावर कुठल्याही नगरसेवकाने पत्रव्यवहार करावा माझी काही हरकत नाही. स्पष्ट सांगतो पण ज्या वार्डमध्ये साफसफाई करताना मजुर आढळणार नाहीत. ज्या वार्डमध्ये जे कर्मचारी आपण नेमतो त्याच्यामध्ये आपण करोडो रुपये खर्च करतो त्याच्या सकाळच्या कामावरती जर ते गैरहजर असतील तर त्याच्यावरती कारवाई करण्याची मागणी आमच्या सर्व सदस्यांचा तो हक्क आहे. हे लक्षात ठेवा. ज्या त्या नगरसेवकांना असे वाटते असेल तर मिलन म्हात्रेसारख्या प्रत्येकांना रजिस्टरवर सह्या करायला लावा. उद्यापासुन तर तुम्हाला काही प्रॉब्लेम येणार नाही. लक्षात घ्या. उगीच असे बोलु नका. याला काहीतरी रंग देऊ नका. विषय छोटा आहे. मॅडम मी तर म्हणतो अशा प्रकारचे प्रस्ताव सगळ्यांनी आणावेत. कशासाठी वाटते भिती हो तुम्हाला (ज) चा प्रस्ताव. आज आम्ही सभागृह नेत्यांना सांगितले की, ३८ प्रकरणे आपल्याकडे अनिर्णीत अवस्थेत आहेत. प्रलंबित ठेवले आहेत. तुम्ही तहकुब केलेली आहेत. त्याला पुढच्या मिटींगचा त्याच्यावर निर्णय झाला पाहिजे. आता तुमची टर्म संपायला आलेली आहे. आमची कशी मनोमन इच्छा आहे की ही सर्व प्रकरणे तुम्ही ह्या खुर्चीवर असताना तुमच्याकडुन चांगले वाईट जे निर्णय व्हायचे आहेत ते चांगले आपण घ्या. अशी आमची मनोमन इच्छा आहे. ही सर्व ३८ प्रकरणे अजुन पेडींग ठेवलेली आहेत. उद्या आम्ही जर तो प्रस्ताव दिला तर उद्या लगेच हे बोलतील की आमच्या कडचे प्रस्ताव तुम्ही का आणले.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे आपला प्रश्न 'ज' च्या प्रस्तावाच्या संदर्भात आहे. आपण प्रश्न ज संबंधी माशाचा पाडा, आदीवासी पाड्याच्या संबंधित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

होय मी विषयासंबंधातच बोलत आहे. महापौर मॅडम महापालिकेतर्फे रस्ता रुंदीकरणाचे काम आजच्या तारखेला चाललेले आहे. हा नकाशा माझ्यासमोर आहे. आपल्या डि.पी. रोडनुसार आपल्याला जे सांगितले त्यानुसार ते काम चाललेले नाही. भलत्याच ठिकाणी काम चाललेले आहे. जिकडे रस्त्याची जागा आपण ॲक्वीझीशन केलेली आणि ज्या ठिकाणी रेखांकन नाही. हा नकाशा माझ्याकडे आहे. तो मुळ नकाशा माझ्याकडे आहे. हे दोन नकाशे तुम्हाला जर वाटते असेल किंवा आपण जर परमिशन दिली तर हे मी आपल्या अधिकाऱ्यांना पहाणी करण्याकरीता पाठवितो. चुकीचे काम चालले आहे. चुकीची लोक त्याच्याखाली भरडली जात आहेत. तरी ह्या लोकांच्याकरीता जे काम आपण रस्त्याकरीता करत आहोत. ज्या लोकांची घरे तिकडे येत नाही. ती सुद्धा पाडली जातात. ते प्रत्यक्ष काम आज चालु आहे. त्याकरीता मला हा प्रस्ताव आणावा लागला. त्यांनी आपल्याकडे निवेदन दिलेली आहेत. मी कुठे म्हणालो की कुठलाही नगरसेवक यांच्यावरती काही कारवाई केली नसेल किंवा मेहनत घेतली नाही आणि मीच फार सक्षम आणि बाकीचे सर्व अकार्यक्षम आहेत. मी काहीच बोललो नाही. पण महापालिकेचे जे काम चालू आहे ते आम्हाला आपल्या दृष्टीपथात आणले पाहिजे आणि त्यानुसार मी माझा प्रस्ताव माझ्या अधिकारानुसार मी हा प्रस्ताव आणलेला आहे. या प्रस्तावावरती आपण ह्या महापालिकेचा फंड चुकीच्या पद्धतीने कुठेही खर्च होऊ नये. जे काम चालले आहे ते व्यवस्थितरित्या व्हावे. योग्य ठिकाणी व्हावे म्हणुन मी हा प्रस्ताव आणलेला आहे. तो आपण स्विकारावा लगेच त्याच्यावरती मंजुर करावा असे मी कुठेही म्हटलेले नाही किंवा एखाद्या विशिष्ट माणसाच्याच बंगल्याचे करा. मी तर हे ही म्हटले सन्मा. सदस्या सौ. जयाबाई भोईर बोलल्या त्या आमच्या रस्त्याला जागा देणार आहेत. अहो आमची करोडो रुपयाची जागा गेलेली आहे. परंतु त्याचा मोबदला आम्हाला अजुनपर्यंत मिळालेला नाही. परंतु या ठरावानुसार त्या मोबदल्याच्या जागा ताब्यात घेऊन लगेच त्वरीत द्यावेत. जे काही द्यायचे ते एफ.एस.आय. किंवा डी.डी.आर. द्या. आजच्या तारखेला आम्ही एक पत्र

दिले. तिन महिने झाले मॅडम अजुनपर्यंत एफ.एस.आय. उत्तर आम्हाला दिलेले नाही. ते अधिकारी शेंडेसाहेब बसलेले आहेत. त्यांना विचारा. किती मिलन म्हात्रे येऊन गेलेत आणि तुम्ही ते एफ.एस.आय.चे उत्तर दिले का? आमची जागा गेली आहे. आमची मेन रोडची जागा घेतली त्या बिल्डिंगची सर्व तोडफोड केली. तळमजल्याची बिल्डिंग धोकादायक म्हणुन बेकायदेशिर महापालिकेने पाडली. कळले का? त्यावेळी हे सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील हे आमचे अध्यक्ष होते. अजुनपर्यंत एफ.एस.आय. ची जागा आम्हाला मिळालेली नाही. ह्या व्यथा सर्व जागा मालकाच्या आहेत आणि ती स्वतः माझी सुद्धा आहे. माझीसुद्धा ५४८ मधली एकराने जागा आर झोन मधल्या रोडमध्ये गेलेली आहे. अजुनपर्यंत नगरपालिकेने दोन ओळीचे पत्र दिलेले नाही किंवा मोबदला दिलेला नाही. कृपया आपण माझा ठेवलेला ठराव हा चर्चेला घ्या. मंजुर असेल तर मंजुर करा नसेल तर फेटाळा. ठराव मताला टाका.

**जयाबाई भोईर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे तुमच्या जागेचे जे काय असेल ते तुम्ही बघावे. आमचे जे काय असेल ते आम्ही बघू.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब ठराव मताला टाकण्याचा प्रश्न येत नाही. आपल्याबद्दल किती चांगल्या तीव्र भावना होत्या सर्व नगरसेवकांच्या तरी त्या सर्वांनी व्यक्त केल्या. आता एवढे सर्व झाल्यानंतर आपण सुज्ञास अधिक सांगणे न लगे असे समजुन आपण थोडीशी माघार घेतली तर उत्तम राहील. आपण जो प्रस्ताव दाखविता आहात ती रोडची ॲलायनमेंट चेंज होणार होती आणि तिथुन झोपड्या तुटणार आहेत हे आपण जे म्हणता यासाठी श्रमिक संघाने उपोषणाचे पत्र दिले त्याचे नेतृत्व मी करत होतो. डेलीगेशन घेऊन मी मा. आयुक्तांकडे गेलो होतो आणि मा. आयुक्तांनी तातडीने त्या रस्त्याच्या मोजणीला स्टे दिलेला आहे. त्याच्यामुळे आपण जे दाखविता त्या प्रकरणात काहीही होणार नाही.

**संगीता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, डॉ. बावस्कर साहेब आणि उपायुक्त साहेब जेव्हा तुम्ही सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांना माणसे वाढीव दिली ती किती दिवसासाठी दिली आणि कशासाठी दिलेली आहेत? साफसफाईसाठी दिलेली असतील तर ती किती दिवसांसाठी दिली आहेत? तसेच जी माणसे दिलेली आहेत ती पी.डब्लु.डी.चा रस्ता साफ करण्यासाठी की, वार्डात साफसफाई करण्यासाठी दिली आहेत? याचे उत्तर द्यावे आणि वैकुंठ स्मशानभुमी तिथेसुद्धा पाट्या लावलेल्या आहेत.

**अनंत पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, अशा तऱ्हेनेच ते जे वक्तव्य केले तर आमच्या ह्या वार्ड नं. २ मध्ये सुद्धा अशा तऱ्हेने मिनी टेंडर पद्धत चालू केलेली आहे. टेंडर चालू करण्याचा उद्देश डॉ. महोदय बावस्कर साहेब आपण याबाबत स्पष्टीकरण करावे. ह्या टेंडरचा काय प्रकार आहे. मिनी टेंडरचा प्रकार काय आहे म्हणजे एखाद्या नगरसेवकांला दहा कामगार दिले तर त्याने कुठेही कुठल्याही ठिकाणी काम करायचे? त्याच्यावर मुकादम नाही त्यांच्यावर कुठलाही कंट्रोल नाही ही पद्धत काय? ही पद्धत कुठल्या कुठल्या वार्डात चालु केलेली आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, आम्हाला असे विचारले जाते की, एक नगरसेवक मुकादम दिलेला आहे का? याबाबत खुलासा व्हावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, मी तेथील स्थानिक आहे. लहानाची मोठी झाली. तसेच माझ्या मिस्टरांचे घर तिकडचे आहे. मी जी काही दहा माणसे वाढविली ती साफसफाईच्या कामासाठीच वाढविली आणि हे म्हणतात की, मी तेथील मुकादम आहे. तर होय मी तिकडची मुकादमच आहे.

**मा. महापौर :-**

या विषयाबाबत तक्रार या अगोदर माझ्याकडे आलेली होती.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम साफसफाई करणे हा गुन्हा आहे का?

**मा. महापौर :-**

त्यांच्या वार्डमध्ये ते काम करतात ना. ते काम करत नसतील तेव्हा सांगा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम मी तिकडे काम करणार म्हणजे करणार.

**मा. महापौर :-**

हे बरोबर नाही. त्यांनी जर त्यांच्या वार्डात काम केले नाही तर मग सांगा.

**नयना म्हात्रे :-**

ते करत नाही म्हणुनच करते की.

**मा. महापौर :-**

आपण आपआपल्या वार्डातच काम करा. हा विषय नाही सन्मा. सदस्या सौ. संगिता म्हात्रे व सन्मा. सदस्या नयना म्हात्रे आपण बसावे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम जर आमच्या वार्डात साफसफाई झाली नसती तर रोगराई पसरुन सर्वच लोक दवाखान्यात भरती झाले असते.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या सौ. संगिता म्हात्रे व सौ. नयना म्हात्रे आपणांस सांगतो हा विषय आजच्या सभेतला नाही. आपण काम करता ना.

**नयना म्हात्रे :-**

ते असे म्हणाले की तिकडे मुकादम नाही ती काय मला मुकादम म्हणुन स्कुटरवरुन घेऊन फिरत नाही मी समाजाचा मुकादम आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या सौ. संगिता म्हात्रे व सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे आपण खाली बसावे. तसेच हा आजच्या सभेतला विषयसुद्धा नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम मुर्ध्यामध्ये लहान मुलांची दफनभुमी होती त्याच्यामध्ये मोठमोठी झाडे वाढलेली होती तसेच तिथे भरपुर घाण असल्यामुळे आतमध्ये सुद्धा कोणी जाऊ शकला नसता तसेच मॅडम आमच्या मुर्धा गावामध्ये एक बाई देवीमध्ये वारुन गेली. त्यावेळेला शंभर माणसे आतमध्ये घुसली जर मी साफसफाई केली नसती तर कोणीही माणुस आतमध्ये घुसु शकले नसते.

**मा. उपमहापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व सन्मा. नगरसेवक मिरा भाईंदर नगरपालिका अस्तित्त्वात असल्यापासुन ज्या स्मशानभुमीचा विकास आपण केला. आता महानगरपालिका असताना स्मशानभूमीवरती आपण भरपुर खर्च केलेला आहे. या सदनाचे माजी उपमहापौर आणि आताचे विद्यमान विधानसभा परिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांनी त्यांच्या स्वतःच्या खिशातुन अडीच करोड रुपये टाकुन हिंदु स्मशानभुमी, बरेल ग्राऊंड, कब्रस्तान हे विकसित केले. परंतु हे सर्व होत असताना सन्मा. नगरसेवक श्री. मिलन म्हात्रे साहेब, सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा साहेब, सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे मॅडम या लोकांनी भाईंदरच्या स्मशानभुमीत जे बोर्ड लिहिले आहेत ती सर्व कामे जशी यांनी केली तरी अशा ठिकाणी जाऊन तरी राजकारण करु नये अशा मताचा मी आहे. आपण आपल्या नगरसेवक फंडातुन काही काम केले का? अहो शव ढकलण्याच्या ज्या गाड्या आहेत त्याच्यावर तुमच्या तिघांची नांवे आहेत ही किती अपमानास्पद गोष्ट आहे. त्या दिवशी स्मशानभुमीमध्ये गेलो. आमच्या सदनाचे नगरसेवक धनराज शेठ यांची आई वारली होती.

**मिलन म्हात्रे :-**

अहो तुमच्या पुढाऱ्यांनी नांव लिहिले आहे ना. ते अगोदर काढा म्हणजे आम्ही नंतर काढतो. ते सुद्धा अपमानास्पद आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे कुणाशी कसे बोलायचे ते जरा शिका. आपण खाली बसा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे व रोहीत सुवर्णा आपण जरा बसा.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्द्याचे बोल बाकी सर्व सोडुन द्या.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या सौ. संगिता म्हात्रे यांनी विषय काढला की स्मशान भुमीत नावे लिहिली आहेत त्याचे काय? म्हणुन सांगतो सर्व नगरसेवकांना ही परिस्थिती कळली पाहिजे.

**नयना म्हात्रे :-**

आम्ही कामे करत असतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे आपणांस माहित नसेल तर सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे बरोबर भाईदंरच्या स्मशानात जाऊन बघा तिथे तुमचे नांव आहे.

**नयना म्हात्रे :-**

आम्ही मेहनत केलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

अहो मेहनत कसली केली आहे आपण नगरसेवक फंडातुन पैसे खर्च केले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही आमचे स्वतःचे पैसे खर्च केलेले आहेत. आपण आपल्या मुझफ्फर हुसेन साहेबांचे अगोदर नांव काढा.

**मा. उपमहापौर :-**

मा. डी.एम.सी. साहेब तिथे मा. मुझफ्फर हुसेन साहेबांनी अडीच करोड रुपये खर्च केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

अहो आम्ही पण खर्च केलेले आहेत. नगरपालिकेचे नाहीत.

**मा. उपमहापौर :-**

किती अडीच हजार बोर्ड लावण्यासाठी खर्च केले आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सुद्धा अडीच लाख खर्च केलेले आहेत. आपली पहिल्यांदा नावे काढा. मग आमची आम्ही काढतो. विषयाबद्दल बोला ना. विषय संपवायचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

अहो जाऊ द्या. आपण कुठे राजकारण करायचे हे लक्षात घ्या. ह्या विषयाला कुणाची मान्यता असेल तर द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठेवा. प्रोसिडिंग चालू करा.

**मा. उपमहापौर :-**

आपण ठराव मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मांडलेला आहे. ठरावाचे वाचन करण्यास सांगा.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी आपण मघाशी बघीतले की, सन्मा. नगरसेविका कशा बोलतात आणि ही परिस्थिती निर्माण झाली कशी?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही निर्माण केली.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब मला जरा बोलू द्या. अशी परिस्थिती निर्माण का होते?

**मिलन म्हात्रे :-**

हे सगळे तुम्ही सकाळीच सभागृहात नक्की करुन आलेले आहेत की, मिलन म्हात्रे यांचे ठराव हे पास होऊ द्यायचे नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण जरा बसा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्या ह्या कधीही न बोलणाऱ्या सदस्या हे आज बोलायला लागल्या. सभागृहामध्ये खरं म्हणजे आम्हाला वाटायला लागले की आम्ही आगरी माणसे गप्प बसतो आणि आगरी महिलांनी हे दाखवुन दिले की, या महाकाली कशा आहेत त्या आणि ही परिस्थिती निर्माण झाली कशी काय? अतिरेक करु नये मग ते कोणीही असो. त्या ठिकाणी मी असो. अन्य कोणी असो. अतिरेक करु नये. प्रत्येक ह्या सन्मा. सभागृहाच्या सदस्य हा महान आहे. अकलेने आणि हुशारीने आहेत. तसेच कार्यकर्ते आहे आणि असे असतानासुद्धा आज महिलांनी ज्या पद्धतीने भुमिका मांडली तर ती का मांडली

भुमिका? तर आपण आपल्या भागामध्ये काम केले पाहिजे. दुसऱ्याच्या प्रभागात जाऊन जर काम करायला लागलो तर ही परिस्थिती निर्माण होईल. तरी कृपया मिलन म्हात्रेजी मी आपणांस सांगतो की आपण असा हा पायंडा पाडतात. तर हा पायंडा बंद करा. ह्या पायंडाला सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांचे समर्थन असेल जरुर कारण त्यांना सगळीकडे फिरण्याची सवय आहे. परंतु जर एखाद्या प्रभागात ती माणसे कामे करीत असतील आणि त्या विभागात जाऊन जर सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी ढवळाढवळ केली तर ते कोणाला मान्य होणार आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल आपण खाली बसा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम सदर हा जो प्रस्ताव आलेला आहे. ह्या प्रस्तावावर आपण विचार केला पाहिजे. तसेच हा पायंडा पाडू नये. मा. महापौर मॅडम मी सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने बोलतो की, असा पायंडा पाडू नये. हा पायंडा चुकीचा आहे.

**महापौर :-**

विषय संपुन टाकावा. आपण सर्व जणांनी बसावे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाची सभा संपण्याची ७.०० वाजेचे संकेत आहे. जर आपल्याला वाटत असेल की संपुर्ण विषय हे झाले पाहिजे. तर आपण त्या हिशोबाने वक्तव्य करावे. जर ते ठराव मांडत असतील तर ठराव मांडु द्या. आपल्या ठरावाचे काय होणार त्याचे चित्र स्पष्ट होईल.

**मोहन पाटील :-**

मा. उपमहापौरजी सदर ठरावास मान्यता नाही. हा विषय प्रवृत्तीचा आहे हे बरोबर आहे. सभा ही झाली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

अहो नियमाचे काय ते बोला. कोणत्या नियमानुसार मी हा ठराव ठेवू शकत नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा या ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची प्रकरण १(ज) अन्वये प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे. या ठिकाणी सभागृहामध्ये काही सन्मा. सदस्य हे जुने आहेत. तसेच काही नवीन आहेत. तरी ह्या सर्वाच्या माहितीसाठी मी या ठिकाणी एक सांगू इच्छितो की, आपण ह्या मिरा भाईंदरच्या संपुर्ण विकासाचे चित्र सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. आपण प्रथम नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा यांची कारकिर्द पाहिली त्यानंतर अडीच ते तीन वर्ष सन्मा. दुसरे नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांची कारकिर्द पाहिली त्यानंतर आता आपल्या प्रथम मा. महापौर मायरा मेन्डोंसा यांची कारकिर्द पहात आहोत. प्रत्येकाची काम करण्याची पद्धत ही वेगळी असते. मा. महापौर मायरा मेन्डोंसा यांची कारकिर्द आपण पहात आहोत. तरी सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे म्हणतात की, जेव्हा मोहन पाटील स्थायी समितीचे सभापती होते मॅक्झीमम कामे ही त्याच्या प्रभागातील झालेली आहेत आणि ती मोहन पाटील साहेबांनी केलेली आहेत आणि ते म्हणतात की मी कधी सुचक अनुमोदक नव्हतो. सुचक व अनुमोदक आमचे सदस्य होते तरी मोठ्या मनाने आम्ही तुमची कामे करतो.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाला सोडुन हे काम चाललेले त्यांना खाली बसवा. मला ठराव ठेवायचा आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख आपण खाली बसावे. सर्वांना माहिती आहे. आपण कामे करत आहोत. कोण म्हणतो की, माझ्या वार्डात काम झाले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आम्ही असे कधीच बोललेलो नाही.

**मा. महापौर :-**

चला ठराव मांडायचा आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मांडतो. मताला टाका, संपले. काय आहे त्याच्यात का नको मांडू? माझा हक्क आहे. तो कशाला घाबरता. ठरावाचे वाचन करत आहे.

**(सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)**

**प्रकरण क्र. ५९ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक १४/०१/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव - राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या बाजुस आदिवासी पाड्याकडे जाण्याकरिता रस्ते बांधणेबाबत सदर भागाचा सर्व्हे करुन विकास आराखड्यात योग्य रुंदीचे रस्ते समाविष्ट करणेबाबत. तसेच नगरभवन इमारत विकास आराखड्यात समाविष्ट करणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विकास आराखडा सन १९९७ मध्ये मंजुर झालेला आहे. सदर विकास आराखड्यात राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या लगत असलेल्या पुर्व पश्चिम जागांमधून जाण्या येण्याकरिता आजमितीस पक्के रस्ते नाहीत. सदर भागामध्ये आदिवासी व मागसवर्गीय बहुसंख्येने राहत आहेत.

१. माशाचा पाडा रस्ता (मंदिरापर्यंत)

२. दासकुलपाडा

३. बाबळीचा भाट क्र. १ व २ कडे जाणारा रस्ता

४. अन्य लगतचे असलेले रस्ते

वरील विभाग व पाड्यांकडे जाण्याकरिता विकास आराखड्यांमध्ये त्यावेळी पक्के रस्ते दाखविलेले नसून असलेले कच्चे रस्ते व पायवाटा या खाजगी मालकीच्या व वन विभागाच्या असल्याने संबंधित जमीन मालकांकडून या जागा रस्त्यांकरीत म.न.पा.स भुसंपादीत करता येत नाहीत. तरी वरील सर्व रस्ते पुढील २० वर्षाच्या वाढत्या लोकसंख्येचा व वाहतुकीचा विचार करता अशा रस्त्यांना लागणारी नियमानुसारची रुंदीसह, नगरभवन इमारत सर्वप्रथम विकास आराखड्यामध्ये तात्काळ प्रस्तावीत करुन ह्या जागा महापालिकेच्या ताब्यात घेऊन बाधीत होणाऱ्या जमीनमालकांस योग्य तो नियमानुसार मोबदला त्वरीत द्यावा. या जागांवर सदर रस्ते विकसीत करण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, भुसंपादन अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आरबीडी १०९६/(१८८०) रस्तें ७ मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ दिनांक २३ मे १९९७, महामार्ग अधिनियम १९५५ मधील सेक्शन ७ च्या कलमातील आवश्यक त्या सर्व तरतुदी वापरुन पुढील कारवाई करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**नयना म्हात्रे :-**

ह्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

इस प्रवृत्तीका ठराव को मेरा बिल्कुल विरोध है।

**जयाबाई भोईर :-**

या ठरावाला आमचा विरोध आहे.

**मोहन पाटील :-**

ठराव :- सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी मांडलेल्या प्रस्तावावरील रस्ते यापुर्वीच कारवाई सुरु असल्याने सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेला प्रस्ताव हे सभागृह फेटाळत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी ठराव ठेवलेलाच नाही. तुमचा ठराव बारगळला.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे असे बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

अहो मिलन पाटील असे बोलले. आपण टेप वाजवुन बघा.

**मोहन पाटील :-**

परंतु अजुन आम्हाला ठराव द्यायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

टेप वाजवुन बघा. आता आपण सन्मा. सदस्य मिलन पाटील बोललात त्यांनी काही ठराव ठेवलेलाच नाही.

**मा. महापौर :-**

मतदान घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपण रुलिंग काय द्यावे हे काय मी सांगु शकत नाही. कारण मी काय रुलिंग देण्यासाठी उभा राहिलेला नाही. तुम्हाला काय सांगायचे हे मी कसे काय सांगणार. प्रश्न या ठिकाणी असा एक निर्माण झालेला आहे की सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी दुसऱ्याच्या वार्डातले काम सुचविलेले आहे. आता असे म्हणायला गेले तर कायदेशीररित्या कुठलाही नगरसेवक कुठेही करु शकतो. शक्यतो आपण काय बघतो आपल्यामध्ये भांडणे होऊ नये आणि सगळ्यांना त्यांची काळजी घ्यावी की आपण दुसऱ्याच्यामध्ये आपल्या आपआपसामध्ये एकोप्याने राहिले पाहिजे कारण हे सभागृह शेवटी सर्वांच्या मताने चालते आणि त्याच्यात मेजोरिटीने ठराव होतो. मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी आपल्याकडे अनेक वेळा प्रस्ताव दिले आहेत. त्याच्यावर कारवाई आपली चालु आहे. प्रश्न असा आहे की, सत्ताधारीना प्रोसीजरने काम करावे लागते. आता विपक्षाची परिस्थिती काय असते. त्याच्यातुन त्यांना जर काम करायचे असेल तर 'ज' चा प्रस्तावाचा वापर करुन अशाप्रकारे कुठलाही प्रस्ताव आणतात. आपण याच्यामध्ये एकच करा की सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी काय म्हटले आहे की सदर रस्ते तयार करण्याकरीता स्थानिक नगरसेवक व सर्व पक्षाच्या नगरसेवक, नगरसेविकांनी मागणी महापालिकेकडे केलेली आहे. तसे त्यांनी नमुद केलेले आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचविले म्हणुन हा रस्ता होणार नाही. मा. महापौर मॅडम शेवटी तुमचा तो अधिकार आहे. कारण ह्या विकास आराखड्यामध्ये रस्ता घेण्यासाठी एक प्रोसिजर वेगळी आहे. या प्रस्तावाने काही तो रस्ता विकास आराखड्यात येणार नाही. मॅडम त्याच्यासाठी तुम्हाला अेडीटीपी कडुन प्रस्ताव तयार करुन घ्यावा लागेल आणि तो विषय मा. महासभेपुढे आणावा लागेल आणि जेव्हा तुम्ही महासभेपुढे विषय आणाल तेव्हा तुमच्या पक्षाचे जे लोक नाराज झालेले आहेत. त्या लोकांचे तुम्ही पत्र घ्या. त्याच्या पत्राच्या अनुषंगाने तसा तुम्ही मा. महासभेपुढे विषय आणा. मग या विषयाला चालना मिळु शकते. हा प्रस्ताव मंजुर झाला म्हणजे विषय मंजुर होत नाही. लक्षात घ्या. प्रस्तावावरती रस्त्याचे रेखांकन होत नाही.

**मा. महापौर :-**

थोडक्यात सांगा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम यावरती चर्चा झालेली आहे. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील हे कायद्याने बरोबर बोललेले आहेत. परंतु या ठिकाणी या पद्धतीचा अवलंब हा चुकीचा आहे आणि अशी ही पद्धत येता कामा नये म्हणुन आम्ही हा ठराव या ठिकाणी दिलेला आहे.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ५९ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे हे सुचक आणि अनुमोदन सन्मा. सदस्या सौ. नयना गजानन म्हात्रे यांचे आहे. दुसरा ठराव सुचक श्री. मोहन पाटील व अनुमोदन श्री. हॅरल बोर्जीस यांचे आहे. असे दोन ठराव आलेले असुन नियमानुसार प्रथम मी दुसरा ठराव मतास टाकतो आहे सुचक आहेत, श्री. मोहन पाटील अनुमोदन श्री. हॅरल बोर्जिस यांचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मताची मागणी कोणी केली? चार नगरसेवक उभे राहुन मताची मागणी करायला पाहिजे होती.

**प्र. सचिव :-**

दोन ठराव आल्यामुळे मतदान करणे क्रमप्राप्त आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मतकी मागणी कबसे कर रहे है। आपको समझमे नही आता क्या?

**लिओ कोलासो :-**

मताची मागणी झाली नसेल तरी दोन ठराव आल्यामुळे मतदान करणे अनिवार्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मताला टाकताना कमीत कमी चार नगरसेवकांनी उभे राहुन हात वर करुन मताची मागणी करायची असते. तसेच त्यांच्या ठरावाला आम्ही मतदानाची मागणी करत आहे. आमची पण नोंद नंतर करुन घ्या.

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. मोहन पाटील अनुमोदक श्री. हॅरल बोर्जीस यांचा ठराव मी प्रथम मतास टाकत आहे. या ठरावाच्या बाजुने जे आहेत. त्यांनी हात वर करायचे आहेत. तसेच या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत आणि तटस्थ जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९) श्री. शेख आसिफ गुलाब
१०) श्री. नलावडे दिनेश द.
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१३) श्री. घरत केशव रामभाऊ
१४) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५) श्रीम. वाडे जिवी हिरा
१६) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
१७) श्रीम. पाटील अनिता जयवंत
१८) श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१९) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२०) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२१) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२२) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२३) श्री. खान शफीक अहमद
२४) श्रीम. सय्यद नुरजहॉं नझरहुसेन
२५) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२६) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२७) श्री. पाटील रोहीदास आत्माराम
२८) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२९) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३०) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७) श्री. सिंग मदन उदितनारायण

८)	श्री. पाटील रोहिदास शंकर
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२)	श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१४)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१५)	श्री. पाटील रतन कृष्णा
१६)	श्री. पाटील शरद केशव
१७)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१८)	श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
१९)	श्रीम. शाह रक्षा एस.
२०)	श्री. जैन रमेश धरमचंद्र

**तटस्थ असलेले सदस्य**

१)	श्री. पाटील अनंत रामचंद्र
२)	श्री. पाटील अशोक बळवंत
३)	श्रीम. म्हात्रे संगिता विजय

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ३२ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २० |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०३ |
| एकूण सदस्य | :- | **५५** |

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. मोहन पाटील आणि अनुमोदक श्री. हॅरल बोर्जिस यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ३२, विरोधात २० आणि तटस्थ ०३ आहेत. प्रकरण ५९ साठी आलेला ठराव सुचक श्री. मिलन म्हात्रे अनुमोदक सौ. नयना गजानन म्हात्रे याचा ठराव तो मी आता मतास टाकतो आहे. श्री. मिलन म्हात्रे सुचक व सौ. नयना गजानन म्हात्रे अनुमोदक यांनी जो ठराव मांडलेला आहे या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तसेच ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत आणि तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सन्मा. सदस्या सौ. शुभांगी नाईक यांना मतदान करता येणार नाही. कारण की त्या पहिल्या मतदानाला हजर नव्हत्या.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१)	श्री. म्हात्रे मिलन वसंत
२)	श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३)	श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७)	श्री. सिंग मदन उदितनारायण
८)	श्री. पाटील रोहिदास शंकर
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२)	श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३)	श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१४)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१५)	श्री. पाटील रतन कृष्णा
१६)	श्री. पाटील शरद केशव

१७)  श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१८)  श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
१९)  श्रीम. शाह रक्षा एस.
२०)  श्री. जैन रमेश धरमचंद्र

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१)  श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२)  श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३)  श्री. पाटील मोहन मधुकर
४)  श्री. कोलासो लिओ इजिदोर
५)  श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६)  श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७)  श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८)  श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९)  श्री. शेख आसिफ गुलाब
१०)  श्री. नलावडे दिनेश द.
११)  श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२)  श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१३)  श्री. घरत केशव रामभाऊ
१४)  श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५)  श्रीम. वाडे जिवी हिरा
१६)  श्री. गावंड आत्माराम बाळाराम
१७)  श्रीम. पाटील अनिता जयवंत
१८)  श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१९)  श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२०)  श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२१)  श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२२)  श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२३)  श्री. खान शफीक अहमद
२४)  श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२५)  श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२६)  श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२७)  श्री. पाटील रोहीदास आत्माराम
२८)  श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२९)  श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३०)  श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१)  श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
३२)  श्री. पाटील मिलन गोविंदराव

**तटस्थ असलेले सदस्य**

१)  श्री. पाटील अनंत रामचंद्र
२)  श्री. पाटील अशोक बळवंत
३)  श्रीम. म्हात्रे संगिता विजय

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | २० |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | ३२ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०३ |
| एकूण सदस्य | :- | **५५** |

**प्र. सचिव :-**

श्री. मिलन म्हात्रे सुचक, अनुमोदक सौ. नयना म्हात्रे यांच्या ठरावाच्या बाजुने २०, विरोधात ३२ आणि तटस्थ ०३ आहेत.

**प्रकरण क्र. ५९ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक १४/०१/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव - राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या बाजुस आदिवासी पाड्याकडे जाण्याकरिता रस्ते बांधणेबाबत सदर भागाचा सर्व्हे करुन विकास आराखड्यात योग्य रुंदीचे रस्ते समाविष्ट करणेबाबत. तसेच नगरभवन इमारत विकास आराखड्यात समाविष्ट करणेबाबत.

**ठराव ६६ :-**

श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेल्या प्रस्तावातील रस्ते ह्याबाबत यापुर्वीच कार्यवाही सुरु असल्याने श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेला प्रस्ताव हे सभागृह फेटाळत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
७) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
८) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
९) श्री. शेख आसिफ गुलाब
१०) श्री. नलावडे दिनेश द.
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
१३) श्री. घरत केशव रामभाऊ
१४) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५) श्रीम. वाडे जिवी हिरा
१६) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
१७) श्रीम. पाटील अनिता जयवंत
१८) श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१९) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२०) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२१) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२२) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२३) श्री. खान शफीक अहमद
२४) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२५) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२६) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२७) श्री. पाटील रोहीदास आत्माराम
२८) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२९) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३०) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३१) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७) श्री. सिंग मदन उदितनारायण
८) श्री. पाटील रोहिदास शंकर
९) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१४) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१५) श्री. पाटील रतन कृष्णा
१६) श्री. पाटील शरद केशव
१७) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१८) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
१९) श्रीम. शाह रक्षा एस.
२०) श्री. जैन रमेश धरमचंद्र

**तटस्थ असलेले सदस्य**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्री. पाटील अशोक बळवंत
३) श्रीम. म्हात्रे संगिता विजय

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ३२ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २० |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०३ |
| एकूण सदस्य | :- | **५५** |

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सुचक श्री. मोहन पाटील व अनुमोदक श्री. हॅरल बोर्जीस यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर.

**(प्र. सचिवांनी पुरक घोषणा क्र. ६० चे वाचन केले.)**

**शशिकांत भोईर :-**

प्रकरण क्र. ६० मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम व (ज) अन्वये प्रस्ताव.

**लिओ कोलासो :-**

या संदर्भातले आपण जे ज ची सुचना दिलेली आहे आणि ज च्या सुचनेमध्ये आपण जे काम मंजुर झालेले ते काम रद्द करणेबाबत विनंती केलेली होती. तरी त्याची पुर्तता प्रशासनाने केलेली आहे. तर झालेले टेंडर हे रद्द करण्यांत आलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने निवेदन द्यावे की, का करण्यांत आलेले आहे तो मी वाचतो. विषय प्राधान्य यादीत समाविष्ट न केलेल्या गटार बांधणेची निविदा बाबत मा. महासभा दि. ५/६/२००४ रोजी प्रकरण क्र. ५ अन्वये विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याबाबत ठराव ०७ अन्वये मंजूरी देण्यांत आलेली आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय रद्द केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम विषय कसा रद्द करणार? निविदा रद्द केलेल्या आहेत त्याबद्दल मला प्रशासनाने निवेदन करावे.

**मा. महापौर :-**

निविदा रद्द केलेल्या असुन आपणांस पत्र दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी काय प्रस्ताव मांडलेला आहे तो ऐका आणि रद्द का केल्या आहेत त्याचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब ऐका ते पत्र तुम्ही सभागृहाला वाचून दाखवू नका कारण की आपल्याला थोड्याशा वेळामध्ये एक विषय पूर्ण करायचा आहे आणि तुम्हाला अपेक्षित असे सांगतो याबाबत लोकमतमध्ये आपण जाहिर नोटीस काढली आणि सदर बाबत तुम्हाला पत्र दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

उपमहापौर साहेब तुम्हाला मी अपमानित करीत नाही मला फक्त प्रशासनाने खुलासा करावा. ते रद्द का करण्यांत आले. त्याबाबत खुलासा व्हावा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांचा विषय आहे. त्या विषयाला मी सुद्धा मागणी केलेली आहे. तरी मलाही उत्तर आलेले नाही. लेखी मागणी केलेली आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सदर विषयाबाबत दि. ५/६/२००४ च्या मा. महासभेने जी मंजुरी मिळाली त्याच्यावर निविदा काढण्यांत आल्या होत्या. परंतु नजरचूकीने ह्या निविदा प्रसिद्ध करण्यांत आल्या आणि त्यानंतर त्या रद्द करण्यांत आल्या.

**मिलन म्हात्रे :-**

२१ लाखाची निविदा ही काय नजरचुकीने येते का? आणखी काय काय नजरचुकीने येणार आहे. अधिकाऱ्यांवर कारवाई करा. २१ लाखाची निविदा येते म्हणजे काय?

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्यावा.

(पुरक घोषणा प्रकरण क्र. ६० वर सभागृहात चर्चा करण्यांत आली. सदर प्रकरणावर ठराव केला नाही.)

**(प्र. सचिवांनी पुरक घोषणा प्रकरण क्र. ६१ चे वाचन केले)**

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, आता मी ठराव मांडतो आहे कारण वेळ पण कमी आहे.

(सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रियांका करंबेळे :-**

या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

महापौर मॅडम के परवानगी से बोलता हूँ की, हमारे मिरारोड मे सोमवार के बझार और शनिवार का बझार वह भी बंद हो जाना चाहिये क्योंकी वहाँ भी बहुत ही ट्राफिक जाम होती है।

**शफीक खान :-**

मिरा रोड मधील उड्डाणपुलाजवळील जो लोढा कॉम्प्लेक्सचा रस्ता आहे त्याच्यावर शनिवारी बाजार भरतो. तरी त्यावर आमची हरकत आहे. तरी तो उठवला पाहिजे व त्या बाजाराची मुदत संपलेली असुन त्यास मुदतवाढ दिलेली नाही.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम ज्यावेळेला हा विषय सभागृहामध्ये झालेला होता. त्यावेळेला मी पण एक पत्र आपल्याला दिले होते. त्यामध्ये उल्लेख केलेला होता की, ''ना फेरीवाला क्षेत्र'' व ''फेरीवाला झोन'' आपण ज्याप्रमाणे ठरविलेले आहे त्यात आमचा ६० फुटी रोड हा पुर्णपणे प्रभाग क्र. २६ मध्ये आहे. त्यामध्ये भाजीमार्केट आहे. त्यांना आरक्षित जागा कुठलीही नाही आणि तो भाजीमार्केट जो रस्ता सुचविलेला आहे की, जैन मंदिरच्या पुढच्या भागात म्हणजे ६० फुटी रोड तिथुन सुरु होतो. तेथुन लागुन ते गणेश विनायक पर्यंत परंतु तिथे ७०० भैय्या बसत नाही तर १५०० भैय्या बसत असतात आणि दुसरे तिथे ४०० भैय्या ॲड करणे म्हणजे तिथल्या येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना हा त्रासच आहे आणि तो वन-वे रस्ता आहे अणि तो साफ करणे. जसे आता सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी जे सांगितले तर ६० फुटी रोड हा पुर्णपणे साफ करुन टाकावा अशी माझी विनंती आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलु इच्छितो की, मिरा भाईंदर शहरामध्ये एक चांगले म्हणजे आम्हांला वाटते की, विरोधक आमच्यावर एक टिकाशस्त्र सोडते आहे आणि त्या टिकेचे काम आम्ही करतो असे आम्हाला दाखविले होते. पंरतु आज सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी चांगले बोलले. मिरा भाईंदर विकास गतिमान आणि परिवहन सेवा आपण सुरु करीत आहोत आणि असा पुरस्कर्ते करणारे विरोधक तरी आम्हाला कधी मिळणार धन्यवाद देतो. सभा सदस्य श्री. रतन पाटील यांना तरी सकाळी थोडा विरोध केला तुम्ही कारण शेवटी विरोधी हे मत आमचे आहे. विरोधी आम्ही आहोत. हे आपण जनतेसमोर ठेवले पाहिजे. याचा आदर्श आपण पाळतात त्याबद्दल धन्यवाद. मा. महापौर महोदया आपण या ठिकाणी जो 'ज' खाली प्रस्ताव सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांनी आणलेला आहे. तरी मिरा भाईदंर महानगरपालिका पुर्व पश्चिम येथील मुख्य रस्त्यावर व फुटपाथ, फेरीवाल्यांवर निर्बंध घालावा. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, प्रशासनाने याबाबत वारंवार कारवाई सुरु केलेली आहे आणि अशा प्रकारची कारवाई सुरु आहे. मा. स्थायी समितीच्या पुढे अशा पद्धतीने ना फेरीवाला झोन आणि फेरीवाला झोन अशा पद्धतीचा ठराव करुन दिलेला आहे आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने आपल्या शहरामध्ये बऱ्याचदा अनेकवेळा ज्या ज्या तक्रारी आल्यानंतरही आणि नागरिकांच्या तसेच सदस्यांच्या तक्रारी आल्यानंतर असे अनधिकृत फेरीवाले आपण उचलत असतो आणि स्थायी समितीचा जो ठराव मांडलेला आहे. त्या पद्धतीने आपण कारवाई केलेली आहे किंवा करतात. तरी ती कारवाई यापुढेही सुरु करावी. कारण मघाशी बोलल्याप्रमाणे आपल्याला या ठिकाणी जो ठराव आणलेला आहे याच्यामध्ये कारवाई होत नाही असा नाही आहे. परंतु त्या कारवाईमध्ये असे काही नजरचुकीने किंवा कारवाई होत नसेल. कारण बी.पी. रोडवर ज्या पद्धतीने फुटपाथ बांधलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर फुटपाथ बांधलेले आहे. त्या फुटपाथवर समोरचे दुकानवाले हे काही सामान ठेवुन तो रस्ता बंद करतात. तर मी या प्रस्तावाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आपण सदरच्या प्रस्तावाबरोबर ज्या स्थायी समितीने ज्या पद्धतीने ना फेरीवाला झोन, फेरीवाला झोन आहेत याची कारवाई सुरु केलेली आहे. ती कारवाई आपण सुरु ठेवावी. जेणेकरुन आपल्याला ज च्या प्रस्तावाच्या ठरावाचा प्रश्नच येत नाही. कारण ती प्रशासनाची कामगिरी आहे आणि ज्यासाठी आपल्याकडे स्पेशल ठराव आहे. तरी त्या ठरावाची अंमलबजावणी व्हावी असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

संबधित खात्याने कारवाई करावी. पुढचा विषय घ्यावा.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम प्रभाग क्र. १४ मध्ये आमच्या येथे सिल्व्हर पार्क ते जांगीड कॉम्प्लेक्स इकडे चायनीज गाड्या लागतात व तिथुन जाणाऱ्या महिलांची छेडछाड होते व तेथे रस्त्याच्या मधोमध फेरीवाले हे बसत असतात आणि अशा वेळेस त्या महिलांची छेडछाड होते. अशा वेळेस तिथल्या महिलांवर बराचसा अन्याय केला जातो. याबाबतची तक्रार मी पोलिस स्टेशनला सुद्धा केलेली आहे. मा. महापौर मॅडम बऱ्याच वेळा पत्र देऊनसुद्धा आपले अधिकारी कारवाई करत नाही किंवा कारवाई करायची झाली तर तिथल्या फेरीवाल्यांना किंवा तिथले जे कार्यकर्ते असतात त्यांना सांगतात की,

अमक्या अमक्याची तक्रार आलेली आहे. म्हणुन आम्ही आलो तेव्हा त्या लोकांचे फोन येतात. तरी हे जे चाललेले आहे. अधिकारी हे चुकीचे निर्णय घेतात आणि चुकीची माहिती देतात. कारण त्यांनी कोणी तक्रार केली हे सांगणे गरजेचे नसुन ते अंमलात आणणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट मिरारोडमध्ये सोमवार बाजार आणि शनिवार बाजार भरतो आणि त्यावेळेला रहदारीस बरीच अडचण होते. तरी त्यावर व्यवस्थित कारवाई करावी. धन्यवाद!

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम मला अजुन ह्या विषयावरती बोलायचे आहे. मला पाच मिनिटे बोलण्यास द्यावेत. मा. स्थायी समितीमध्ये हा विषय आलेला असेल आणि मंजुरी झाली असेल तर माझे एक पत्र होते. मा. सभापती साहेबांना मी पत्र दिलेले आहे. सुदामानगर गली आणि इंदिरा कॉम्प्लेक्स गली ह्यामध्ये ६ मीटर रस्ता सुद्धा नाही आणि तिथे तुम्ही पार्किंग झोन केलेला आहे आणि तिथे दोन दोन शाळा आहेत, हॉस्पीटल आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे तिकडे हाल होणार आहेत. ते सर्व बघुन तुम्ही कारवाई करावी. माझे असे मत आहे की, ६० फुटी रोड, जैन मंदिर परिसर आणि सुदामानगरची कारवाई परत करावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम मिरारोड मे जो सोमवार बझार आणि शनिवार बझार जो है उधर बहुतसे तकलिफ का काम है। वहाँ लुटमार और बहुतसी चोरी होती है जिसकी कम्प्लेंट करते है। उसका काम नही करते।

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम मला त्यांचे उत्तर देण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांना अगोदर बोलू द्या आणि हा विषय संपवुन टाका.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम स्थायी समिती मे जो प्रस्ताव पास हुआ था। उसका अभीतक कुछ भी क्रियात्मक हुआ नही। अभी सन्मा. सदस्य मोहन पाटील बोले की, स्थायी समितीमे पास हुआ और उसकी कारवाई चालू है। लेकिन अधिकारीयो को बोलने से ऐसा मालूम होता है की, मा. महासभा मे पास नही हुआ इसलिए कारवाई नही होगी। अभी आप बोलते है की, कारवाई होनी चाहिए।

**मा. महापौर :-**

याबाबत आदेश दिलेला आहे.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम मला याबाबत उत्तर द्यावे की, आमच्या येथे चार नगरसेवक असुन कोणी बोलत नाही. सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील आपण बोलायला पाहिजे होते. कारण ते सुद्धा तिथेच आहेत. लोकांना जो त्रास होतो आहे त्याबाबत तुम्ही बोलत नाही. मा. महापौर मॅडम तुम्ही याबाबत काय कारवाई करणार आहात? त्याबाबत उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

कारवाई करणार. मी दोन तीन वेळा बोलले की, कारवाई करतील ते.

**रक्षा शाह :-**

परंतु काय कारवाई करणार त्याचे तरी मला उत्तर द्यावे.

**प्रकरण क्र. ६१ :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांचे दिनांक १५/०१/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्व-पश्चिम येथील मुख्य रस्त्यांवर व फुटपाथवर फेरीवाल्यांसाठी निर्बंध घालणेबाबत.

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर विकासाची वाटचाल दिवसेंदिवस गतीमान होत असताना काही बाबतीत महापालिका प्रशासन चालढकल करताना दिसत आहे. त्याबाबतीत शहर विकासाच्या आड येणारी मुख्य बाब म्हणजे मिरा-भाईंदरमधील भाईंदर पूर्व-पश्चिम येथील मुख्य रस्त्यांवर लाखो रूपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या फुटपाथवर झालेले फेरीवाल्यांचे अतिक्रमण होय.

आज महापालिका आपली स्वतःची परिवहन सेवा चालू करण्याचा प्रयत्न करित असून सदर प्रयत्न अथवा निर्णय जनतेच्या दृष्टिने स्वागतार्ह असून शहरातील मुख्य रस्ते ग्रामपंचायतीच्या वेळेपासून अरुंद व गल्याबोळयात असल्याने महापालिका क्षेत्रात वाढणारा जनतेचा भरणा एकंदरीतच महापालिकेच सर्व यंत्रणावर किंवा विकासात्मक कामावर रोख लावणार प्रश्न निर्माण झाला आहे. वाढत्या

लोकसंख्येच्या मानाने रस्ते छोटे पडू लागले आहेत. महापालिकेने लाखो रुपये खर्चून पण त्याच उपयोग दुकानदार व फेरिवाले आपला माल ठेवण्यासाठी व विक्री करण्यासाठी करत आहेत. जनतेने व विद्यार्थ्यांने चालायचे कोठून? रस्त्यांवरून चालणे म्हणजे जीव धोक्यात घालणे. दिवसेंदिवस सदरच्या रस्त्यांवर रहदारीची समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाल्याने छोटे मोठे अपघात होत असतात. महापालिका क्षेत्रातील दिवसेंदिवस सर्वच रस्त्यांवर फेरिवाल्यांचे अतिक्रमण होत आहे. परंतु महापालिकेकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाच्या विरुध्द प्रचंड रोष निर्माण झालेला आहे आणि सदर बाब महापालिका आल्यानंतर विकासाच्या दृष्टिने घातक आहे.

तरीही महापालिकेच्या मीरारोड, भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) येथील बाजार लिलावातील करारनाम्यानुसार/अटीशर्तीनुसार मनाई केलेल्या रस्त्यांवर बसणारे फेरीवाले/हातगाडीवाले यांना बंदी घालून त्यांचा माल व गाडया जप्त कराव्यात व सदर रस्त्यांवर ''ना फेरिवाला क्षेत्र'' फलक लावावा.

तसेच बाजार लिलावाची मुदत संपताच महापालिकेने मंजुर केलेल्या फेरिवाल्यांसाठी परवाना पध्दतीची अंमलबजावणी करुन खाली नमुद केलेल्या यादीत समाविष्ट केलेल्या रस्त्यांवर व्यवसाय करणारे हातगाडीवाले, फेरीवाले व फुटपाथवर माल ठेवून विक्री करणारे दुकानदार यांचा माल जप्त करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी व हया सर्व रस्त्यांवर **ना फेरिवाले क्षेत्र** घोषित करुन तसे फलक लावण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**<u>रस्त्यांची यादी :-</u>**

**भाईंदर (पश्चिम)**
१. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल ते भाईंदर सेकंडरी स्कूल) ते (नेताजी सुभाषचंद्र मैदानापर्यंत)
२. पोलिस स्टेशन ते भाईंदर रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड)

**भाईंदर (पूर्व)**
१. बाळाराम पाटील रोड
२. गोडदेव नाका ते नवघर नाका, गोडदेव तलाव परिसर
३. नवघर नाका ते बंदरवाडी नाका
४. बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता)
५. साईबाबा मंदिर ते गोडदेव नाका (गोडदेव फाटक रोड)
६. बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदिरपर्यंत
७. भाईंदर पूर्व फाटक चर्च ते केबीन रोड
८. केबीन रोड नाका ते नर्मदानगर मधून एम.आय. उदयोगपासून अभिनव स्कूल नाकापर्यंत जाणारा रस्ता
९. नवघर क्रॉस रोड,

**मिरा रोड (पूर्व)**
१. मिरा रोड स्टेशन ते शांतीनगर गेट ते शितल नगर नाका.
२. नयानगर रिक्षास्टँड ते शितल नगर नाका
३. पोस्ट ऑफीस मिरारोड ते शांतीनगर सेक्टर क्रमांक १ ते ४ मधील रस्ता
४. शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता
५. शितल नगर नाका ते जहांगीर ते सिल्वर पार्क ते साईबाबा नाका

**काशिमिरा**
१. राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ (दहिसर चेक नाका ते वर्सोवा नाका)
२. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. प्रियांका करंबेळे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी पुरक घोषणा प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**शुभांगी नाईक :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६२ :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील यांचे दिनांक १५/०१/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव - मिरा भाईंदर महापालिकेत कामगार/कर्मचारी भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर हे शहर २५ ते ३० गांवे मिळुन आजमितीस एक शहर झालेले आहे. ग्रामपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका अशा चढत्या क्रमाने मिरा भाईंदर या शहराचा विकास होऊ घातलेला आहे. मिरा भाईंदर शहरातील लोकसंख्या ही दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत असुन जवळजवळ ही लोकसंख्या ९ लाखापर्यंत पोहचलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरातील बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. शहरामध्ये आजमितीस १० हजार पदवीधर २५०० डिप्लोमाधारक आणि बाकी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या ही १४ हजाराच्या आसपास आहे.

स्थानिक पातळीवर ह्या बेरोजगार युवकांना महापालिकेच्या सेवेत प्राधान्य देणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आणि या पदवीधर युवकांकडुन मिरा भाईंदर शहराचा विकास घडवुन आणण्यासाठी प्रयत्न करणे हे प्रशासनाचे, लोक प्रतिनिधींचे कर्तव्य आहे. आतापर्यंत हंगामी स्वरुपाचे अधिकारी, कर्मचारी भरती करताना स्थानिक वृत्तपत्रामध्ये किंवा राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिलेली नाही. ह्या नेमणूका करताना स्थानिक उमेदवारांना समाविष्ट करुन घेणे हे प्रशासनाचे व लोकप्रतिनिधीचे प्रथम कर्तव्य आहे.

महापालिकेच्या प्रशासकिय कामामध्ये तयार केलेल्या आस्थापनेच्या आकृतीबंधामध्ये नमुद केलेल्या जागा (वैधानिक व्यतिरिक्त) ज्या महापालिका मुख्य लेखा परिक्षक व महापालिका सचिव यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या आहेत त्या रिक्त असताना त्यावर स्थानिक उमेदवारांची भरती केली जात नाही. अशा रिक्त जागांवर भरती करताना स्थानिक वृत्तपत्रात व राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देऊन, शैक्षणिक पात्रता व वयाची अट पूर्ण करणाऱ्या स्थानिक उमेदवारांची भरती करण्यांत यावी.

महापालिका व महासभा यांनी मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ कलम ५३(१) नुसार हंगामी/कायम स्वरुपाचे अधिकारी नेमणुक करतांना व कर्मचारी निवड समितीने कलम ५४(२) प्रमाणे करावयाच्या सर्व नेमणूकांमध्ये स्थानिक उमेदवारांची भरती करण्यांत यावी.

अनुशेषांच्या रिक्त जागेवर करावयाच्या भरतीसाठी संवर्ग, शैक्षणिक पात्रता व वयाच्या अटी पूर्ण करणाऱ्या स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे.

अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये महानगरपालिकेने यापुढे मंजुरीसाठी पाठवायच्या नवीन आस्थापनेच्या आकृतीबंधाप्रमाणे भरावयाच्या सर्व रिक्त जागांवर कलम ५४(२) नुसार आस्थापनेत/सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचा हक्क असलेल्या जागा सोडून स्थानिक उमेदवारांची भरती करण्यांत यावी.

प्रत्येक महानगरपालिका स्वायत्त असल्याने आपल्या महापालिकेचे स्वतंत्र सेवा नियम तयार करुन त्यामध्ये स्थानिक उमेदवारांची व्याख्या करण्यांत यावी. जे उमेदवार मिरा भाईंदर शहरात गेल्या पंधरा वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन कायम वास्तव्य करीत आहेत अशांना स्थानिक उमेदवार म्हणुन संबोधले जावे. वरीलप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील. अनुमोदन :- श्रीम. शुभांगी नाईक.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर आहे.

**रक्षा शाह :-**

मा. महापौर मॅडम मला अजुनही उत्तर दिलेले नाही.

**मा. महापौर :-**

मी कारवाई करते. म्हणुन आपणांस तसे सांगितले.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर, मा. पिठासीन अधिकारी व सर्व सन्मा. लोकप्रतिनिधीचे आज या ठरावाचे निमित्ताने आज जो ठराव पास केला त्याबद्दल मी सर्वांचे हार्दिक आभार प्रकट करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम शोक प्रस्ताव मांडायचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब आपण जो ठराव आता मांडला. स्थानिकांची भरती महानगरपालिकेत झाली पाहिजे अशी आपली आणि सर्व नगरसेवकांची भावना तसेच नागरिकांची सुद्धा भावना आहे. परंतु भरतीसाठी नेहमी शासनाने वेळोवेळी जे निर्देश घातलेले आहे त्याप्रमाणे परंतु याच्यामध्ये आपल्याकडुन जेवढे करता येईल तेवढे करण्याची मान्यता आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

लेकिन अपना अधिकार ही नही है मतलब ही क्या है ठराव का, अपना कोई अधिकार नही।

**मा. उपमहापौर :-**

शासनाकडुन येत असतात.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौरांनी ठराव मंजूर केलेला आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने मी शोकप्रस्ताव ठेवत आहे. आपल्या आशिया खंडातील भारतासहीत इतर राष्ट्रात दि. २५ डिसेंबर व २६ डिसेंबरच्या दरम्यान जी सुनामी लाट आली त्या लाटेत लाखो लोक मृत्यु पावले. जिवित व वित्तहानी झाली त्याबद्दल ही सभा मृतात्म्यास श्रद्धांजली वाहत आहे. त्याप्रमाणे ह्या सभागृहाचे जेष्ठ सदस्य मा. धनराज अग्रवालजी यांच्या मातोश्रींचे देहावसान झाले त्या धनराज अग्रवाल यांच्या कुटुंबियांना व सुनामीग्रस्तांना लाखो मृतात्म्यांना ही सभा श्रद्धांजली वाहत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव तसेच देशाचे संरक्षण सल्लागार व्ही. एन. दिक्षित हे सुद्धा मृत पावलेले आहेत. त्यांनासुद्धा ह्या सभागृहात श्रद्धांजली वाहत आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्याचप्रमाणे विषारी दारु पिऊन मेलेल्या व्यक्तींना ही सभा श्रद्धांजली वाहत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ज्याप्रमाणे शोकप्रस्ताव ज्या व्यक्तीचा शोकप्रस्ताव पास करीत असतो. त्यांना आपण त्या ठरावाची प्रत पाठवित नाही. अभिनंदनाची व शोक प्रस्तावाची तुम्ही प्रत पाठवित नाही व त्यांना माहिती पडत नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण ज्यांचे पत्ते नसतात त्यांना प्रत पाठवित नसतो. परंतु ज्यांचे पत्ते असतील त्यांना आपण प्रत पाठवित असतो.

**आसिफ शेख :-**

भाईंदर स्थानिक रहिवासी मोहनदासजी हनुमानदासजी वैष्णव यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्याबद्दल ही सभा श्रद्धांजली वाहत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

फिल्मी अभिनेता अमरीश पुरी यांचे सुद्धा निधन झालेले आहे त्यांचेही नांव समाविष्ट करावे.

**मा. उपमहापौर :-**

श्रद्धांजलीसाठी आणखी काही प्रस्ताव असतील तर तशी सुचना करावी नसतील तर दोन मिनिटे शांत राहुन श्रद्धांजली अर्पित करावी.

**दुःखवटा ठराव क्र. ६९ :-**

आशिया खंडातील भारतासहीत इतर राष्ट्रात दि. २५ डिसेंबर २००४ व दि. २६ डिसेंबरच्या २००४ दरम्यान आलेल्या सुनामी लाटेत लाखो लोक मृत्यूमुखी पडले. त्याबद्दल ही सभा मृतात्म्यास श्रद्धांजली वाहत आहे.

सन्मा. सदस्य मा. श्री. धनराज अग्रवालजी यांच्या मातोश्रींचे देहावसन झाले. तसेच माजी पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव त्याचप्रमाणे देशाचे संरक्षण सल्लागार व्ही. एन. दिक्षित यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या मृतात्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

त्याचप्रमाणे विषारी दारु पिऊन मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीना ही सभा श्रद्धांजली वाहत आहे. तसेच भाईंदर स्थानिक रहिवासी श्री. मोहनदासजी हनुमानदासजी वैष्णव व फिल्मी अभिनेता श्री. अमरिश पुरी यांचे दुःखद निधन झाले.

त्या सर्व कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करित आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०७.०० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**